

सोनाली सामंत
धात्रीवर्य

# धात्रीवर्य

## (लघुकादंबरी)

लेखिका

## सोनाली सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान

# धात्रीवर्य

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर **खर्च** करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

# धात्रीवर्य


## लेखिका : सोनाली सामंत

फोन नं. 8291827732

E-mail: sonali.samant1@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.



प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmaaail.com



©esahity Pratishthan®2019




प्रकाशन : २२ एप्रिल २०१९



विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध


- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.





लेखिका : सोनाली सामंत,  8291827732

E-mail: sonali.samant1@gmail.com

- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/poorvabhas_sonali_samant.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/planchet_sonali_samant.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/manjiri_sonali_samant.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/maunat_arth_sare_sonali_samant.pdf






# सौ. सोनाली सामंत प्रभूतेंडोलकर



मी महावितरण मध्ये डेप्युटी मॅनेजर म्हणुन कार्यरत आहे. माझे जन्मस्थान सिंधुदुर्ग असून सध्या मी मुंबई येथे राहते. आतापर्यंत मौनात अर्थ सारे, मंजिरी, प्लांचेट, पुर्वाभास या कादंबऱ्या घेऊन मी तुमच्या भेटीला आले होते. आता वर्षभराने तुम्हाला नवीन कादंबरी द्यायला मला अतीव आनंद होत आहे. माझ्याबद्दल सांगायचे तर लेखन हा माझा छंद आहे. लिहायला बसल्यावर इतर सर्व विचार दूर जातात. ती एक नशा वाटते. वेगळ्याच जगात वावरत असल्यासारख वाटत. काल्पनिक पात्र आपलीशी वाटतात. एखादा चित्रपट पाहत असल्यासारखी कथा समोर ठाकते.

सुहास शिरवळकर, नारायण धारप, शोभा राऊत, योगिनी जोगळेकर यांचे साहित्य वाचायला मला खुप आवडते. ही सर्वजण आणि माझे वाचक हे माझी प्रेरणास्थाने आहेत.

संपर्क

फोन नं. 8291827732

E-mail: sonali.samant1@gmail.com

# मनोगत

सध्या आयुष्य एवढ धकाधकीच झालंय की त्यामध्ये आपल्या हातून काहीतरी निसटून जातंय अशी भावना प्रत्येकाच्या मनात एकदा तरी येऊन जातेच. मग जर आपल्याला मागच्या गोष्टी सुधारायची संधी अचानक मिळाली तर? आपलं आयुष्य थोडस रीवाइंड करायला मिळाल तर? आत्ता तुमच्या मनात अशी नक्कीच एखादी गोष्ट आली असेल जी तुम्हाला सुधारावीशी वाटतेय. याच धरतीवरची गोष्ट आहे एका मुलीची, तिच्या सोबत असलेल्या मित्रमंडळाची ज्यांना विनासायास अशी संधी मिळाली आणि त्या संधीने त्यांच आयुष्यच बदलून गेल. या कथेत काय नाही? यामध्ये भय, प्रेम, रहस्य, साहस, आदर, राग, मोह, मैत्री अशा सर्वच रसांचा मेळ आहे. तुम्हालाही अनुभव असेलच की काहीतरी चांगल केलं की आपल्याला चांगलच मिळत त्यामुळे मला अगदी खात्री आहे की ही कादंबरी तुम्हाला नक्की आवडेल

अगदी वेगळया पद्धतीची कादंबरी घेऊन येत आहे. फक्त तुमच्यासाठी आणि नेहमीप्रमाणे माझी आवडती प्रकाशन संस्था ई-साहित्य प्रतिष्ठानच्या मदतीने पूर्णतः मोफत. तर मग नक्की वाचा आणि अभिप्राय कळवायला विसरू नका, ‘धात्रीवर्य’!

# अर्पणपत्रिका

प्रेम या शब्दाचा अर्थ ज्या व्यक्तीकडे बघून

मला नव्याने जाणवला

ती व्यक्ती म्हणजे माझे पती श्री पराग प्रभूतेंडोलकर

यांना लग्नाच्या प्रथम वाढदिवसानिमित्त सप्रेम भेट.

सोनाली सामंत

१९ फ़ेब्रुवारी २०१९

या कथेमधील सर्व पात्रं व घटना काल्पनिक आहेत

त्यांचा वास्तवाशी कोणताही संबंध नाही.

साम्य आढळल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

# <u>धात्रीवर्य</u>

अनन्या आणि देवकचे लग्न ठरले होते. लग्नाच्या दिवशी सारा, संकेत आणि नंदितही हजर झाले. एवढ्या वर्षांनी सर्वांना एकत्र बघून फार आनंद झाला.

"तुम्ही सर्व कसे?"अनन्याने आश्चर्याने विचारले.

"अगं तुमच्या लग्नाची बातमी आम्ही पेपर आणि न्यूज चॅनेलवर वाचली," सारा हसत म्हणाली. नावावरून तुम्हाला ओळखले. देवक आज खूप मोठा माणूस झाला आहे. ऐकून बरे वाटले. धात्रीवर्यवरून परत आल्यानंतर परदेशी गेले त्यामुळे इथला काहीही संबंध नव्हता. तुमच्या सर्वांची खूप आठवण येत होती.

"हो, माझीही कॅन्सरमधून मुक्तता झाली. माझ्या आईला मी नवीन आयुष्य दिले. आता माझेही लग्न होऊन मला एक मुलगी आहे. आम्ही सर्व सुखात आहोत,"नंदित म्हणाला.

"मी इलेक्ट्रीकल इंजिनिअर झालो आणि स्वतःचा धंदा सुरु केला. आत्ताच एक छोटी कंपनी उभी केली आहे. उद्या तिचं उद्घाटन आहे, तुम्ही यायचं आहे,"संकेत म्हणाला.

"अनन्याने एम.एस. पूर्ण केले. तोपर्यंत लग्नासाठी आम्ही थांबलो होतो,"देवक म्हणाला.

"साताजन्माच्या गाठी हे खरेच आहे बहुधा," सारा हसत म्हणाली.

"म्हणजे?"अनन्याने न कळून विचारले.

“अगं वज्रसेनचे प्रेम तू ओळखले नाहीस,”सारा पुनः हसली.

“देवकलाही स्वतःच पुढाकार घ्यावा लागला. पण त्याचे प्रेम महाराणींनी ओळखले होते,”देवकने सत्य कबूल केले. आता अनन्याला वज्रसेनची काळजी, त्याने तिच्यासाठी धोक्यात टाकलेला जीव आठवला. आपल्याला याही जन्मी हाच पती मिळाला म्हणून स्वतःला तिने भाग्यवान समजले. त्यांच्या परत जाण्याने अनेक जन्म वाचले होते. धात्रीवर्य राज्यात पुनः सुख नांदले होते. देवकच्या खांद्यावर समाधानाने डोके ठेवत अनन्या म्हणाली,

“खरेच आपण भाग्यवान आहोत! सर्व चांगलेच झाले.”

दहावर्षांपूर्वी आपल्याला कोणी हे सांगितले असते तर पटले असते का?

## .... दहा वर्षांपूर्वी...

क्रीडांगणावर तुफान गर्दी जमली होती. वेळ सकाळचीच होती पण ऐन उन्हाळा असल्याने सूर्य अगदी आग ओकत होता. क्रीडांगणाच्या सभोवताली जागा मिळेल तिथे फडकी, झाडाची पाने, रूमाल, वर्तमान पत्रे, अगदी पायातल्या चपलासुद्धा घेऊन मुले बसली होती. आईस्क्रीम, कुल्फी वाटणाऱ्यांचा आज चांगलाच खप होत होता आणि या सगळयाला कारणही तसं खास होतं. ते म्हणजे इयत्ता नववी आणि दहावीचा अंतिम खोखोचा सामना. नूतन मराठी शाळा ही पहिली ते दहावीपर्यंतच होती. त्यापुढील शिक्षणासाठी मुलांना तालुक्याच्या शाळेत जावे लागत असे. त्यामुळे पहिलीपासून याच शाळेत अगदी दहावीपर्यंत शिकणाऱ्या मुलांची संख्या जास्त होती. परिणामी इतकी वर्षे एकत्र शिकणाऱ्या मुलांचे एक कुटुंबच झाले होते. त्यात शाळेची क्रीडास्पर्धा म्हणजे मुलांना वर्षाचा सण वाटला तरी त्यात वावगे वाटले नसते.

सुरुवातीला टॉस उडवला गेला आणि दहावीच्या टीमने टॉस जिंकला. संपूर्ण मैदानावर एवढा जल्लोष झाला की जणू दहावीने सामनाच जिंकला असावा. त्यात दहावीच्या संघात मातब्बर खेळाडू होते त्यामुळे एरवी सामना एकतर्फीच झाला असता, पण आजच्या विशेष गर्दीचे महत्वाचे कारण होते ते म्हणजे पुण्याहून शाळेत नव्याने दाखल झालेली रिना गुप्ते. तिचे नवीन फॅशनचे कपडे, बॉब केलेले केस, गोल टपोरे पाणीदार डोळे आणि खळीदार हास्य विशेषतः मुलांना वेड लावत होते. अभ्यासात यथातथा असली तरी बाकीच्या कलांमध्ये विशेष पारंगत असलेली रिना मुलांच्या दिल की धडकन बनली होती. त्यामुळे या वर्षी काहीतरी चमत्कार वगैरे घडेल अशी सर्वांना आशा वाटत होती.

नववीची कॅप्टन रिना गुप्तेने दहावीच्या कॅप्टन अंजली सेनला हस्तांदोलन करत विजयासाठी शुभेच्छा दिल्या आणि खेळ सुरु झाला. दहावीच्या संघाचे आठ खेळाडू पाठलाग करण्यासाठी दोन खांबांमधील आठ चौकोनात आळीपाळीने विरुद्ध दिशांना तोंड करून बसले. नववा खेळाडू म्हणजे संघाची कॅप्टन अंजली खांबाजवळ उभी राहिली. पहिल्या वेळी रिनासह अन्य दोन मुली बचाव करण्यासाठी मैदानात उतरल्या. आठवी ते दहावीच्या मुलींसाठी शाळेचा

गणवेश म्हणजे पूर्ण बाह्यांचा पांढरा कुर्ता, निळा पायजमा आणि निळी ओढणी असा होता. परंतु क्रीडास्पर्धेसाठी मुलींना हाफ पॅन्ट आणि टी शर्ट देण्यात आले होते. अर्थात असे पोशाख घालायची कल्पना रिनानेच शिक्षकांच्या गळी उतरवली होती. पण या तोकड्या पोशाखात बाकीच्या मुली मात्र अवघडल्या होत्या. त्यामुळे मैदानात उतरलेल्या रिनाला प्रवेशातच जोरदार टाळया मिळाल्या. मात्र पहिल्या पाच मिनिटांमध्ये दोघी बाद झाल्या आणि त्यानंतर अगदी अर्ध्या मिनिटांत रिना बाद झाल्याने प्रेक्षकांत बसलेल्या मुलांचे चेहरे पडले.

पुढच्या तिघींनी बचावासाठी तातडीने मैदानात उतरायला हवे होते परंतु अनन्याला मैदानात यायला उशीर झाला आणि तोपर्यंत पाठलाग करण्याऱ्या संघाने खो दिला होता त्यामुळे न खेळताच अनन्याला बाद घोषित केले. हे सर्व एवढ्या झटपट घडले की बचाव पक्षाच्या इतर दोन मुली गांगरून गेल्या आणि चलाख अंजलीच्या एकाच वेळी हाताला लागल्या. नववीच्या संघाची उतरती कळा सुरु झाली कारण पाठोपाठ मैदानात उतरलेल्या तिघीही तेवढ्या कुशल नसल्याने पुढच्याच मिनिटांत बाद झाल्या. अशाप्रकारे संपूर्ण खेळ दिलेल्या वेळेआधीच आटोपला गेला आणि नववीच्या विद्यार्थ्यांमध्ये नाराजी पसरली. नाराजीचं खरं कारण होतं, अनन्या देशमुख!

दोन मिनिटांच्या विश्रांतीनंतर दहावीचा संघ बचावासाठी मैदानात उतरला. अंजली सेन ही केवळ एक कुशल खेळाडूच नव्हती तर धोरणी सुद्धा होती. जिंकण्यासाठी विशेषतः प्रतिस्पर्ध्यावर मात करण्यासाठी त्याच्यातले कमकुवत दुवे शोधणे जास्त महत्वाचे असते अशी तिची धारणा होती. खेळाच्या पहिल्याच भागात जे तिने हेरले होते, ते म्हणजे सुयोग्य नियोजनाची कमतरता! धावताना खांबापासून खांबापर्यंत धावण्याऐवजी तिने साखळी मार्ग अवलंबला. कितीतरी वेळ निघून गेला तरी ती बाद होईना. तिला चकवा देण्यासाठी रिनाने खाली बसलेल्या अनन्याजवळ जाऊन हळूच खो असे म्हटले आणि प्रत्यक्षात अनन्याच्या पुढे त्याच दिशेकडे तोंड करून बसलेल्या रोमाला तिने खो दिला. अनन्याचे रिनाच्या हालचालींकडे लक्ष नव्हते, किंबहुना अशी हूल देणे तिच्यासाठी नवीन होते. त्यात सरावावेळी असे कधी घडले देखील नव्हते. त्यामुळे खो आवाज येताच ती उठली आणि समोर उभ्या असलेल्या अंजलीला तिने हात लावला, परंतु त्याचवेळी रोमाही उठली असल्याने अंजलीला नाबाद ठरवण्यात आले. तसेच रिनाला देखील ताकीद दिली गेली. प्रेक्षकांत एकच हशा पिकला. उपस्थित मुलींना रिनाची

झालेली फजिती बघून हसू आवरेना. रिना अधिकच खजील झाली. तिने अनन्याकडे रागाने पहिले आणि ती हळूच म्हणाली,

"तुला काहीच कळत नाही," अनन्याचा चेहरा पडला. अंजली शेवटपर्यंत नाबादच राहिली.

पाच मिनिटांच्या विश्रांतीनंतर पुन्हा खेळ सुरु झाल्याची शिट्टी वाजली. पहिल्या भागामध्ये दहावीच्या संघाची आघाडी होती. त्यामुळे नववीचा संघ पाठलागासाठी बसला. अनन्याच्या डोळ्यासमोर विश्रांतीमधील प्रसंग तरळला,

"ए तू, लक्ष कुठे होतं तुझं? खेळाचे नियम मी आधीच सांगितले होते. मैदानात किती उशीरा उतरलीस? तुझ्यामुळे बाकीच्या मुली देखील आउट झाल्या. आता जरा व्यवस्थित खेळ. कोणताही हलगर्जीपणा मला चालणार नाही. काहीही करा पण अंजलीला बाद करा," अनन्यासमोर बोट नाचवत रिना म्हणाली. खरंतर ती खूप चिडली होती.

"ताठ बस अनन्या!" रिनाने हळू पण शब्दांवर जोर देत म्हटले. तिच्या आवाजाने अनन्याच्या विचारांची शृंखला तुटली. शिट्टी वाजली आणि खेळ सुरु झाला. सर्वांत आधी अंजलीला आउट करायचे अशा सूचना असल्याने प्रत्येकजण तिच्याच मागे होता. अशातच अंजली अगदी अनन्याच्या समोर आली आणि त्याचवेळी 'खो' अशा आवाजाबरोबर तिच्या पाठीवर थाप पडली. अनन्या उठली आणि एका रेषेत सरळ चालत गेली. अंजली निश्चल उभी होती आणि अचानक अंजली हलली आणि थोडीशी उजवीकडे झुकली, तिच्याबरोबर अनन्याही उजवीकडे झुकली आणि अंजली निमिषार्धात डावीकडे वळली. नियमाप्रमाणे अनन्याने वळायला नको होते पण, "काहीही करा पण अंजलीला बाद करा," हे रिनाचे शब्द तिच्या कानांत घुमत होते. अनन्याने पटकन अंजलीला हात लावला आणि सर्वत्र एकच जल्लोष झाला. त्यामध्ये

निरीक्षकाने वाजवलेली शिट्टी क्षणभर विरली गेली. अनन्याच्या चुकीमुळे रिनाच्या संघाला पेनल्टी बसली आणि मग नववीचा खेळच पडला. अखेर दहावीच्या संघाचा विजय झाला आणि सर्व खापर फुटलं ते अनन्या देशमुखवर!

अनन्याचे आयुष्यच असे होते, तिला काहीतरी चांगले करायला जायचे असायचे पण नेहमी मांजर आडवी यायची आणि मग सगळा आळ जणू तिच्यावर यायचा. आपल्या बाबतीत असे का होते याचे तिच्याकडे उत्तर नव्हते, परंतु आहे हे असे आहे हे तिने मान्य केले होते. कितीही दुर्लक्ष केलं तरीही सगळ्या गोष्टींचा तिला त्रास होत असे. पण अनन्या मनाने अत्यंत प्रेमळ होती. आपल्या परीने जमेल तेवढी दुसऱ्याला मदत करावी हा संस्कार खूप लवकर तिच्यावर रुजला होता.

“अनु, खोखो मध्ये तुझी काहीही चूक नव्हती,” बॉल पायाने ढकलण्याचं निमित्त करत साधना म्हणाली. शाळेमध्ये सर्वांनीच अनन्याला दोष दिला होता. अनन्याचे डोळे पाण्याने डबडबले. डाव्या हाताचा तळवा उलटा करत तिने नाकाचा शेंडा पुसला आणि मोठ्या समजूतदारपणे ती म्हणाली,

“तुला असं वाटतं ना, यातच मला सर्व मिळालं. थँक्स धना, तू नेहमी माझ्या बरोबर असतेस,” साधनाचीही या वाक्याने कळी खुलली. तिने खिशातून छोटा डबा काढला, त्यामध्ये एक गुलाबजामुन ठेवला होता.

“धना तू पुन्हा चोरून आणलेस का?”

“अगं नाही, तुला आवडतात म्हणून मला दिलेला बाजूला काढला होता. चल खाऊया,” दोघीजणी एकमेकींना चिकटून खाऊ लागल्या. अशाप्रकारे गुलाबजामुनमुळे कटू आठवणी पुसल्या गेल्या आणि ती संध्याकाळ गोड झाली.

दामिनी देशमुख म्हणजे अनन्याची सावत्र आई! तिच्या वडिलांनी ती चार वर्षांची असतानाच दुसरे लग्न केले होते. वडील तसे तिला पुसटसे आठवत होते. त्यांचा विशेष असा सहवास लाभला नव्हता. ते कायम फिरतीच्या नोकरीवर असत आणि त्यातच त्यांचा अपघात झाला. दामिनी देशमुख मात्र गोष्टीतल्या सावत्र आईसारखी होती. अनन्याचा छळ होत होता. तिला घरातली सर्व कामे करावी लागत. तिच्या मागे असलेला अश्विन उपभोगीत असलेले सुख पाहूनच ती समाधान मानत असे. दिवसाच्या सुरुवातीचे पहिले काम म्हणजे नदीवरून पाणी आणणे. त्यानंतर साफसफाई झाली की ती सर्वांसाठी जेवण बनवीत असे. वडिलांच्या पश्चात् दामिनी बाईंना अनुकंपेवर नोकरी लागली होती. शिक्षण यथातथाच असल्याने त्यांना शिपाई पदावर रुजू व्हावे लागले. परंतु त्यांचा तोरा अधिकारी असल्यासारखा होता. अनन्यावरील त्यांची जरब जराही कमी झाली नव्हती.

धकाधकीच्या दिवसभरातली अनन्याची आवडती कामे म्हणजे पक्ष्यांना भाताची शिते घालणे, वासरांची देखभाल करणे, त्यांचे दुखणे खुपणे पाहणे, जगदंबेच्या मंदिरात फुले वाहणे. रोज शिते खायला येणारे पक्षी आणि गोठ्यातली जनावरे हेच तिचे सच्चे सोबती होते. पक्ष्यांचा किलबिलाट आणि जनावरांचे हंबरणे तिच्यासाठी संगीत होते, तोच तिचा विरंगुळा होता. मंदिरात जाऊन आल्यावर तिचे मन शांत होत असे आणि देवीशी हितगुज केले असता मनातले किल्मिष दूर होत असे. मंदिरामध्ये देवीची सिंहारुढ भव्य मूर्ती होती. डोक्यावर मुकुट, हातात विविध शस्त्र, अस्त्र अशी माँ जगदंबा महिषासुराचे मर्दन करीत असलेला देखावा होता. तिलाच ती आई मानत असे. भक्तीभावाने पूजत असे. भाव तसा देव या उक्तीप्रमाणे देवीच तिची तारणहार होती.

असेच दिवस जात होते. म्हणता म्हणता दहावीच्या परीक्षा सुरू झाल्या. दहावीचंही वर्ष आता संपत आलं होतं. अशाच एका संध्याकाळी अनन्या मंदिराच्या पायरीवर बसली होती. समोर पसरलेल्या माळरानावरून झुळूझुळू वारा वाहत होता. आपल्याबरोबर माळरानावरचा हिरवळीचा ओलसर, मंद गंध घेऊन येत होता आणि तिच्या लांबसडक कुरळ्या केसांना अधिकच कुरळे करत होता. असे असले तरी अनन्याचे मन विचारांच्या जाळयामध्ये अडकलेले होते. दुसऱ्या दिवशी भूमितीचा पेपर होता. आता दहावीनंतर पुढे काय असा प्रश्न तिला सतावू लागला होता. पुढच्याच आठवड्यात परीक्षा संपत होती. या सुट्टीत काहीतरी करायचे तिने ठरवले होते.

जेणेकरून गाठीला चार पैसे राहणार होते. विचारांच्या नादात कधी तिन्हीसांज झाली, तिला समजलेच नाही. पुजारी काका आरतीसाठी आले आणि तिला विचारमग्न बघून त्यांनी हाक मारली,

"पोरी कसल्या विचारात आहेस? काळजी करू नकोस. रात्रीनंतर दिवस उगवतोच," त्यांच्या या वाक्याने अनन्याच्या मनाला उभारी आली. पुजारी काकांनी तिच्याच हातात आरतीचे ताट दिले. तिने आरती केली आणि तडक ती घराच्या वाटेला लागली. घर जवळच होते पण केव्हाच बुडालेला सूर्य आता अंधुक प्रकाशही सोबत घेऊन गेला होता. वाटेत शाळा दिसली, तिथे अनन्याला थोडी चाहूल जाणवली. कोणीतरी दोघीजणी सायकल स्टँडवरून काढत होत्या. अंधारात अंदाज येत नसला तरी आवाज ओळखीचा वाटला. कुतूहलापोटी अनन्या आडोशाला उभी राहिली. गेटमधून त्या बाहेर आल्या आणि तिथेच बोलत उभ्या राहिल्या,

"तुला वाटतं का तेच प्रश्न येतील?" अनन्याने आवाज ओळखला. ती गौरी होती.

"इतिहासाला त्यातलेच पडले होते. मला फक्त पास व्हायचं आहे. सारंग सर अगदी अचूक सांगतात," रिना बोलत होती.

"अगं पण इतिहासाचा पेपर बराचसा वेगळा होता. थोडंफार इतर वाचलं होतं म्हणून काहीतरी लिहिता आलं. नाहीतर खूप फजिती झाली असती. गणितात काहीच करता येणार नाही."

"काही होणार नाही. तू उगाच नकारार्थी विचार करू नकोस. आता घरी जाऊन शांत झोप," रिना म्हणाली आणि दोघी दोन दिशांना निघून गेल्या. त्यांच्या बोलण्यावरून स्पष्ट होत होते की त्यांना परीक्षेत येणारे प्रश्न आगाऊ समजले होते. घडलेला प्रसंग फारसा रुचला नसला तरीही अनन्याला आश्चर्य मात्र वाटले. त्याचवेळी पुजारी काकांची शिकवण आठवली. काका म्हणाले होते,

"चुकीच्या रस्त्यावर काट्यांशिवाय काही नसते."

अनन्याने सरळ घरचा रस्ता पकडला. पण राहून राहून तिच्या मनात येत होते, “सारंग सरांनी सांगितलेले प्रश्न येतील का?”

दुसऱ्या दिवशी जरा लवकर आटोपून अनन्या आणि साधना शाळेमध्ये आल्या. “त्या झाडाखाली बसूया बाई, अजून तब्बल दोन तास आहेत आणि कडाक्याचे ऊन पडले आहे,” मैदानाकडे इशारा करत साधना म्हणाली. भूमितीच्या एका एका प्रमेयाचा आढावा घेत कधी तास निघून गेला, दोघींना कळले नाही.

“तुला भूक लागली आहे का? सकाळपासून काही खाल्लं नाहीसं वाटतं!” साधनाची चुळबूळ पाहून अनन्याने विचारले.

“आज डब्यामध्ये कोवळया हिरव्या मटरदाण्यांची चमचमीत लालेलाल उसळ आणि भाकऱ्या दिल्या आहेत. त्यामुळे लक्ष लागत नाही आहे,”

खरंतर अनन्यालाही भूक लागली होती पण भूमितीच्या पेपरपुढे काही सुचत नव्हते. त्यात सकाळपासून तिनेही काही खाल्ले नव्हते. जेवण्यात वेळ जाईल म्हणून तिने डबाही आणला नव्हता. पण आता तिला सडकून भूक लागली होती. त्यात उसळीच्या वासाने ती अधिकच चाळवली. पण परीक्षेच्या दडपणापुढे तिने अर्धीच भाकरी खाल्ली आणि परत पुस्तकात तोंड खुपसले. थोड्याच वेळात घंटा वाजली आणि सर्वांना दिलेल्या वर्गामध्ये जाणे भाग पडले. अनन्या आणि साधना वेगवेगळया वर्गांत होत्या. अनन्याच्या पुढेच नेमका रिनाचा नंबर होता. परीक्षा सुरु झाल्याची घंटा वाजली आणि रिना लगबगीने वर्गात प्रवेशती झाली. तिच्या चेहऱ्यावर आत्मविश्वास दिसत होता. अनन्याने क्षणभरच तिच्याकडे पाहिले आणि ती आपला पेपर लिहिण्यात गुंतली. भूमितीचा पेपर वेळेमध्ये पूर्ण करणे म्हणजे एक मोठे आव्हान होते. त्यामुळे प्रत्येकजण घाई करत होता. तासाभराने पहिली घंटा झाली आणि अनन्याच्या लक्षात आले, रिना पेपर लिहित नव्हती. बहुधा ती रडत असावी कारण डोळयांकडे जाणारा तिचा रुमाल अनन्याने नजरेने टिपला होता. काय बरे झाले असावे? अनाहूतपणे अनन्याचा हात पुढे झाला आणि तिने रिनाच्या खांद्याला स्पर्श केला. पूर्णतः बेसावध असलेली रिना कमालीची दचकली. कारण खोखो स्पर्धेनंतर अनन्या स्वतःहून काही तिच्याशी बोलली नव्हती आणि गर्विष्ठ रिनानेही तिला हाक मारली नव्हती.

"काय झालं?" अनन्याने दबक्या आवाजात विचारले. रिनाने दुसऱ्याच प्रश्नावर बोट ठेवले आणि अंगठा नकारार्थी फिरवला.

"पुढचा प्रश्न सोडव ना!" यावर रिनाने नकारार्थी मान हलवली. आधीच एक तास संपला होता आणि रिनाची उत्तरपत्रिका कोरी दिसत होती. तिला मदत केली नाही तर कदाचित ती नापास होणार होती. गेल्या दीड वर्षांत तिने केलेली टिंगल, तिची लागट बोलणी सर्वकाही अनन्याच्या नजरेसमोरून क्षणभरात चित्रफितीसारखे फिरले. एक क्षण दुर्लक्ष करण्याचे तिच्या मनाने सुचवले परंतु तत्क्षणी तिची सद्सद्विवेकबुद्धी जागृत झाली. उरलेल्या वेळात परीक्षकाची नजर चुकवून रिनाला जमेल तशी मदत करणे आणि आपला पेपर पूर्ण करणे या सगळयात अनन्याची तारेवरची कसरत झाली. तरीही तिने ते दिव्य केले, का केले याचे त्यानंतर तिला अनेक दिवस आश्चर्य वाटत राहिले. अखेर पेपर संपला, रिनाच्या डोळयांत कृतज्ञतेचे अश्रू आले. कोणत्या तोंडाने आभार मानायचे अशा संभ्रमात असतानाच अनन्याने तिला तेवढी संधीही दिली नाही, ती म्हणाली,

"आता उरलेल्या पेपरमध्ये आगाऊ प्रश्न जाणून घेण्यापेक्षा मनापासून अभ्यास कर," आणि ती निघून गेली. तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे रिना पाहतच राहिली, कितीतरी वेळ!

"काल परीक्षा संपली एकदाची, मी बाई अगदी वाट बघत होते. आता सुट्टीचा काही विचार केला आहेस की नाही?" अनन्या दळण दळत होती. जात्याच्या खाडखाड आवाजात दामिनीबाईंचा भसाडा आवाजही विरून गेला. समोरून काहीच उत्तर न आल्याने त्यांनी चिडून तिच्या पाठीत धपाटा मारला. दळणामध्ये दंग असलेल्या अनन्यासाठी हे अगदी अनपेक्षित होते. पाठीतली कळ मस्तकाला जाऊन भिडली. "आई गं!" ती विव्हळली.

“गधडे, लक्ष कुठे आहे तुझं? केव्हाची हाक मारतेय! मी काय सांगतेय ते नीट ऐक. काजू फॅक्टरीमध्ये काम आहे. काजू फोडायचे, महिना अडीच हजार देणार आहेत. उद्यापासून तू हजर होते आहेस. सकाळी ९ ते ६,” उत्तराची वाटही न बघता दामिनीबाई निघून गेल्या.

विचारांचं स्वातंत्र्य नसल्याने अनन्या पुनःश्च कामाला लागली. परंतु पाण्याने भरलेल्या डोळयांना जात्यातले दाणे दिसेनात. तसे पाहता तिला जरा म्हणून विश्रांती नव्हती. ‘आपल्याला आईचे ऐकावेच लागेल. दुसरा पर्याय नाही आणि आईचेही बरोबर आहे. दुसरी कुठली नोकरी मिळणार? ना धड शिक्षण ना अनुभव. त्यापेक्षा ही नोकरी बरी. महिना अडीच हजार काही वाईट नाही’ अनन्याने स्वतःला समजावले.

रात्री जेवण आटोपल्यानंतर आणि सगळं आवरल्यानंतर अनन्या गोठ्यामध्ये आली. वातावरण थंड होते. गोठ्यातल्या गाई म्हशी विसाव्यासाठी बसल्या होत्या. त्यांच्याजवळ जाताच हंबरून त्यांनी अनन्याला ओळखल्याचे पटवून दिले. त्यातल्या लाडक्या गाईच्या शेजारी अनन्या बसली. “माई, उद्यापासून मी नोकरीवर जाणार आहे. भीती वाटतेय गं! सगळं जमेल ना?” गाईच्या पाठीवरून मायेने हात फिरवत अनन्या बोलून गेली. गाईने हंबरून मान हलवली तसे तिला बरे वाटले. आकाशातल्या पूर्णाकृती चंद्राला पाहता पाहता अनन्याला आईची आठवण आली. आज आई असती, बाबा असते तर आपलं आयुष्य कसं असतं? इतक्यात एक तारा वेगाने चमकून गेला. तुटलेल्या ताऱ्याकडे पाहून अनन्याला साधनाचे बोल आठवले. तिने डोळे मिटले,

“अरे ताऱ्या तू तुटताना माझी ही इच्छा पूर्ण करणार असलास तर मला राजभोग मिळू दे,” अनन्याच्या तोंडून इच्छा निघून गेली, आपसूकच. असे भलतेच आपण कसे काय मागितले याचे नंतर कितीतरी दिवस तिला आश्चर्य वाटत राहिले.

काजू फॅक्टरीमध्ये काम सुरू झाले आणि आजवरच्या शालेय जीवनापेक्षा खूप वेगळे असे तिचे आयुष्य सुरू झाले. काम करता करता तिची तिथल्या नाझियाबरोबर ओळख झाली आणि अवघ्या काही दिवसांत दोघींची गाढ मैत्री झाली. अनन्यापेक्षा केवळ दोन वर्षांनी मोठ्या असलेल्या नाझियाचे लग्न झाले होते आणि तिला एक वर्षाची मुलगीही होती. तिच्या पतीचा इस्त्रीचा व्यवसाय होता. परंतु तेवढ्या कमाईवर भागत नसल्याने तिने इथे नोकरी स्वीकारली होती. तिची सासू मुलीचा तिच्या अपरोक्ष सांभाळ करत असे. दुपारी दोघी एकत्रच जेवायला बसत. एक दिवस त्यांचा सुपरवायजर सुट्टीवर असल्याने त्यांना थोडा वेळ मिळाला होता.

"अनु, तुझी सावत्र आई तुझा जाच करते ना?" अनन्या या प्रश्नाने भांबावली. कारण कितीही काही असले तरी घरातल्या गोष्टी ती बाहेर विशेषतः कारखान्यात बोलतच नसे.

"तसं काही नाही. तुला असं का वाटतं?"

"तुझ्या एकंदरीत दिनचर्येवरून समजतं. घरातली सगळी कामं करून तू इथे येतेस. वर तुझा सगळा पहिला पगार सुद्धा तिने घेतला."

"अगं नाही गं! मी स्वतःहून दिला. मी पैसे ठेवून काय करू?"

"हे बघ, एवढा चांगुलपणा बरा नाही. माझी सासू पूर्वी मला खूप त्रास द्यायची. त्यात मला पहिली मुलगी झाल्यानंतर तिचा जाच अधिकच वाढला. माझा शोहर तर आम्हा दोघींच्या भांडणाला कंटाळून घर सोडून जायला निघाला होता. शेवटी मी तिच्यावर वशीकरण केले आणि आता ती मला पूर्ण वश झाली आहे. मी म्हणेन तसं करते."

"वशीकरण म्हणजे?" अनन्यासाठी सर्व नवीन होते.

"ती एक काळी जादू आहे. आपली हवी ती इच्छा पूर्ण करते. समोरची व्यक्ती आपल्याला हवे तसे वागू लागते. तू पण तुझ्या आईवर कर. त्यासाठी तुला माझ्याबरोबर यावे लागेल."

"नाही बुवा, असलं काही नको. चाललंय ते सगळं नीट चाललंय," अनन्याच्या मनाला काही पटेना.

"अगं, घाबरू नको, तुझ्या सावत्र आईला काही होणार नाही. फक्त त्यानंतर ती तुझ्याशी चांगलं वागू लागेल. बघ, जरा विचार कर," नाझियाने अनन्याला समजावले. यावर तिने कसलीच प्रतिक्रिया दिली नाही पण तिचे विचारचक्र मात्र चालू झाले. ती अंथरुणावर पडल्यानंतरही ते चालूच होते. नाझियाच्या म्हणण्याप्रमाणे यात काही धोका नव्हता, झाला तर फायदाच होणार होता. अनन्याचे मन होकार-नकारावर दोलायमान होत होते. रात्रभर चित्रविचित्र स्वप्नांमुळे नीट झोपदेखील झाली नाही. रोज पहाटे पाच वाजता उठणारी अनन्या सात वाजून गेले तरी झोपूनच होती. अखेर दामिनी बाईनी शिव्यांची लाखोली सुरु केली आणि त्यामुळे तिला उठावेच लागले.

घरभर पसारा झाला होता. पदर खोचून दामिनीबाई काहीतरी शोधत होत्या. "आशूचं घड्याळ कुठे सापडत नाही. दोन हजारांचं होतं," दामिनीबाई अनन्याला उद्देशून बोलल्या. खरंतर अनन्याच्या पहिल्या पगारातून ते घेतले होते. पण अद्यापि एकदाही तिला ते वापरायला मिळाले नव्हते. रात्रभर पुरेशी झोप न मिळाल्याने तिचं डोकं दुखत होतं. ती गप्प राहिलेली पाहून दामिनी बाईंना अधिकच चेव आला. त्यांनी तोंडाचा पट्टा सुरु केला.

"आई, मी घड्याळ कशाला घेईन?"

"मी कुठे तुझं नाव घेतलं. पण तुझ्याकडे घड्याळ कुठे आहे?" बाई आवाज चढवत म्हणाली.

"अगं पण माझ्याच पैशातून ते घेतले होतेस ना?" आज पहिल्यांदाच अनन्याने प्रत्युत्तर दिले आणि त्याने आगीत तेल ओतायचे काम केले. भडकलेल्या दामिनी बाईंनी तिच्या कानशिलात लगावली. राग, दुःख, तिरस्कार या संमिश्र भावनांनी अनन्या घराबाहेर पडली. त्या जागेत क्षणभरही राहायची तिची इच्छा नव्हती. मनानेही काहीतरी पक्कं केलं होतं. कामावर जाण्याची इच्छा आणि ताकद दोन्ही नव्हती. तिचे पाय आपोआप नाझियाच्या घराकडे वळले. अंगणामध्ये नाझिया केस विंचरत होती. अनन्याला असं अचानक पाहून तिला खूप आश्चर्य वाटलं, त्याचबरोबर तिचा रडवेला चेहरा पाहून ती सगळं समजून गेली. तिने आधी तिला आतल्या खोलीत नेऊन बसवले, चहा-पोहे खायला दिले. खाल्ल्यानंतर अनन्याला थोडे बरे वाटले. खरेच

शरीराला बसलेल्या घावांपेक्षा मनावरचे घाव जास्त वेदना देतात हे त्यावेळी तिला जास्त प्रभावीपणे पटले.

“मी तयार आहे,” अनन्याने कबूल केल्यानंतर काहीतरी घडल्याचा नाझियाचा समज दृढ झाला.

“उद्या अमावस्या आहे. वशीकरणासाठी उत्तम दिवस! तुम्हारे माँ की कोई चीज लगेगी। गोंधळू नकोस, त्यांचा एखादा केस पण चालेल किंवा एखादा कपडा, चप्पल असं काहीही. सिर्फ तू इतनाही लेके आ, मग आपण बघू. आता तू घरी जा आणि आराम कर. कल तो छुट्टी हैं, आज मैं कुछ जुगाड करती हूँ तेरे छुट्टी के वास्ते साब को बोलती हूँ। तू डर मत।”

“घरी जाऊन तरी काय करू? मला घरी जायची अजिबात इच्छा नाही,” अनन्या मनापासून म्हणाली. यावर नाझियाने तिला समजावले आणि घरी पाठवले.

अमावस्येची अंधारी रात्र एरवीच्या गडद अंधारात अधिकच भर पाडत होती. काजव्यांचा कुठे कुठे अंधुक प्रकाश दिसत होता. रातकिड्यांचा किर्रर्र किराट आणि भटक्या कुत्र्यांचा आवाज भयाण वाटत होता. टॉर्चच्या प्रकाशात दोघीजणी स्मशानाच्या दिशेने वाटचाल करू लागल्या. सर्वत्र निःशब्द शांतता होती. सगळी झोपल्यावर अनन्या गुपचूप बाहेर पडली होती. सोबत तिने आईची जुनी चप्पल घेतली होती. मनातली अपराधी भावना दाबत तिने चेहऱ्यावर उसना निश्चय आणला होता. घरच्या रोजच्या कटकटीला तिच्या सहनशक्तीने अखेर विरोध केला होता. तिच्यामधला राग अनावर झाला होता. आता परिणामांची भीती तिचे बालमन करत नव्हते. करो वा मरो या उक्तीप्रमाणे ती एक एक पाऊल निडरपणे पुढे टाकत होती. परंतु कुठेतरी संस्कार तिला डाचत होते. काहीतरी चुकीचे घडणार आहे असे तिला आतून वाटत होते. दोघीजणी झपाझप छोटी घाटी पार करून जंगलामध्ये आल्या. जलद केलेल्या हालचालींमुळे दोघींच्याही कपाळावर घर्मबिंदू साचलेले होते. अचानक पुढे चालणाऱ्या नाझियाचा तोल गेला आणि तिचा हात घट्ट पकडलेली अनन्या देखील ओढली गेली. दोघीजणी खोल खड्ड्यात पडल्या.

काहीतरी शिकार पकडण्यासाठी केलेला खड्डा असावा. क्षणभर दोघी प्रचंड घाबरल्या आणि अनाहूतपणे त्यांच्या तोंडातून बाहेर पडलेल्या किंकाळीने त्या नीरव शांततेचा छेद केला.

“कुठे पडलो आपण? आउच! काहीतरी टोचलं. नाझिया, ए नाझिया, तू आहेस ना?” चाचपडत अनन्याने नाझियाच्या चेहऱ्याला स्पर्श केला.

“अगं, कसलातरी खड्डा आहे हा! बहुधा आपण खूप खोल पडलो आहोत. अंधार केवढा आहे? काही दिसत नाही.”

“अरे देवा. आता कसं बाहेर पडणार? मला खूप भीती वाटते आहे.” इति अनन्या.

“भीती तर मलापण वाटते आहे. माझ्या मते सकाळ होऊन कोणीतरी येईपर्यंत आपल्याला थांबावं लागेल,” बाहेर पडायचा कोणताच मार्ग दिसत नसल्याने अखेर निराश होऊन नाझिया म्हणाली.

“नाही नाही. सकाळपर्यंत वाट पाहणे शक्य नाही. माझ्या आईला समजले तर ती खूप क्लेश करेल. काहीतरी कर. प्लीज घरी जाऊया,” अनन्याला हुंदके अनावर झाले. परंतु बाहेर पडण्याचा कोणताही मार्ग दिसत नसल्याने दोघीही हतबल झाल्या. बराच वेळ असाच शांततेमध्ये गेला. बाहेरून येणारे जनावरांचे चित्रविचित्र आवाज दोघींना घाबरवत होते.

“मला एक युक्ती सुचत आहे. मला वाटतं तोच एक पर्याय आहे. यश आलं तर आपण दोघीही या खड्ड्यातून बाहेर पडू शकतो.”

“अगं सांग ना प्लीज. काहीही असलं तरी मी तयार आहे,” अनन्याने नाझियाचा हात घट्ट पकडला. ती अगतिक झाली होती.

“तू उंच आहेस आणि तब्येतीने देखील पुष्ट आहेस. मी तुझ्या खांद्यावर चढले तर कदाचित मला बाहेर जाता येईल. मग मी दोरी किंवा तसं काहीतरी बघते आणि तुला इथून बाहेर काढते. नाहीच जमलं तर गावात जाऊन कोणालातरी सोबत घेऊन येते.”

“चालेल, हे बरं होईल. चल आपण बघू जमते का ते,” अनन्या खाली बसली आणि नाझियाने तिच्या खांद्यावर पाय ठेवला. एकतर दिवसभर आईच्या त्रासाने अनन्याला शीण आला होता त्यात भरीस भर म्हणून की काय ती नीट जेवली देखील नव्हती. नाझिया अंगाने कमकुवत

असली तरी वयाने अनन्यापेक्षा मोठी होती. तिच्या वजनाने अनन्याचा तोल गेला आणि दोघीही पडल्या.

"आपण पुन्हा प्रयत्न करूया. थोड सहन कर अगं," नाझिया अजीजीने म्हणाली. अनन्याने देवीचे स्मरण केले आणि नाझियाला खांद्यावर घेतले. भिंतीचा आधार घेत, जीवावर उदार होऊन, ती उभी राहिली. नाझियाने बाहेरच्या बाजूवर हात रोवले आणि अल्लाचं नाव घेत तिने आपले शरीर हातावर उचलले. अशाप्रकारे अखेर ती खड्ड्यातून बाहेर आली.

दमून थकून अनन्या एका बाजूला पडली. आता ती खड्ड्यात एकटीच राहिली होती. अतिरिक्त श्रमाने तिला थकल्यासारखे वाटत होते. बाहेर नाझियाची कसलीही चाहूल नव्हती. बराच वेळ वाट पाहिल्यावर अनन्याला वाटले की नाझिया कोणातरी व्यक्तीला शोधायला गावात गेली असावी. पण तरीही तिने काहीतरी कल्पना द्यायला हवी होती. जनावरांचे आवाज आता जास्तच ऐकू यायला लागले होते. तसतशी अनन्याची छाती धडधडू लागली. अचानक खड्ड्याच्या बाहेर कसलीशी चाहूल तिला ऐकू आली. अंधारामध्ये दोन हिरवे डोळे चमकले आणि अनन्याच्या छातीमध्ये धस्स झाले.

गुरगुरण्याच्या आवाजावरून तिच्या लक्षात आले,

तो वाघ होता!

तसे पाहता खड्ड्याची खोली जास्त होती. परंतु भुकेलेलं श्वापद काहीही करू शकत होते आणि तसेच झाले, एक मोठी डरकाळी फोडत वाघाने खड्ड्यामध्ये उडी मारली. समोर क्षणाक्षणाला जवळ येणारा मृत्यू होता. अनन्याच्या नजरेसमोरून एका क्षणात तिचे आजवरचे सर्व आयुष्य सरकून गेले. तिच्या पश्चात रडणारे सुद्धा या जगात कोणीही नव्हते याची प्रथमच तिला भीषण जाणीव झाली. वशीकरणासाठी उचललेले पाऊल आज खोल खाईच्या बाजूने घसरले होते. अंधारामध्ये समोरून येणारा वाघ फारच उग्र आणि विद्रूप भासत होता. अनन्याने मनापासून जगदंबेचे स्मरण केले आणि डोळे मिटले, "हे आई, माझ्याकडून काही चुकलं असलं तर

मला माफ कर," मिटल्या डोळयांपुढे तिला प्रखर उजेड दिसला. जणू प्रकाशाने तिचा रोमरोम व्यापून टाकला असावा.

कापसाच्या पुंजक्यांसारखे अनन्याचे शरीर हलके हलके व्हायला लागले. आजवर आयुष्यात कधीही वाटला नसेल एवढा हलकेपणा ती अनुभवत होती. चहुबाजूंना केवळ पांढरा शुभ्र प्रकाश होता. तिच्या मते ती उडत वर वर जात असावी कारण मिती, काळ कशाचाही तिला अंदाज येत नव्हता. तिच्या शरीराने किती वेग घेतला असेल याचेही भान तिला नव्हते. परंतु या सर्वच अनाकलनीय, अनाहूत गोष्टींमध्ये तिला जाणीव होत होती ती एका मंद सुगंधाची आणि सभोवतालच्या असीम शांततेची. अनन्याने डोळे मिटले आणि कर्मेंद्रियांद्वारे ती केवळ घडत असलेल्या बदलाचा आस्वाद घेऊ लागली.

असा किती वेळ गेला असेल याचा ठोकताळा लागत नव्हता. बहुधा अनन्याला झोप लागली असावी. तिला कोणाचा तरी स्पर्श झाला आणि तिने डोळे उघडले. चौघांनी ती वेढली गेली होती. दचकून उठत ती एका बाजूला झाली. सभोवताली पसरलेलं ओसाड वाळवंट तिला भकास वाटलं. दूरवर आता या पाच मुलांशिवाय इतर कोणाचीही चाहूल नव्हती. अगदी चिटपाखरुसुद्धा नव्हते.

“घाबरू नकोस, आम्ही तुला कोणतीही हानी पोहचवणार नाही,” कुरळ्या केसांच्या एका मुलीने तिला दिलासा दिला.

“मी कुठे आहे? आणि तुम्ही कोण आहात?” अनन्या अजूनही भयभीत नजरेने त्यांच्याकडे पाहत होती. साधारण तिच्याच वयाची ती मुले असावीत. त्यामध्ये एक मुलगी आणि तीन मुलांचा समावेश होता. बराच वेळ शांततेत गेला. बहुधा ती सर्व आणखी कोणाची तरी वाट पाहत होती.

“मला वाटतं आता पंचांग पूर्ण झालं असावं. आपल्याला इथून पुढचा काहीतरी मार्ग मिळेल,” एक उंच आणि चष्मा लावलेला मुलगा काही वेळाने सर्वांना उद्देशून म्हणाला, त्यानंतर अनन्याला संबोधून तो बोलू लागला,

“मला जेवढं समजलं आहे तेवढं सांगेनच, परंतु त्याआधी माझ्या प्रश्नांची उत्तरं दे, घाबरू नकोस, इथे तुला कसलीही इजा पोहोचवली जाणार नाही. इथे येण्यापूर्वी तुझ्याबाबतीत नेमके काय घडले?” आता अनन्याला सर्वांत शेवटी पाहिलेला प्रसंग आठवला.

अनन्याला अजूनही धाप लागली होती. असं म्हणतात की जुन्या वाईट आठवणी आपल्या चित्तात कायम ताज्या असतात. आताही वाघाचं रौद्र रूप आठवून तिच्या हृदयाचे ठोके वाढले होते. सर्व काही कथन केल्यानंतर तो चष्मीश मुलगा आपला सैल झालेला चष्मा नाकावर चढवत म्हणाला,

“म्हणजे माझा अंदाज योग्य होता. आपण पाचही जण कदाचित मृत्यूच्या दाढेमधून परत आलो आहोत. आपण एकेकाची ओळख करून देऊ या. सर्वच एकमेकांशी अपरिचित आहोत. नमस्कार, मी संकेत विश्वास, अभ्यासाबरोबर मी इलेक्ट्रीशिअनचं काम करतो. त्या घटनेनंतर किती काळ गेला असेल माहित नाही, परंतु आता अगदी काही वेळापूर्वीच घडल्यासारखे वाटतेय. एका ऑफिसमध्ये फ्यूज गेला होता आणि मालकाने मला ताबडतोब यायला सांगितले. खरे तर मला जावेसेच वाटत नव्हते, मी तसा त्याला नकारही दिला होता, पण त्याने देऊ केलेल्या जादा रक्कमेचा मोह मला आवरेना. इतक्या दिवसांची सवय, अनुभव, आणि नेहमीचा कामामधला अचूकपणा!

त्या ऑफिसचं मीटर गॅरेजमध्ये होतं. रोजच्यापेक्षा जरा जास्तच अंधार तिथे होता. तरीही तोंडामध्ये बॅटरी घेऊन माझे सरावलेले हात काम करत होते. सोबत कुणीही नव्हते आणि मला गरजही वाटली नाही. अचानक काय झाले समजलेच नाही, आता आठवतोय तो तारेमधून येणारा विजेचा लोळ. तो प्रकाश एवढा लख्ख होता की माझे डोळे दिपून गेले. हळूहळू शरीर हलके झाले, अगदी कापसासारखे, एवढे हलके आणि शांत पूर्वी कधीही वाटले नव्हते. मी हवेवर तरंगत, उडत इथे कसा आलो माहित नाही. पण मी आलो तेव्हा एकटाच होतो.” संकेतची कहाणी ऐकून प्रत्येकजण अधिकच आश्चर्यचकित झाला.

“मी सारा सानप, माझ्या बाबतीतदेखील असेच काहीसे झाले. लहानपणापासून प्रत्येक परीक्षेत मी अव्वल होते. त्यामुळे आई-बाबांच्या माझ्याकडून खूप अपेक्षा आहेत आणि मी त्या पूर्ण करतच आले आहे. संध्याकाळची ट्युशन संपवून मी आत्याकडे दादरला जात होते. आत्या खूप दिवसांपासून बोलवत होती. त्यामुळे तिच्या वाढदिवशी तिला भेट देण्यासाठी मी जायचं ठरवलं. स्टेशनवर उतरून नेहमीप्रमाणे मी टॅक्सी पकडली. बाहेर अंधारले होते पण रस्त्यावरचा दिव्यांचा झगमगाट आणि हॉर्नचा गोंगाट आताही कानामध्ये घोंगावतो आहे. नेहमीपेक्षा रिक्षा जास्त वेगाने धावतेय असं मला वाटतंच होतं, पण कधी एकदा आत्तेला भेटते असं झाल्याने माझं मनही जास्त वेगाने धावतं होतं. शेवटची आठवतेय ती बस आणि ट्रकच्या मधून जाणारी माझी रिक्षा आणि त्यानंतर प्रकाशच प्रकाश. मी हलकी होत गेले, कापसासारखी आणि भानावर आले तेव्हा होतं सभोवताली पसरलेलं हे वाळवंट!” सारा बोलताना थरथरत होती. तिसऱ्या कथेचाही

शेवट सारखाच झाला होता. परंतु प्रत्येकाच्या चेहऱ्यावरचं प्रश्नचिन्ह अधिकच गडद झालेलं दिसत होतं.

"मी देवक धारगळकर, खरं तर सकाळपासूनच मला अस्वस्थ वाटत होतं, पण काकांची तब्येत बिघडल्याने मला जाणे भाग होते. माझ्या पप्पांचा इम्पोर्ट-एक्स्पोर्टचा मोठा बिझनेस आहे. त्यामुळे शिक्षण मी नावालाच घेतो आहे. कोईंबतोरला काका-काकी दोघंच राहतात. त्यांचा मुलगा अमेरिकेला असतो. तिथेच लग्न केल्याने काकांनी त्याला आपल्या सगळयाच मालमत्तेतून बेदखल केले आहे. त्यामुळे मला वरचेवर तिकडे जावे लागे. साधारण रात्री १२ वाजता मी पोहोचलो. त्यांच्या फ्लॅटची एक स्पेअर की माझ्याकडे होती. आतमध्ये काहीतरी वेगळंच वाढून ठेवलं होतं. काका बेडवर अस्ताव्यस्त पडले होते आणि काकी रक्ताच्या थारोळ्यात तडफडत होती. मी धावत तिच्याकडे गेलो परंतु काही बोलेपर्यंत तिने प्राण सोडले. हे सर्व माझ्यासाठी एवढं अनपेक्षित होतं, की मी खूप घाबरलो. तिथून सैरावैरा पळत सुटलो. काका दहाव्या मजल्यावर राहत होते. मी जिन्यानेच खाली उतरलो आणि त्यातच माझा तोल गेला आणि मी पडलो. त्यानंतर आठवतो तो स्वच्छ प्रकाश, डोळे दिपवून टाकणारा आणि शरीराची जाणीव संपवणारा. तुमच्याप्रमाणे मी सुद्धा इथेच आलो. मी आलो तेव्हा फक्त तूच होतास. पण त्यानंतर सगळी एवढी जलद आली की काही बोलायलाच उसंत मिळाली नाही." सर्वजण शेवटी राहिलेल्या मुलाकडे पाहू लागली.

"मी नंदित घोषाल, तुम्हा सगळयांपेक्षा माझी कथा वेगळी आहे. तुमच्यापैकी कोणालाही आपल्याबाबतीत काय घडणार हे अनपेक्षित होतं. पण माझं तसं नव्हतं. मला माहित होतं की मी मरणार आहे ते. कारण मला कॅन्सर झाला होता. त्याला जबाबदारही मीच होतो. दीपा मला खूप आवडत होती. परंतु तिला माझं प्रेम कधी कळलंच नाही. माझ्या हे लक्षात आल्यानंतर मात्र मी निराशेच्या गर्तेमध्ये खोल खोल बुडत गेलो. त्यादरम्यान मनामधली कटुता लपवण्यासाठी मी तंबाखूचा आधार घेतला. दारू पिण्याएवढी ऐपत नव्हती. गायछापचा तोबरा भरून मी कानांमध्ये हेडफोन घालून तासन् तास गाणी ऐकत रहायचो. कित्येकदा जेवणाचेही भान नसे. बिचारी माझी आई, माझ्या अधःपतनाला याची देही याची डोळा साक्षी होती. माझे सर्वाधिक हित चिंतणारी अशी ती व्यक्ती होती पण मी मात्र सगळा राग, सगळं दुःख तिच्यावर काढत होतो. अखेर देवाने मला प्रायःश्चित दिलं तेही असाध्य रोगाच्या रूपाने. मी माझ्या आयुष्यात खूप चुकलो, शेवटी मी दवाखान्यात होतो. डॉक्टरांनी काही दिवसांची मुदत दिली

होती. शेवटची आठवतेय ती न संपणारी धाप आणि खोकला! आणि त्यातच मी कॉटवरून खाली पडलो पण लागलंच नाही. नुसता प्रकाश आणि शांतता. मी इथे आलो तेव्हा शारीरिक वेदनांपासून मुक्त झालो होतो पण माझ्या आईला मी दिलेला त्रास अजूनही मला तीव्र वेदना देत आहेत," असे म्हणून नंदित ढसाढसा रडू लागला. संकेतने त्याच्या खांद्यावर हात ठेवला आणि त्याची समजूत काढली. नंदित वाळूतच निपचित पडून राहिला.

"आता पुढे काय? आपण मृत्यूच्या दाढेतून परत आलो आहोत की मृत आहोत?," शांततेचा भंग करत साराने प्रत्येकाच्या मनातला प्रश्न विचारला.

"म्हणजे तुला काय म्हणायचे आहे? अगं जिवंतपणाची एकही निशाणी आपल्यात नाही. तुझ्या लक्षात आले आहे का? इथे आल्यापासून आपला श्वासोच्छ्वास चालत नाही आहे," देवकच्या बोलण्यावर सगळेच हादरले कारण कोणाच्याही हे लक्षात आले नव्हते, परंतु हे सत्य होते. आतापर्यंत वातावरणात जाणवणाऱ्या भेसूर शांततेचं कारण होतं, ते म्हणजे त्यांच्या हृदयाचे ठोके पडत नव्हते.

पाचही जण रेती तुडवत चालत होती. कोणीही कोणाशी बोलत नव्हतं, कारण त्या सर्वांना सारखेच प्रश्न पडले होते ज्यांची उत्तरे कोणाहीकडे नव्हती. नुसतेच बसून राहण्यापेक्षा थोडे फिरून पहायचे सर्वांनी ठरवले. बरेच अंतर चालून गेल्यावर त्यांना एक तळे लागले. वाळवंटामध्ये तळे कसे काय याचे त्यांना अतीव आश्चर्य वाटले. पण पुढे जाण्यासाठी तळे पार करणे भाग होते. तळ्याजवळ पोहोचताक्षणीच तिथे कुठूनशी एक होडी तरंगत आली. सर्वजण होडीमध्ये बसले. तिथे वारा नसूनही होडी आपोआप पुढे जात होती. तळ्याच्या मध्यावर आल्यानंतर पाण्यामध्ये अचानक एक भोवरा तयार झाला आणि होडी त्या भोवऱ्यामध्ये फसली. सर्वांच्या किंकाळ्या वातावरणात घुमत राहिल्या. आता त्यांच्या सभोवताली दिसत होते ते केवळ पाण्याचे बुडबुडे आणि त्यांच्या शरीराने गोलाकार एवढा वेग घेतला असूनही त्याही वेगामध्ये त्यांना कोणा शक्तीने होडीमध्ये जखडून ठेवले होते. पण अचानक समोर आलेल्या प्रसंगाने त्यांनाही त्याचे भान नव्हते.

काही काळानंतर भोवरा शांत झाला आणि होडीने चालण्याचा वेग वाढवला. जणू काही त्यांचे उतरण्याचे ठिकाण आधीच ठरले होते.

"आपण कुठे चाललो आहोत?" होडीमध्ये एका कोपऱ्यात पडलेला चष्मा डोळयांवर चढवत संकेतने विचारले. सुदैवाने चष्म्याला काहीही झाले नव्हते याचा दिलासा त्याच्या चेहऱ्यावर दिसत होता. "समोरच्याला उत्तर माहित नसल्याची खात्री असताना तू प्रश्न कसा विचारू शकतोस?" चौफेर नजर फिरवत थोड्या नाराजीने नंदितने विचारले.

"बघा ना, आता वाळवंट दिसेनासे झाले आहे. मला वाटतं आपण या होडीमधून पाण्यामध्ये उडी मारुया," नंदितकडे दुर्लक्ष करत संकेतने आपले घोडे पुढे दामटले.

"मला पोहता येत नाही," अनन्या हबकून म्हणाली.

"अगं घाबरू नकोस, तू आधीच मेलेली आहेस त्यामुळे तुला काही होणार नाही," नंदित पुनःश्च वटवटला. परंतु संकेतने होडीबाहेर मारलेली उडी अर्धवटच राहिली. हवेमध्ये सूर मारल्यासारखा तो पुन्हा होडीमध्ये येऊन स्थिरावला. सर्वांचाच आ वासला गेला आणि अचानक एक ओलसर आवाज ऐकू येऊ लागला. जणू काही कोणीतरी पाण्यामधून बोलत होते.

"तुम्ही होडीबाहेर जाऊ शकत नाही, शांत बसून राहा, तुमच्या सर्वांच्या प्रश्नांची उत्तरे लवकरच तुम्हाला मिळणार आहेत."

"कोण आहेस तू?" इतका वेळ शांत असलेल्या देवकने विचारले.

"सध्या तरी मी तुमच्या होडीची चालक आहे."

"परंतु तू आहेस कुठे? आणि आम्हाला का दिसत नाहीस?" इति देवक.

"मी तुमच्या होडीखाली आहे. मी अदृश्य आहे, तुम्हाला दिसू शकत नाही. कृपया माझ्यावर विश्वास ठेवा," सर्वांचे चेहरे बधीर झाले होते. अनोळखी जागा, अनोळखी व्यक्ती (?) विश्वास ठेवायचा की नाही हे समजत नव्हतं. परंतु त्यांच्यासमोर दुसरा पर्याय देखील नव्हता.

बराच वेळ होडी चालत राहिली. आजूबाजूचे घनदाट जंगल आता नाहीसे झाले होते आणि पाण्याचा रंग देखील दुधाळ होऊ लागला होता. जणू काही होडी दुधामधूनच प्रवास करत होती. अनन्याने कुतूहलाने पाण्यामध्ये हात बुडवला. तिला ओंजळीमध्ये ते जल घ्यायचे होते. परंतु अहो आश्चर्यम् तिचे हात कोरडेच राहिले. ओंजळीमध्ये पाणी आलेच नाही. अनन्याने

पुनः प्रयत्न केला पण निष्फळ ठरला. "तुमच्या अंतिम स्थळी पोहोचेपर्यंत इथल्या कुठल्याही वस्तूला तुम्ही स्पर्श करू शकत नाही," तो आवाज पुनः बोलला.

आजुबाजूचे दृश्य नयनरम्य होते. झाडांना लगडलेली फळे, फुले! बागडणारी पुष्ट जनावरे, आकाशात गाणारे पक्षी, उडणारी फुलपाखरे सर्वच अतिशय सुरेख होते. एकूणच सर्वत्र आनंदच आनंद भरून राहिला होता. आजवरच्या आयुष्यामध्ये उपभोगलेल्या आनंदी क्षणांपेक्षाही इथे त्यांना जास्त आनंदी वाटत होते. क्षणभर मृत्यू, पडलेले प्रश्न या साऱ्याचा त्यांना विसर पडला. होडी काठाला लागली, उघड्या पायांचा स्पर्श तिथल्या गवताला झाल्याबरोबर सर्वांचे शरीर मोहरून गेले आणि चमत्कार झाला.

प्रत्येकाचे रंग, रूप बदलू लागले.

अनन्याचे मुळातच लांबसडक केस अधिक लांब झाले. तिची उंचीदेखील वाढली. गालांवर डाळींबाची लाली चढली. त्वचा मऊ, मुलायम झाली. डोळयांमध्ये नैसर्गिक काजळ आले. अंगावरचा विटका झगा जाऊन तिथे मौल्यवान रेशमी वस्त्रे आली. पायांमध्ये मऊ, उंची बूट आले. आता ती एखाद्या राजकुमारी सारखी दिसू लागली.

अनन्याप्रमाणेच सारा, देवक, संकेत आणि नंदितच्या शरीरयष्टीमध्ये बदल झाला होता. अगोदरच उंच असलेला देवक अधिकच उंच झाला. शरीर अधिकच रसरशीत झाले. काया आटोपशीर आणि प्रमाणबद्ध दिसू लागली. चेहऱ्यावर बुद्धिमत्तेचे तेज झळकू लागले.

साराचे बॉब केलेले केस लांबसडक आणि दाट झाले. त्यांचे वेटोळे होऊन सैलसर अंबाडा घातला गेला. त्यावर फुलांचे आच्छादन आल्याने तो अतिशय सुरेख दिसू लागला. तिची बारीक अंगकाठी सुधारून पुष्ट झाली. गोबऱ्या गालांवर खळया पडू लागल्या. लालचुटूक ओठ अधिकच लाल झाले.

नंदितचे शरीर फारच कृश होते. आजारपणामुळे आणि सततच्या औषधांमुळे त्याच्या गालांवरची हाडे दिसू लागली होती. बरगड्या तर मोजता येत होत्या. पाठीचा कणादेखील दिसत होता. नंदितमध्ये कमालीचा फरक पडला. त्याची उंची दुपटीने वाढली. व्यायाम करून कमावलेले पोलादी शरीर त्याच्या अंगावरील वस्त्रांमधून डोकावू लागले. आपल्यामधल्या बदलामुळे नंदित हरखून गेला.

संकेतचे केस जाऊन तिथे शेंडी आली. त्याचा चष्मा निघून गेला होता आणि त्याची दृष्टी आता सुधारली होती. संकेतला आपल्या कमकुवत नजरेबद्दल अपार दुःख वाटे. प्रत्येक वेळी चष्म्याचा करावा लागणारा वापर आणि त्याच्यावरील अवलंबन त्याला डाचत असे. त्यामुळे तो कमालीचा खूश होता. शरीरामध्ये तेज दिसू लागले. अंगावरचे शुभ्र धोतर आणि उपरण्यातून सात्विकता प्रकट होऊ लागली. डोक्यावर चंदनाचा नाम रेखला गेला. दूध-तूप खाऊन पुष्ट झालेल्या शरीराची गोलाई जाणवू लागली. आपल्यामधल्या बदलामुळे सर्वजण चकित झाले होते.

त्याचवेळी त्यांच्यासमोर प्रकाश निर्माण झाला. त्या प्रकाशामध्ये एक उतार वयाची स्त्री अवतरित झाली. तिने शुभ्र वस्त्रे परिधान केली होती. डोक्यावरच्या पदरामधून तिचे कुरळे केस बाहेर आले होते. तिने अंगावर मोत्यांचे अलंकार परिधान केले होते. कोपरापर्यंतच्या बाह्यांमधून डोकावणारे तिचे हात थोडे कृश वाटत होते आणि गंमत म्हणजे तिच्या पायामध्ये चप्पल नव्हती. तिच्या अंगावर तेज चढले होते आणि या सगळयाचा परिपाक म्हणजे तिच्याकडे पाहून खूप शांत वाटत होते.

“मुलांनो तुम्हाला सर्वच काही सांगायला मी इथे आले आहे. मी बोलत असताना कोणताही प्रश्न विचारू नका. कारण वयोमानानुसार मला आता जमत नाही. मध्येच बोलण्याची लय तुटली तर परत सगळे आठवायला मला वेळ लागतो. जरा बसून बोलूया बरं का!” असं म्हणत ती स्त्री अधांतरीच बसू लागली. ती पडेल की काय याची भीती वाटून नंदित झटकन पुढे झाला पण ती एका दगडावर आरामात बसली होती. तिथे दगड कसा आला याचेच सर्वांना आश्चर्य वाटले.

“इथे......... इथे तर......” नंदित अजूनही थरथरत होता.

“तुम्ही सगळे बसा पाहू,” स्त्रीने दाखवलेल्या जागेकडे पाच दगड होते. सर्वजण एक एक करत दगडांवर स्थानापन्न झाली. थोडीशी खाकरून ती स्त्री बोलू लागली.

“बरं का मुलांनो, आधी मी माझी ओळख करून देते. माझं नाव आहे रक्षा! आपले नाते खूप जवळचे आणि विश्वासाचे आहे. अनोळखी असूनही तुम्हाला माझ्यावर विश्वास ठेवावासा वाटला त्याला एक कारण आहे ते म्हणजे प्रेम! प्रत्येकाच्या मनामध्ये प्रेमाचा झरा असतो, आपल्या

प्रवृत्तीने त्याची खळखळ कमी जास्त होत असते. पण तो कधीही आटत नाही. प्रत्येकातील झऱ्याच्या पाण्याची चव सारखीच असते. त्यामुळे एकमेकांमध्ये आपुलकी राहते. आता मी तुम्हाला एक गोष्ट सांगते. सर्वांनी अगदी लक्षपूर्वक ऐका.

धात्रीवर्य नावाचं एक राज्य असतं. तिथला राजा मोठा दानशूर आणि प्रजादक्ष असतो. राजामध्ये बोल लागेल असे शोधूनही सापडत नसे. राजाचे नाव होते धात्री आणि तेच नाव राज्याला दिले गेले होते, धात्रीवर्य! तिथल्या प्रजेचे राजा धात्री हे दैवत होते. परंतु असे असले तरीही राजा मात्र दुःखी होता. त्याला कारण म्हणजे लग्नाला वीस वर्षे होऊन सुद्धा त्याला अपत्यसुख नव्हते. राजाचे राणीवर खूप प्रेम असल्याने दुसऱ्या लग्नाचा विचारदेखील त्याच्या मनाला कधी शिवला नाही. राजाप्रमाणे राणीसुद्धा सात्विक, धार्मिक आणि समंजस होती. अपत्य नसल्याचे दुःख हे पुरुषापेक्षा स्त्रीला जास्त असते. त्याप्रमाणे राणी सदैव दुःखी कष्टी असे. देवाने आपल्याला एक तरी मूल द्यायला हवे होते हाच विचार रात्रंदिवस तिच्या मनामध्ये अधिकाधिक दाटत होता आणि आता त्याचा काळाकुट्ट अंधार झाला होता.

राणीने अनेक व्रत-वैकल्य केली, होम-हवन केले. पंचक्रोशीमधले वैद्य बोलावले परंतु तिची इच्छा काही पूर्ण झाली नाही. अखेर झुरून झुरून त्यातच राणीचा अंत झाला. तिची इच्छा अधुरीच राहिली. राजाने खूप दुःख केले. परंतु प्रजेच्या हितासाठी आपले दुःख गिळून त्याला पुनश्च मार्गक्रमण करणे क्रमप्राप्त होते.

एकदा शिकारीला गेला असता राजा वाट चुकला आणि भटकत राहिला. तहान आणि भुकेने व्याकूळ झालेल्या त्याला दूरवर एक मिणमिणता

दिवा दिसला. अग्नी म्हणजे मनुष्याच्या अस्तित्वाची चाहूल हे जाणवून तो प्रकाशाच्या दिशेने चालू लागला. ती एक पर्णकुटी होती. तिथे एक अत्यंत सुंदर स्त्री राहत होती. तिने राजाचे उत्तम आदरातिथ्य केले. त्याला अनेक दिवसांनी कोणा सुंदर आणि सद्वर्तनी स्त्रीचा सहवास मिळाला त्यामुळे राजा तिथेच काही दिवस राहिला.

असाच एक मास पूर्ण झाला आणि तोपर्यंत तिच्याशी विवाह करण्याचा विचार राजाच्या मनामध्ये दृढ झाला. राजाने तिच्याशी गांधर्व विवाह केला आणि तिला प्रथमपत्नी धराचे नाव दिले. राणी धरा राजाला म्हणाली,

“राजन, माझे सौभाग्य की मला आपण पत्नीचा दर्जा दिला. परंतु ज्याप्रमाणे आयाळीशिवाय सिंहाला शोभा नाही तसेच राज्याशिवाय राजाला!

“आपले म्हणणे अगदी बरोबर आहे राणी धरा. माझ्या प्रिय राज्याकडे माझे मन ओढ घेत आहे परंतु मला तिथला मार्ग कसा सापडेल?”

“राजन लग्नानंतर आपली सर्व सुख-दुःखे माझी झाली आहेत. आपण प्रयत्न करू, माझा परमेश्वरावर विश्वास आहे,”आणि त्यानंतर दोन्ही पती-पत्नी राज्याच्या शोधार्थ बाहेर पडली. वाटेत त्यांना अनेक संकटे आली परंतु सर्वांचा सामना करून ती अखेर धात्रीवर्य राज्यामध्ये दाखल झाली. दरम्यान राणी गर्भवती होती. वाटेतच ती प्रसूत झाली आणि तिने एका सुंदर, गोंडस राजकन्येला जन्म दिला. आपल्या लाडक्या राजाला पाहून सर्वांच्या आनंदाला पारावर राहिला नाही. त्यातच नवीन गोड बातमी ऐकून राज्यात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले. राजकन्येचे बारसे धुमधडाक्यात झाले. तिचे नाव धृमल ठेवण्यात आले.

राजकन्या नावाप्रमाणेच सर्जनशील होती. तिच्यामध्ये काहीतरी नवीन करण्याची इच्छा सदैव जागृत असे. त्यामुळे लहान वयातच ती सर्वांची

लाडकी झाली. राजकन्या वयाच्या अवघ्या दहाव्या वर्षी धनुर्विद्येमध्ये पारंगत झाली होती. एकाग्रता आणि उत्तम नेतृत्वगुण तिच्या अंगी जणू जन्मतःच परमेश्वराने दिले होते.

तिच्या वयाचे सोळावे वर्ष ज्या दिवशी पूर्ण झाले त्या रात्री खूप वादळी वारे घोंगावू लागले. ऐन चैत्र मासात आकाश अंधारून आले आणि मुसळधार पाऊस सुरु झाला. एक खळाळती वीज राजवाड्यावर पडली. राजवाडा प्रकाशाने भरून गेला आणि जेव्हा प्रकाश ओसरला तेव्हा सर्वांच्या लक्षात आले की त्या प्रकाशाने राजकन्या धूमलला गिळंकृत केले होते. राजकन्येच्या जाण्याने सर्वत्र एक पोकळी निर्माण झाली आणि राज्यावर अवकळा पसरली, "

रक्षा बोलायची थांबली होती. सर्वजण गोष्टीमध्ये एवढे मग्न झाले होते की त्यांना आजूबाजूच्या परिस्थितीचे भानच राहिले नाही. रक्षाने सर्वांचे चेहरे एका क्षणात चाचपडले पण तिने आपले मौन कायम ठेवले. त्यामुळे सर्वच गडबडून गेली.

"पुढे काय झाले? राजकन्या परत आली का? आणि सर्वांत महत्वाचं आम्ही इथे का आलो आहोत?" साराने एका पाठोपाठ एक प्रश्नांचा भडीमार केला.

"मुलांनो तुम्हाला बुद्धीबळ माहित असेलच, त्यात राजाला वाचविण्यासाठी वजीर, उंट, हत्ती, घोडा आणि प्यादी असतात. तसेच राजकन्येचे मित्रमंडळ होते. तिच्याबरोबर खेळणारे आणि छोट्या मोठ्या संकटांत तिच्यासाठी लढणारे. राजकन्या धूमलची दासी शताक्षी साधारण तिच्याच वयाची होती. पण दोघींमध्ये घट्ट मैत्री होती. धूमल तिला कधीही दासीसारखे वागवत नसे आणि शताक्षीला आपल्या मैत्रीबरोबरच दासीपणाचेही भान होते. त्यामुळे ती आपल्या कर्तव्यामध्ये कधीही चुकत नसे.

धात्रीवर्य राज्याचा प्रधान हा राजाप्रमाणेच इमानदार होता. आपली जबाबदारी उत्तमप्रकारे पार पाडत होता. प्रधानाला एक पुत्र होता. त्याचे नाव होते वज्रसेन, जो मोठा चतुर होता. अत्यंत कुशाग्र बुद्धिमत्ता देऊनच परमेश्वराने त्याला धरतीवर पाठवलेले होते. राजकन्येच्या मित्रमंडळातील तो एक सदस्य होता. बुद्धीच्या जोरावर खेळले जाणारे सर्वच खेळ वज्रसेन जिंकत असे. भावी प्रधान म्हणून त्याच्याकडे पहिले जात होते. राजादेखील काही प्रसंगी वज्रसेनचे मत मागत असे.

प्रवर्तन हा सेनापतीचा मुलगा होता. शरीराने पुष्ट आणि बलदंड असे त्याचे व्यक्तिमत्व होते. व्यायामाची त्याला विशेष आवड असे. धृमलच्या वयाचा असल्याने आणि सतत संपर्कात असल्याने त्याचाही अनाहूतपणे मित्रमंडळामध्ये समावेश झाला.

राजपुरोहितांना दोन मुले होती. त्यातील मोठा प्रद्युम्न हा धृमलच्या मित्रमंडळाचा पाचवा आणि शेवटचा सदस्य. हो शेवटचा कारण आता त्यांना मंडळ वाढवायचे नव्हते. अत्यंत शांतवृत्तीचा असल्याने प्रवर्तन तसा अजातशत्रू होता. तो कधीही कोणाला दुरुत्तर करत नसे. त्यामुळे थोरा-मोठ्यांमध्ये तो विशेष प्रिय होता. अशी ही पाचजण सदैव सोबत असत,”

एवढे बोलून रक्षा पुन्हा गप्प झाली.

आता प्रत्येकाच्या डोक्यात थोडाथोडा प्रकाश पडत होता. अपूर्ण चित्राचे काही तुकडे जोडले गेले होते. प्रत्येकाला आपली भूमिका लक्षात यायला लागली होती. परंतु तरीही चेहरे चाचपडले जात होते. देवक -वज्रसेन, संकेत - प्रद्युम्न, नंदित - प्रवर्तन, सारा - शताक्षी, अनन्या - धृमल या जोड्या सर्वांच्या मनाला अपोआपच स्पर्शून गेल्या. अजूनही काही प्रश्न बाकी होते आणि प्रथमच अनन्याने तोंड उघडले! अत्यंत विनम्रपणे ती म्हणाली,

“माई, राजकन्या धृमल जर गायब झाली असेल तर तिच्या मित्रमंडळाने तिला शोधले नाही? आणि आता आमचे काय काम? कृपया तुम्ही तुमचे प्रयोजन स्पष्ट करावे.”

“राजकन्येच्या अदृश्य होण्याने राज्यात एकच खळबळ माजली होती. राजा धात्री आणि राणी धरा यांच्यावर मृतकळा पसरली होती. राजकन्येच्या जाण्याने तिचं मित्रमंडळ हादरून गेलं होतं. परंतु सर्वच साहसी होते आणि त्यांचे राजकन्येवर नितांत प्रेम होते. त्यामुळे त्यांनी आपापसात खूप चर्चा केली, त्यासाठी प्रद्युम्नने अनेक पुस्तके चाळली, वज्रसेनने खूप शक्कल लढवली, प्रवर्तनने दंड थोपटले, शताक्षीने राजकन्येच्या सर्व सवयी, आवडी-निवडी सांगितल्या आणि सर्वानुमते बिनविरोध एक ठराव पास झाला. ‘राजकन्येच्या शोधार्थ बाहेर पडायचे.’

त्यानंतर बाहेर पडलेलं चौकट परत आलंच नाही. त्यामुळे एकच हलकल्लोळ झाला आणि संपूर्ण राज्य दुःखात नष्ट झालं. गेलेल्या मुलांच्या मातापित्यांनी आधी आक्रोश केले आणि अतीव दुःखाने अखेर आत्मदहन केले. पितृछत्र हरवलेल्या राज्यात अंदाधुंदी माजली परिणामी एकमेकांच्या जीवावर उठलेल्या प्रजेने आपलाच घात केला.

मुलांनो आता मी मुख्य मुद्द्याकडे वळते. तुम्ही आता धात्रीवर्य राज्याच्या सीमेवर आहात. तुमच्या येण्याची चाहूल लागताच इथल्या गात्रागात्रांना काही अंशी संजीवनी मिळाली आहे. या राज्याला काही अंशी नवजीवन मिळालं आहे. तुमचे इथे येण्यामागचे प्रयोजन म्हणजे त्या गेलेल्या सर्व मुलांना परत आणणे. सध्या तुम्ही त्यांच्या रिकाम्या जागा भरणार आहात पण लक्षात ठेवा तिथल्या मोहमयी दुनियेत गुंतू नका कारण तुमच्याकडे केवळ एकच महिन्याचा कालावधी आहे. तेवढ्यात तुम्ही त्या सर्वांना शोधलं नाही तर तुमचे जायचे दरवाजे कायमस्वरूपी बंद होतील. तुम्ही भूतकाळातच अडकून पडाल,”

रक्षा त्या सर्वांचा अंदाज घेऊ लागली.

"भूतकाळात अडकून पडाल म्हणजे? आणि आम्हाला ज्या पात्रांची भूमिका वठवायची आहे त्यांचा स्वभाव, ज्ञान, चालीरीती, सवयी थोडक्यात त्यांच्या आठवणी कुठे माहीत आहेत? आम्ही लगेच पकडले जाऊ," अनन्या भयभीत होऊन म्हणाली. गरीब घरात वाढलेली असल्याने राजकन्येची भूमिका कशी निभवायची याची चिंता तिला सतावत होती.

"बाळ धृमल, तुझ्या पहिल्या प्रश्नातच दोन्हींचं उत्तर लपलेलं आहे. हा तुमचाच भूतकाळ आहे. ही पात्रं म्हणजे तुमचा आधीचा जन्म. मी तुम्हाला भविष्यातून इथे घेऊन आले आहे. त्यामुळे इथल्या आठवणी तुमच्या स्मृतीमध्ये जतन आहेत. तुम्हाला सर्व आपोआप आठवेल. तुम्ही काळजी करू नका. फक्त एक लक्षात ठेवा, ज्यावेळी तुम्हाला सर्व सापडतील तेव्हा राजकन्या धृमलच्या डोक्यावर मुकुट चढवावा लागेल. त्यानंतरच सर्व आपोआप पूर्ववत होईल. प्रत्येकजण स्वस्थानी जाईल. आता मला निघावे लागेल. पुढचे निर्णय तुम्ही घ्या!"

एवढे बोलून रक्षा धृमलजवळ आली आणि तिने तिला मिठी मारली. तिची कृती एवढी अनपेक्षित होती की सर्वांना आश्चर्य वाटले. कोणी काही बोलण्याच्या आत रक्षा अदृश्य झाली होती. त्या नदीकाठी केवळ पाच माणसे राहिली होती. भविष्याबद्दल अनभिज्ञ आणि भूतकाळ दाट धुक्यामध्ये विरलेला. रक्षाने सांगितल्याप्रमाणे हा त्यांचाच भूतकाळ होता पण त्यांना अजूनही काहीही आठवत नव्हते, अजूनही कोणतीही ओळख पटत नव्हती, अजूनही त्यांच्या दृष्टीने ते नवीन जगामध्ये वावरत होते.

"हिला इथे स्पेशल ट्रीटमेंट मिळत आहे. मला दासीची भूमिका नाही जमणार. मला इथून जायचे आहे," सारा त्वेषाने म्हणाली. अनन्याला वाईट वाटले पण साराचे बरोबर होते हे तिला पटले.

“सारा तुझे बरोबर आहे. तुझ्यासारख्या मुलीला हा भूतकाळ पचवणे कठीण जाणार आहे. परंतु आपल्यासमोर दुसरा पर्याय नाही. होडीमधून मी बाहेर पडण्याचा प्रयत्न केला तेव्हा काय झाले ते तू पाहिले आहेसच. आपल्याला हे करावेच लागेल. हे कोडे सोडवल्याशिवाय इथून सुटका नाही,” संकेत म्हणाला.

पायांना मऊसूत फुलांचा स्पर्श झाला तशी सर्व भानावर आली आणि आजूबाजूच्या दृश्याने एकदम विस्मयचकित झाली कारण आता त्यांच्यासमोर संथ वाहणारी नदी नव्हती तर रत्नजडीत असा भव्य राजवाडा होता. त्या राजवाड्याला सोन्याचा कळस होता. त्याच्या शिरोभागी दोन हत्तींचे आकार आसनस्थ होते. त्याचे प्रवेशद्वार ईशान्येकडे होते आणि त्याला साधारण आठ हत्ती एकावेळेला चढू शकतील इतक्या रुंदीच्या भव्य चांदीच्या पायऱ्या होत्या. या जिन्याची प्रत्येक पायरी कमी उंचीची व जास्त रुंद केल्यामुळे त्यावरून प्रसंगी घोडेसुद्धा चढू शकत होते. हिरे माणके राजवाड्याची शोभा वृद्धिंगत करत होती. राजवाड्याच्या प्रवेशद्वारापासून मुख्य दारापर्यंत फुलांची पायघडी पसरवलेली होती. त्या फुलांचा ताजेपणा आणि टवटवीतपणा जरासुद्धा कमी झालेला नव्हता. त्यात भरीस भर म्हणून की काय दुतर्फा फळांच्या वृक्षांची लागवड केलेली होती. सर्व झाडे फळा-फुलांनी लगडलेली होती. संपूर्ण वातावरण तृप्त वाटत होते. बहुपर्णी कमानी, चबुतरे, अष्टकोनी किंवा गोलाकार स्तंभरचना, छज्जे, सूक्ष्म नक्षीकाम केलेल्या जाळया, भव्य अवकाश रचना, भिंतीवरील गिलाव्यात केलेले जडावकाम, लांबट, षट्कोनी, अष्टकोनी, गोल घुमट रचना व या विविध वास्तुघटकांमुळे, त्यांच्या संयोजनामुळे राजवाड्याच्या निर्मितीला शोभा आली होती. पाचही मुले तटस्थ राहून समोरचे दृश्य पाहत होते. खरोखरच वातावरणाने त्यांच्यावर जादू केलेली होती. आजवर चित्रातही न पाहिलेला असा भव्य आणि रम्य देखावा ते प्रत्यक्षात पाहत होते.

“आश्चर्य म्हणजे एवढ्या परिसरात एकही मनुष्य कसा दिसत नाही? सैनिक, द्वारपाल कोणीतरी हवेच होते,” अनन्या चौफेर पाहत बोलून गेली.

“सगळं वातावरण कसं भारलेलं वाटतंय. झाडांना फळ-फुलं आहेत. पण तरीही त्यांच्यात जीव वाटत नाही. असं वाटतंय की कोणीतरी कलाकाराने काढलेलं सुंदर चित्र पाहतोय. वातावरणात सुगंध भरलेला आहे पण तो भरभरून हृदयात साठवता येत नाही. जणू काही कोणी नाक बंद करून ठेवले आहे,” सारानेही तिला साथ दिली.

“ती रक्षा म्हणाली होती की हा आपलाच भूतकाळ आहे. आपल्याच स्मृती आहेत, पण अजूनही मला काही आठवत नाही. कोणाला काही आठवते का?” नंदितने विचारले यावर सर्वांनी नकारार्थी माना हलविल्या.

“राजवाड्यात जाऊ या कदाचित आत गेल्यावर काहीतरी खूण पटेल,” देवक म्हणाला आणि पुढे चालू लागला. सर्वजण त्याच्या पाठोपाठ जाऊ लागली. राजवाड्याच्या पहिल्याच पायरीशी सर्वजण थबकली कारण त्यांना आतमध्ये जाता येत नव्हते. जणू काही अदृश्य भिंत त्यांना अडवत होती. सर्वांनी आळीपाळीने प्रयत्न केला परंतु त्यांच्या पदरात निराशा पडली.

“हे काय चालू आहे? कोणती तरी अदृश्य शक्ती आपल्याला राजवाड्यात प्रवेश करू देत नाही. काय करायचे? त्या रक्षाने सर्वच अर्धवट माहिती दिलेली आहे,” देवक त्राग्याने म्हणाला. खूप प्रयत्न करूनही काहीही उपयोग न झाल्याने सर्वजण उदास चित्ताने तिथेच जमिनीवर बसली. कल्पनेपेक्षा सर्व भयानक वाटत होते. त्या अखंड परिसरात त्यांना भकास आणि एकटे वाटू लागले. समोर उभा असलेला राजवाडा भेसूर दिसू लागला.

“अरे, ती मूर्ती कित्ती सुंदर आहे,” राजवाड्याच्या उजवीकडे पसरलेल्या बगिच्यामध्ये एक तलाव होता. ज्यामध्ये पाण्याचे कारंजे उडत होते. त्या तलावामध्ये सोन्याची उत्कृष्ट मूर्ती ठेवली होती. संपूर्ण परिसरात त्या मूर्तीमधून येणारा उजेड पसरलेला होता. ती मूर्ती एका सुंदर पण लहान मुलीची होती. ती मुलगी गुढग्यांवर बसलेली होती. तिच्या हातात फुलांचा गुच्छ होता आणि त्या फुलांचा सुगंध घेण्यात गुंतलेली तिची मुद्रा फारच मोहक दिसत होती. त्या मुद्रेवरचे हावभाव सुवर्णकाराने अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने घडविलेले होते. तिच्यामध्ये एक जिवंतपणा जाणवत होता.

“कोणाची मूर्ती असेल ही?,” भान हरवून विस्फारित नजरेने सर्वजण पाहत होते.

“ही दुसरी तिसरी कोणीही नसून राजकन्या धृमल आहे,” अनन्या त्या मूर्तीकडे पाहत म्हणाली.

“कशावरून?” सर्वांनीच कोरसमध्ये विचारले.

"तिच्या डोक्यावरच्या मुकुटावरून," एवढे बोलून अनन्या त्या तलावाच्या दिशेने चालू लागली. ती जेव्हा तलावाजवळ पोहोचली तेव्हा एक चमत्कार घडला, ती मूर्ती एकाएकी जागेवरून हलली आणि ती अनन्याच्या दिशेने येऊ लागली. अनन्याच्या हृदयाचे ठोके वाढले. तिला खरं तर खूप भीती वाटत होती, तिला तिथून पळून जायचे होते परंतु कोणीतरी तिचे पाय घट्ट जखडून ठेवले होते. मूर्ती जवळ येत होती. सारा, संकेत, नंदित आणि देवक अनन्याजवळ मदतीला येण्यासाठी धावत होते परंतु त्यांच्यामधील अंतर जराही कमी होत नव्हते. ट्रेडमीलवर धावल्यासारखे त्यांना वाटत होते आणि अखेर मूर्ती थांबली. आता त्यांच्यामधले अंतर अवघे दोन फुटांचे होते आणि अनन्याच्या डोक्यात प्रकाश पडला. तिचे हात आपोआप पुढे झाले, तिने मूर्तीच्या डोक्यावरचा मुकुट काढून आपल्या डोक्यावर चढवला आणि आश्चर्य घडले. अनन्याच्या सर्व स्मृती जाग्या झाल्या. समोर दिसणारी आपली प्रिय दोस्त मंडळी पाहून तिला प्रेमाचे भरते आले आणि धावत जाऊन ती त्यांना बिलगली. जणू अनेक वर्षांनी सर्वजण भेटत होती.

राजकन्या धूमलच्या स्पर्शाने जादू झाली. इतर सर्वांच्या स्मृतीदेखील जागृत झाल्या. त्याचबरोबर वातावरणात बदल झाला. आजूबाजूला सेवक दिसू लागले. अचानक आसमंतातून पडल्यासारखी माणसांची वर्दळ सुरु झाली होती. त्यात समावेश होता तो माळीकाम करणाऱ्यांचा, काही फळांची ओझी वाहत होते, काही शस्त्रांना धार लावत होते, काही परिसरात स्वच्छता करत होते, काही दासी फुलांची माळ बनवण्यात गुंतलेल्या होत्या अशी एक ना अनेक दृश्यं वातावरण जिवंत करत होती. खूप दिवसांनी घरी आल्यासारखे धूमलला वाटले.

"आपण सर्व इथे आहात? आम्ही आपणास केव्हापासून शोधत आहोत. धूमल आपण आता फार लबाड झाला आहात," राणी धरा दासींच्या गर्तेमधून येत होती. तिच्या हातातील सुवर्ण कलशामध्ये गरम दूध होते. तिला पाहताच सर्व मुलांनी हात जोडले आणि खाली मान घातली. आपल्यापेक्षा मोठ्यांना मानाने वागवण्याचे संस्कार धात्रीवर्य राज्याच्या प्रजेवर बिंबले होते आणि राजा-राणी सर्वांना परमेश्वरासमान होती. आज कसलीही तक्रार, कुरकुर न करता धूमलने तो पेला तोंडाला लावला. बऱ्याच काळानंतर घराचा लाभलेला सहवास धूमल मनसोक्त उपभोगत होती. धूमलच्या या कृतीचे राणी धरा आणि उपस्थित दासींना खूप आश्चर्य वाटले कारण दुग्धपान हा धूमलचा अत्यंत नावडीचा कार्यक्रम होता. बऱ्याचवेळा तिला त्यासाठी तयार

करण्यामध्ये राणी धराचा एवढा वेळ निघून जाई की दरम्यानच्या वेळेत दासींना नवीन गरम दूध आणून द्यावे लागे. त्यामुळे प्रथमच घडलेल्या या प्रसंगाने सर्वजण अचंबित झाले.

"अहो आश्चर्यम्!" राणी धरा उत्तरून गेली. तिच्या नजरेत आश्चर्याबरोबरच आनंदही झळकत होता. परंतु धृमल मधल्या अनन्याला आपली चूक लक्षात आली. मनावरचा ताबा खूप महत्वाचा होता अन्यथा ती सर्व पकडली जाणार होती. अनन्याला जाणवला तो धृमलचा हट्टी स्वभाव. काही ठराविक गोष्टी ज्या तिला विशेष अप्रिय होत्या त्या करण्यासाठी समोरच्याला तिच्या कैक नाकदुऱ्या काढाव्या लागत. दुग्धपान ही त्यापैकी एक होती. परंतु किती काळानंतर या सर्वांचा सहवास लाभलेले तिचे मन प्रत्येक गोष्टीचा आस्वाद घेत होते. परिणामी या कृतीला रोखण्यासाठी मनाचा तोल ढळू न देणे महत्वाचे होते.

आत्ताच्या प्रसंगावर मात कशी करायची या विचारात असताना वज्रसेन तिच्या मदतीला धावून आला.

"अरे वा राजकन्या, मी हरलो हे मान्य करतो," धृमलरुपी अनन्याच्या लक्षात आले आणि तिनेही त्याचीच री ओढली.

"मी आधीच सांगितले होते, उगाच शर्त लावू नको. परंतु तू ऐकले नाही," सर्वजण हसू लागले.

"असे आहे तर, परंतु धृमल आपले चुकलेच. वज्रसेन आपणही एक गोष्ट लक्षात ठेवावी, आपण सर्व कितीही जवळचे सखा असला तरीही अशी शर्त लावणे चुकीचे आहे. कालांतराने त्याचे व्यसन लागू शकते," राणी धरा प्रेमळपणे म्हणाली.

"यापुढे आम्ही लक्षात ठेवू," सर्व मुले नम्रपणे म्हणाली आणि राणी तिथून निघून गेली.

"आपल्या सर्वांनाच विशेषतः धृमल तुला सावध राहायला हवे आहे. आपल्या स्मृती जागृत झाल्या याचा अर्थ असा नाही की आपली प्रत्येक कृती तशीच होईल. कारण विचारांसारखेच आचरण करण्याचे कठीण कार्य आपल्याला इथे करायचे आहे," देवक उर्फ वज्रसेन म्हणाला.

“आणि महत्वाचे म्हणजे आपण एकमेकांना आत्ताच्या नवीन नावाने हाक मारू. रक्षाने सगळीच अर्धवट माहिती दिली आहे. ती कोण होती? कुठून आली होती? याचा काहीच उलगडा झाला नाही. मला हे सुद्धा कळत नाही की आत्ता आपली मूळ रूपे कुठे असतील,” संकेत उर्फ प्रद्युम्न म्हणाला.

“अरे आपण आत्ताच इथे आलो आहोत. हळूहळू सर्व समजेल,” शताक्षीने त्याला दिलासा देण्याचा प्रयत्न केला.

“शताक्षी अगं तू ऐकलं नाहीस का? आपल्याजवळ फक्त एक महिना मुदत आहे,” प्रद्युम्न उत्तरला.

“प्रद्युम्न तू बरोबर बोलतो आहेस. पण आपल्यासमोर दुसरा पर्याय देखील नाही,” असे बोलून प्रवर्तन राज्याच्या दिशेने निघाला.

“कोठे जात आहेस? प्रवर्तन थांब,” सर्वांना लांब ढांग टाकत जाणाऱ्या प्रवर्तनपर्यंत पोहोचण्यासाठी थोडा वेळच लागला.

“माता-पित्यांना भेटण्याची ओढ लागली आहे. मला वाटते सगळे आधी आपापल्या घरी जा. कित्ती जन्मानंतर पुनश्च ही संधी मिळाली असेल देव जाणे. उद्या सूर्योदयाला आपल्या नेहमीच्या जागी भेटू,” प्रवर्तन चालता चालता बोलत होता. सर्वांनाच त्याचे म्हणणे पटले. तसेही मध्यान्ह होण्यास काहीच काळ शिल्लक राहिला होता. त्यामुळे सर्वांनी आपापल्या घराचा रस्ता पकडला.

शताक्षी अनाथ होती. शताक्षीची आई ही राजघराण्यात अनेक वर्षे चाकरीमध्ये होती. उतारवयात ती गर्भवती राहिल्याने बाळंतपणातच तिचा अंत झाला. तिच्या पित्याने जमेल तसा तिचा सांभाळ केला परंतु ती पाच वर्षांची असताना सर्पदंश होऊन ते मरण पावले. हीच काय ती तिची आई-वडिलांची आठवण होती. निराधार शताक्षीला राजाश्रय मिळाला. समजूत यायला लागल्यावर तिच्या लक्षात आले ते तिच्या आणि प्रिय सखी धृमल हिच्या परिस्थितीमधले जमीन-अस्मानाएवढे अंतर. त्याचबरोबर राजाचे असलेले अनंत उपकार, त्यामुळे त्या सर्वांची परतफेड करण्यासाठी तिने राजघराण्यामध्येच नोकरी पत्करली.

राजकन्या शताक्षीला कायम सखीप्रमाणेच वागवे किंबहुना दोघी भगिनी वाटल्या तर त्यात वावगे वाटले नसते. असे असले तरीही शताक्षी आपली पायरी ओळखून वागत असे. दोघी जेव्हा राजवाड्याच्या भव्य पायऱ्या चढू लागल्या तेव्हाही असेच झाले. शताक्षी आपसूकच दोन पावले मागे सरकली आणि मोठ्या नम्रतेने तिने आपल्या मालकिणीला पुढे जाऊ दिले. आता शताक्षीमध्ये साराची कसलीही खूण नव्हती. अंतरीची ओळख पटली होती. त्यामुळे आपल्या या स्वकृतीचे साराला थोडे आश्चर्य वाटले. लाडा-कोडात वाढलेली सारा आई-वडिलांची एकुलती एक मुलगी होती. एरव्ही साध्या खेळातसुद्धा दासीची भूमिका तिने वठवली नसती. परंतु आता मात्र ती स्वतःच पूर्वायुष्य अनुभवत होती.

राजवाड्यातल्या प्रत्येक सेवकाचा मुजरा स्वीकारत धृमल निघाली आणि राजाच्या अंतःपुरात दाखल झाली. शताक्षीने तिला तिथून एकटे सोडले कारण तिला माहित होते की धृमलला आता त्याची गरज होती.

राजा मखमली पलंगावर विश्राम करत होता. राजाचा पलंग हा चंदनाचा असल्याने त्याचा एक मंद गंध सर्वत्र पसरलेला होता. आपल्या पित्याला पाहताच धृमलचे पितृप्रेम उफाळून आले. आपली कृती चुकीची आहे याची जाणीव असूनही ती जाऊन राजाला बिलगली. धृमलच्या कोमल स्पर्शाने राजाला जाग आली.

“आपल्या निद्रेमध्ये व्यत्यय आणल्याबद्दल, क्षमा असावी पिताजी!” राजा धात्रीने मंद स्मितहास्य केले आणि राजकन्येला जवळ घेतले.

“बाळ धृमल, आपल्या कोणत्याही कृतीचा आम्हाला त्रास होत नाही,” धृमलला पित्याच्या कुशीत शिरल्याचा अतीव आनंद झाला. बराचवेळ ती तशीच पडून होती. काही वेळानंतर तिला जाणवले, पित्याचे शरीर थोडे गरम वाटत होते.

“आपणास बरे वाटत नाही का? असे अवेळी का पडला आहात? ज्वर जाणवत आहे,” धृमलने काळजीने विचारले.

“कसले तरी भय वाटते आहे धृमल, काहीतरी विपरीत घडेल असे वाटते आहे,” राजा उसासून म्हणाला.

“मी आहे पिताजी, चिंता नसावी,” धृमलने आश्वासन देण्याचा प्रयत्न केला.

“त्याचीच तर जास्त चिंता वाटत आहे,” राजा थोडा संभ्रमात पडला होता. तो काहीतरी लपवत आहे असे धृमलला वाटले. खरे पाहता आपल्या पहिल्या बायकोबद्दल आजवर त्याने धृमलला काहीही सांगितले नव्हते किंबहुना तशी वेळ आली नव्हती. प्रथमपत्नीच्या आठवणी राजाच्या मनात आजही ताज्या होत्या. परंतु आता समोर असलेली धृमल ही भविष्यातून आलेली आहे याबद्दल संपूर्णतः अनभिज्ञ असलेल्या राजाने मौन धारण केले होते. त्याच्या मनातल्या उलथापालथीची कल्पना नसलेली धृमल चिंताक्रांत झाली. त्याचवेळी दुसरी राणी धरा अंतःपुरात दाखल झाली. राजकन्येने आपल्या आईला नमस्कार केला.

“माझेच चुकले, मी आपल्याला स्वप्नाबद्दल काही कल्पना द्यायला नको होती,” दुःखी स्वरात राणी म्हणाली.

“कसल्या स्वप्नाबद्दल आपण बोलत आहात?” मध्ये बोलू नये याचे भान असूनही धृमलला राहवले नाही. तिच्या या वाक्याने राणी धरा कमालीची दचकली. अकस्मात राजाच्या बिघडलेल्या तब्येतीने आधीच चिंताक्रांत दिसत असलेली राणी राजकन्येचे तिथले अस्तित्वच विसरली होती.

“धृमल, महाराज आपली केव्हाची वाट पाहत आहेत. ते काळजीमध्ये होते. आता काही दिवस आपण राजमहालामध्येच खेळावे,” राणी धराच्या आज्ञेवजा सूचनेने धृमल हैराण झाली. थोड्याच वेळापूर्वी तर त्या दोघी भेटल्या होत्या. पण मातेच्या चेहऱ्यावरील चिंता पाहून ती काहीही न बोलता तिथून बाहेर पडली. आता तिची नजर शताक्षीला शोधत होती.

राजकन्येच्या मागावरच असलेली शताक्षी कुठूनशी येऊन तिच्या पुढ्यात उभी ठाकली. राजकन्येने अगोदर आजूबाजूला कोणीही नसल्याची खात्री करून घेतली आणि नंतर तिला घडलेली कथा वर्णन केली.

“स्वप्न काय असावे, काही अंदाज येतो का?” शताक्षीने विचारले.

“नाही, परंतु ते माझ्याशी निगडीत असावे नाहीतर माताजींनी आपल्याला महालात खेळायला सांगितले नसते. तू पुढचे काही दिवस माझ्याच दालनात झोप म्हणजे आपल्याला चर्चा करता येईल,” बोलतच दोघीही राजकन्येच्या दालनात आल्या.

"धृमल, अगं आपण बाहेर गेलोच नाही तर राजकुमारी आणि इतरांना शोधणार कसे?" शताक्षीने काळजीने विचारलं.

"माताजींचे मन वळवावे लागेल. त्याशिवाय दुसरा पर्याय नाही. हा तोपर्यंत हे स्वप्न काय होते आणि माझ्यापासून काय लपवले जात आहे याचा उलगडा व्हायला हवा," असाच पहिला दिवस गेला.

दुसऱ्या दिवशी सर्वजण नेहमीच्या ठिकाणी वाट पाहून वाड्यावर आले. "आम्ही तुमची बराच वेळ वाट पाहिली. आपले आज भेटायचे ठरले होते," प्रवर्तन जरा जोरातच बोलून गेला.

"परिस्थितीच अशी आली की त्यापुढे आमचा काही उपाय झाला नाही," शताक्षीने त्याला समजावले आणि घडलेला सर्व इतिवृत्तांत सांगितला.

"धृमल तुझ्याशिवाय ही बातमी इतर कोणाला समजणे जरा कठीण आहे. राजवैद्यांचं काय म्हणणं आहे? कदाचित त्यांना माहिती असेल," वज्रसेनने शक्कल लढवली.

"तुझे म्हणणे बरोबर आहे परंतु एखादी गोष्ट मुद्दाम माझ्यापासून लपवली जात असेल तर राजवैद्य मला ती सांगतील याची शक्यता नगण्य आहे," धृमल म्हणाली.

"मला वाटतं माताजी काहीतरी मदत करू शकतील," प्रद्युम्न म्हणाला आणि सर्वांचा चेहरा उजळला. राजपुरोहितांची पत्नी कृती आणि महाराणी धरा यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. त्या एकमेकींच्या सखी होत्या. त्यामुळे राणीने यासंदर्भात काही सांगितले असल्याची शक्यता होती.

"ठीक आहे. तू विचारून सांग. काहीही गोष्ट महत्वाची असू शकते," वज्रसेन म्हणाला. "बाकी कालचा पहिला दिवस सर्वांचा कसा गेला? आणि काही महत्त्वाची बातमी आहे का?"

"मला तुम्हाला काहीतरी दाखवायचे आहे. काल मी निघालो आणि हा मला दिसला. मला तो विलक्षण आवडला आणि मी त्याला माझ्या सोबतच घेतले," प्रवर्तनने आपल्या

शेल्याचे बांधलेले टोक अलगद सोडवले आणि तत्क्षणी एक बेडूक आतून बाहेर आला. टुणकन उडी मारून तो बेडूक जवळच्या रिकाम्या आसनावर बसला जणूकाही ते आसन त्याच्याचसाठी ठेवलेले होते. सर्वांचे त्या बेडकामुळे मनोरंजन झाले.

"याचे काहीतरी नामकरण केले पाहिजे," वज्रसेन म्हणाला.

"याच्या पाठीवर सोन्याच्या रंगाचे पट्टे आहेत. सूर्याची किरणे पडली की तो तेजोमय दिसतो. म्हणून मी त्याचे नाव कनक ठेवले आहे. त्यालाही ते आवडले आहे कारण कनक म्हटले की डराव डराव करतो," प्रवर्तन बेडकाला गोंजारत प्रेमाने म्हणाला.

"चला छान झालं. फार काळानंतर आपल्यातला सभासद वाढला. मी माझी जतन केलेली पुस्तके चाळली. काही मिळते आहे का ते पाहिले. मला एक उपयुक्त माहिती मिळाली. या पुस्तकामध्ये मी जे वाचले आहे ते वाचून दाखवतो," असे म्हणून प्रद्युम्नने आपल्या सोबत आणलेला ग्रंथ काढला आणि त्यातले हवे ते पान उघडून तो वाचू लागला,

*कार्तविर्यार्जुन नाम राजा बाहू सहस्रवान ||*

*तस्य स्मरण मात्रेण गतं नष्टं च लभ्यते ||*

हा मंत्र एका कागदावर लिहून काढावा. ध्यानस्थ होऊन १०८ वेळा वरील मंत्राचा जप करावा. त्यानंतर तो कागद हरवलेल्या व्यक्तीची नेहमीची झोपायची जी जागा असेल त्या ठिकाणी रात्रीच्या वेळी जमिनीला स्पर्श होईल असा ठेवावा व त्यावर एखादा पाट अथवा लाकूड ठेवावे. वरील कृतीमुळे पळून गेलेल्या अथवा हरवलेल्या व्यक्तीच्या कानात कोणीतरी, "घरी चल... घरी चल...." असे सतत म्हणत असते. परिणामी ती पळून गेलेली अथवा हरवलेली व्यक्ती घरी परत येते. वस्तू हरवलेली असल्यास वरील मंत्राचा १०८ वेळा जप केल्यास हरवलेली वस्तू सापडते."

"छान आहे, कार्तविर्यार्जुन कोण आहे?" धूमलने विचारले. प्रत्येकजण आपल्यापरीने प्रयत्न करतो आहे हे पाहून तिला बरे वाटले.

“कार्तविर्यार्जुन राजे हे हैहय वंशाचे होते. प्रभू श्रीविष्णू यांच्या सुदर्शन चक्राचे ते अवतार म्हणून ओळखले जातात. शास्त्राप्रमाणे सुदर्शन चक्र कोणत्याही दिशेत वा कोणत्याही लोकांत जाऊन वांछित वस्तू शोधून आणण्यात सक्षम आहे. तसेच हे राजे देशभक्त होते. त्यांच्या दोन हातात एक हजार हातांचे बळ होते. त्यांना दत्तमहाराज सुद्धा प्रसन्न होते,” प्रवर्तनने माहिती पुरवली.

“मग तू ही कृती करून बघितली असशीलच,” प्रवर्तनने विचारले.

“हो मी आधी स्नान करून शुचिर्भूत झालो. त्यानंतर इथे लिहिल्याप्रमाणे मनोभावे मी सर्व केले. काल रात्री मला एक स्वप्न पडले. सर्वत्र अंधार होता आणि मला माझाच आवाज ऐकू येत होता, ‘मला इथून बाहेर काढ, मला सोडव,” प्रद्युम्नच्या बोलण्याने सर्वांना धक्का बसला.

“आपल्याला लवकरात लवकर काहीतरी केले पाहिजे,” शताक्षी छातीवर हात ठेवून म्हणाली.

“मित्रांनो मी सर्व गोष्टींचा विशेषतः रक्षाने सांगितलेल्या कथेचा खूप विचार केला. तेव्हा मला तीन प्रश्न पडले. मला वाटते या प्रश्नांची उत्तरे आपल्याला निष्कर्षापर्यंत नेऊन पोहोचवतील,” वज्रसेन म्हणाला.

“ते प्रश्न कोणते आहेत?” धूमलने घाईने विचारले.

“सांगतो, सांगतो. प्रश्न पहिला- जेव्हा धूमलचे सोळावे वर्ष पूर्ण झाले तेव्हाच तो अघटीत प्रकार घडला. याचा अर्थ असे काहीतरी होते जे तिला सोळावे वर्ष पूर्ण झाल्यावर मिळणार होते. ते काय होते?

प्रश्न दुसरा, राजकन्येचे मित्रमंडळ तिला शोधण्यासाठी कोठे गेले असावे?

प्रश्न तिसरा, राजा भानी आणि आपले महाराज यांच्यातील वैमनस्य सर्वश्रुत आहे. राजा भानीची नजर अनेक दिवसांपासून आपल्या राज्यावर आहे. महाराज जेव्हा अरण्यामध्ये होते त्याकाळात धात्रीवर्य काबीज करणे अगदीच सहज होते. असे असूनही राजा भानीने तसे का

केले नाही?" सर्वांचेच चेहरे आ वासले गेले. वज्रसेनने निर्माण केलेले प्रश्न खरोखरच अचाट होते आणि या सगळ्यात एक नवा शत्रू समोर दिसत होता तो म्हणजे राजा भानी!

एवढ्यात तिथे एक दासी आली. "क्षमा असावी राजकन्या, महाराजांचा निरोप आणला आहे. आपणा सर्वांना मुख्य दालनामध्ये बोलावले आहे," सर्वांना आश्चर्य वाटले. काहीतरी गंभीर विषय असल्याचे दासीच्या चर्येवरून दिसत होते. सर्वजण मुख्य दालनाच्या दिशेने निघाली. कोणीही आपापसात बोलत नव्हते कारण गुप्तता पाळणे आवश्यक होते. मुख्य दालनामध्ये महाराज, महाराणी, राजपुरोहित आणि प्रधानमंत्री उपस्थित होते. असे प्रथमच घडत होते. मुलांना पाहताच महाराजांची चलबिचल थांबली आणि ते शांत झाले.

"धृमल आपले सोळावे वर्ष पूर्ण होण्यास एक मास शिल्लक राहिला आहे. आपल्या जन्मदिनानिमित्त आम्ही आपणास एक भेट देऊ इच्छितो. त्या दिनी आपला राज्याभिषेक होईल आणि आपणाकडे हे राज्य सुपूर्त करण्यात येईल," सर्व मंडळ आश्चर्यचकित झाले. कारण पहिल्या प्रश्नाचे उत्तर सापडले होते. अशाप्रकारे दुसरा दिवस आणखी प्रश्न निर्माण करून संपला. त्या रात्री कोणालाही व्यवस्थित झोप लागली नाही कारण प्रत्येक जण असंख्य प्रश्नांच्या जाळ्यात अडकलेला होता.

मध्यरात्रीच धृमलला जाग आली. राजवाड्यात अजूनही सर्वत्र शांत होते. हवेत गारवा पसरलेला होता आणि बाहेर दंव पडत होते. राजकन्या अलगद पावलांनी तिच्या दालनाबाहेर आली. कारण तिला कसलीशी दबकी चाहूल जाणवली होती. कोणीतरी कण्हत होते. आपल्याला झालेला भास की सत्य याची पडताळणी करण्याचे तिने ठरवले. तसे पाहता आदल्या रात्रीही तशी जाणीव तिला झाली होती परंतु ग्लानीमध्ये असल्याने त्याकडे तिने दुर्लक्ष केले होते. आता बाहेर आल्यावर तिने जे पाहिले त्यावर विश्वास ठेवण्यास तिचे मन कचरू लागले. असे म्हणतात आपले डोळे कधी धोका देत नाहीत. परंतु आयुष्यात काहीवेळा अशा घटना घडतात की आपल्याला आपल्याच नजरेने धूळ चारली असे वाटते. धृमलच्या समोरून काहीतरी सरपटत वरच्या दालनात गेले. त्याची (?) चाल एकदम संथ होती. जणू काही ते दमले होते किंवा असेही म्हणता येईल की

भरपूर मद्यपान केल्यावर मद्यपीची जशी स्थिती होते तसे काहीतरी समोरच्याच्या चालीमध्ये होते. त्याच्या कण्हण्याचा आवाजही फारच अस्पष्ट होता.

एक क्षण धूमलचे हृदय थांबले. तिला खूप भीती वाटली. असे काहीतरी ती प्रथमच पाहत होती. आपले धनुष्य जवळ असायला हवे होते असेही तिला वाटले. शताक्षीला उठवण्याचा झालेला मोह तिने मोठ्या शिताफीने आवरला. कारण समोरच्याला चाहूल लागून उपयोग नव्हता. परंतु काही वेळाने तिच्या लक्षात आले की समोरचा आपल्याच नादात होता. त्याच्यासाठी आजूबाजूचे जग अस्तित्वातच नव्हते. तसेच सरपटत ते वरच्या दालनात निघून गेले. त्याचा पाठलाग करण्यासाठी धूमलने एक पाउल पुढे टाकले पण तिच्या बाजूंना कोणाचा तरी थंड स्पर्श झाला आणि ती कमालीची दचकली.

“केवढा घाम फुटलाय तुला? आणि या अवेळी तू इथे काय करते आहेस?” शताक्षीने काळजीने विचारले. धूमलने पुनः वळून पाहिले तर तिथे कोणीही नव्हते. “चल आतमध्ये जाऊया,” पाठलागाची वेळ निघून गेली असे लक्षात आल्यावर तिने शताक्षीच्या हाताला धरून तिला दालनामध्ये वळवले.

“शताक्षी तू कधी आलीस?” आतमध्ये आल्या आल्या धूमलने विचारले.

“तुला हात लावला तेव्हाच. मला अचानक जाग आली तेव्हा समजले तू बिछान्यामध्ये नव्हती. मला खूप काळजी वाटली. मी तुला खूप हाका मारल्या पण प्रत्युत्तर आले नाही. शेवटी मी दालनाबाहेर आले आणि तू दिसलीस,” शताक्षीने एका दमात खुलासा केला. ती खरोखर घाबरली असावी कारण तिचा आवाज फुलला होता.

“तुला समोर काही दिसले का?” तिला गदागदा हलवत धूमलने विचारले.

“न....नाही,” तिच्या या आविर्भावाने शताक्षी चांगलीच घाबरली होती. दालनातच धूमल येरझाऱ्या मारू लागली. ती जेव्हा कमालीची अस्वस्थ असायची तेव्हाच असे घडायचे. अनेक दिवसांत तिला असे शताक्षीने पाहिलेले नव्हते. यापूर्वी एकदा असे घडले होते तेव्हाचा प्रसंग शताक्षीला आठवला. राणी धरा यांची तब्येत बिघडली होती. तशा त्या निरोगी होत्या. आजवर शताक्षीने त्यांना कधीही आजारी म्हणून पाहिले नव्हते. त्यामुळे त्यांच्या आजारपणाची सर्वांना काळजी वाटत होती. त्यात भरीस भर म्हणून त्या औषध घ्यायला तयार नव्हत्या. अखेर राजपुरोहितांची पत्नी कृती यांनी मध्यस्थी केली होती. कोणाचंही न ऐकणाऱ्या

महाराणी यांनी आपल्या सखीचे ऐकले होते. त्यामुळे सर्वांच्या विशेषतः महाराजांच्या मनात कृती यांच्याबद्दल आदर निर्माण झाला होता. राणीच्या आजारपणामध्ये धूमल अशीच त्रस्त झाली होती.

बराच वेळ धूमलच्या येरझाऱ्या चालू राहिल्या. अखेर ती थोडी शांत झाल्यावर शताक्षीने तोंड उघडले.

“काय झाले आहे? काही चिंताजनक बाब आहे का? मला नाही सांगणार?”

“शतु, अगं मी एक भयंकर गोष्ट पाहिली. म्हणजे गोष्ट म्हणता येणार नाही. काय म्हणावं त्याला!” आठवणीने धूमलच्या अंगावर काटा आला. तिने पाहिलेल्या दृश्याचे कसलाही आडपडदा न ठेवता कथन केले.

“तुला भास झाला असेल अगं, असे कसे शक्य आहे?” शताक्षीचा विश्वास बसत नव्हता.

“मला देखील असेच वाटले होते. परंतु ते सत्य आहे. काहीतरी आहे जे आपल्याला माहित नाही. काहीतरी मोठं माझ्यापासून लपवलं गेलंय,” धूमल अस्वस्थ झाली.

“ठीक आहे, आपण उद्या बोलूया. आता तू झोप. शरीर थकवून चालणार नाही. अजून बराच पल्ला गाठायचा आहे,” शताक्षीने तिची समजूत काढली.

“झोप येईल असे वाटत नाही. प्रयत्न करते,” धूमल आडवी झाली. पण झोपेने तिच्यावर कृपा केलीच नाही. रात्रभर या कुशीवरून त्या कुशीवर फिरत राहण्यापलीकडे दुसरे काही तिला जमले नाही. दुसऱ्या दिवशी भल्या सकाळीच ती महाराजांना भेटायला गेली. आदल्या रात्रीचा प्रसंग सांगावा की नाही या संभ्रमात ती असतानाच तिथे प्रधानमंत्री उपस्थित झाले. धूमलला पाहून ते थोडेसे घुटमळले.

“काय बातमी आहे,” महाराजांनी विचारले.

“महाराज वरच्या दालनाबद्दल बोलायचे आहे,” प्रधानमंत्री अतिशय विनम्रपणे म्हणाले. त्यांच्या या वाक्याने महाराजांच्या चेहऱ्यावरचे हावभाव बदलले. धूमलकडे वळून

महाराज म्हणाले, “धृमल आपण खेळायला बाहेर गेलात तरी चालेल फक्त राजवाड्याच्या आवाराबाहेर जाऊ नका.” महाराजांच्या या उद्गारांनी धृमल आश्चर्यचकित झाली. परंतु थोडक्यात इथून बाहेर जा असे आपल्याला सांगण्यात येत आहे हे तिच्या लक्षात आले. मान हलवून ती तिथून निघाली.

मुख्य दालनामध्ये तिला शताक्षी दिसली. तिने बाकीच्यांना बाहेर भेटण्याचा निरोप देण्यास तिला सांगितले. त्याप्रमाणे शताक्षी निघून गेली आणि धृमल वरच्या दालनाच्या दिशेने निघाली. आजवर ती कधीही त्या बाजूला आलेली नव्हती. कधी तसा प्रश्नच आला नव्हता. तिचे दैनंदिन जीवन एवढे व्यस्त होते की तिला राजवाड्यातील वरच्या कक्षात जाण्याविषयी उत्सुकतादेखील निर्माण झाली नाही. परंतु कालच्या प्रसंगानंतर तिला त्याची आवश्यकता भासू लागली. असे काहीतरी होते जे वरच्या दालनामध्ये लपलेले होते आणि त्याची आजवर तिला जाणीव नव्हती. राजवाड्यामध्ये आश्वस्तपणे वावरणारी तिची पावले आज थरथरत होती. साधारण ५० पायऱ्या चढून ती वर आली. आता वरच्या दालनाच्या दिशेने जाणारा जिना दिसू लागला. धृमलने एक पाउल पुढे टाकले आणि तोच तिला कोणीतरी मागे खेचले. ती एवढी दचकली की पडता पडता वाचली. पाहते तर राणी धरा तिच्या मागे होती.

“माताजी आपण इथे कशा?” धृमलच्या तोंडून आश्चर्योद्गार बाहेर पडले.

“हे मी आपणास विचारावयास हवे. आपण इथे काय करता आहात?” राणी धराच्या चेहऱ्यावर आश्चर्य पसरले होते.

“काही नाही. या दालनामध्ये कधी आले नाही. म्हटले आज जरा पाय मोकळे करू,” खोटे बोलताना धृमलला अपराधी वाटत होते.

“आज आपले मित्रमंडळ दिसत नाही,” महाराणीने सहज विचारले.

“पिताजींनी बाहेर खेळावयास परवानगी दिली आहे. त्यामुळे आम्ही सर्व आता बाहेर भेटू,” धृमल म्हणाली.

“ठीक आहे, चला मी आपल्या न्याहारीची व्यवस्था केली आहे. खाऊन घ्या आणि मग जा!” राणी धरा म्हणाली.

“चला ना माताजी वरच्या दालनात जाऊन येऊ. मला पहायचे आहे,” धृमलने आपला हट्ट तसाच ठेवला.

“धृमल बाळ आत्ता वर गेलो तर बराच वेळ जाईल. त्यात तिथे थोडी अडगळ आहे. आम्हाला धुळीचा त्रास होतो हे आपणास माहित आहे. त्यामुळे आत्ता नको. आधी आपण माझ्यासोबत चला आणि काहीतरी खाऊन घ्या,” राणी धरा काळजीने म्हणाली. नाईलाजाने धृमलला तिच्यासोबत जाणे भाग पडले.

मंडळाची नेहमीची जागा राजवाड्याच्या आवाराबाहेर होती. त्या जागेची सर्वांना फार सवय झाली होती. ते एक हिरवळ असलेले मैदान होते. मुलांना खेळण्यासाठी महाराजांनी खास व्यवस्था केलेली होती. त्यांना बसण्यासाठी दगडी बाक बनवलेले होते. उन्हाच्या झळा बसू नये यासाठी झाडे लावलेली होती. गोळा फेक, बुद्धिबळ, रस्सीखेच, हुतूतू, हमामा, लगोरी, तळयात-मळयात, खो-खो, आट्यापाट्या, सुरपारंब्या, जलतरण, मल्लविद्या यासारखे अनेक क्रीडाप्रकार खेळण्यासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून दिलेले होते. जवळच एक नदी होती. तिची झुळझुळ सर्वांना मोहित करीत असे. परंतु सध्या त्या जागेकडे जाण्याची मुलांना मनाई होती. त्यामुळे राजवाड्याच्या आवारातील वटवृक्षाच्या छायेखाली सर्वांनी बसकण मारली. शताक्षीने घडलेल्या प्रसंगाची कल्पना दिली असल्याने सर्वजण धृमलच्या बोलण्याची वाट पाहत होते.

“वरच्या दालनामध्ये काहीतरी आहे. मला ते पहायचे आहे,” अखेर धृमलने तोंड उघडले.

“धृमल यासाठी आपल्याला रात्रीच्या वेळी प्रयत्न करावा लागेल,” प्रद्युम्न म्हणाला.

“अरे पण ते खूप धोकादायक असू शकते. समोर काय वाढून ठेवले आहे याची आपणास कल्पना नाही. अशावेळी आपण रात्रीच्या वेळी तेथे जाणे योग्य नाही,” प्रवर्तन म्हणाला.

“पण जोपर्यंत तिथे काय आहे ते कळत नाही तोपर्यंत माझ्या जीवाला स्वस्थता लाभणार नाही,” धृमल म्हणाली.

“थोडा विचार करावा लागेल. घाईने काही करणे अयोग्य आहे. आधी आज रात्री काय घडते ते पहा,” वज्रसेन म्हणाला आणि सर्वांना ते पटले.

“अरे हो, महत्त्वाचे सांगायचे राहिले. मी माताजींना त्या स्वप्नाविषयी विचारले. अगोदर त्यांनी खूप टाळाटाळ केली. परंतु नंतर त्यांनी मला त्याबद्दल सांगितले. महाराजांच्या प्रथमपत्नी महाराणींच्या स्वप्नामध्ये आल्या होत्या आणि त्यांनी सांगितले की धूमलच्या जीवितांस धोका आहे,” प्रद्युम्नने गौप्यस्फोट केला.

“कृती देवींनी ही गोष्ट सांगण्यासाठी तुझ्याकडून काही आश्वासन घेतले होते का?” धूमलने विचारले.

“हो तुला काही सांगायचे नाही असे वचन घेतले होते,” प्रद्युम्न म्हणाला.

“आणि तू वचन मोडलेस?” शताक्षीला आश्चर्य वाटले.

“आता मी भूतकाळामध्ये आहे. इथे मी एका ठराविक प्रयोजनाने आलो आहे. मी इथल्या कोणत्याही वचनाला बांधील नाही. माझे प्रयोजन पूर्ण करण्यासाठी आवश्यक ते सर्व करणे माझे कर्तव्य आहे आणि मला वाटते की कोणती गोष्ट आपणाला आपल्या ध्येयापर्यंत पोहोचवू शकते याची कल्पना नाही,” प्रद्युम्न म्हणाला.

“हा त्यामुळेच महाराज एवढे अस्वस्थ होते.” वज्रसेन बोलून गेला.

“नाही, नाही, केवळ असे स्वप्न पडले म्हणून पिताजी एवढे अस्वस्थ होणार नाही. अजून काहीतरी घडले आहे,” धूमल पुनः अस्वस्थ झाली. “आज आपला तिसरा दिवस आहे. हाती काही लागलेच नाही किंबहुना कोड्याचे जाळे अधिकच घट्ट विणल्यासारखे वाटते आहे.” यावर कोणीही काही बोलले नाही. तिसरा दिवस संपला आणि रात्री काहीही घडले नाही. रात्रभर जागरण केल्याने धूमल चांगलीच आजारी पडली. दोन रात्रीचे सलग जागरण आणि डोक्यामधले असंख्य विचार याचा तिच्या तब्येतीवर व्हायचा तोच परिणाम झाला. राजवैद्यांनी सक्तीची विश्रांती घ्यायला सांगितली आणि महाराणी यांनी राजवाड्याबाहेर पडावयास सक्त मनाई केली त्यामुळे पुढचे ५-६ दिवस कसलीही चर्चा झाली नाही. मुले धूमलला भेटायला येत परंतु तिच्या दिमतीला एवढी माणसे होती की त्यांना काही बोलणे शक्य होत नव्हते.

आजारपणानंतर आठवड्याभराने धृमल बगीचामध्ये आली. सारखे झोपून राहण्याचा तिला मनस्वी वैताग आला होता. पहाटेचीच वेळ असल्याने वातावरणात आल्हाददायक गारवा पसरलेला होता. धृमल तलावाजवळ आली. तिला पूर्वी घडलेला प्रसंग आठवला. आपली सुवर्ण मूर्ती तिला आज खूप मोहक वाटली. मूर्ती बनवताना एकटक बसून राहण्याचा तिला फार कंटाळा आला होता. परंतु आज सार्थक झाल्यासारखे वाटत होते. आज जणू त्या मूर्तीने तिला मोहून टाकलेले होते.

"धृमल," ओळखीचा आवाज आल्याने तिची भावसमाधी भंग पावली. तिने मान उचलून पाहिले तर समोर प्रवर्तन होता.

"तू इथे काय करतो आहेस?" धृमलला आश्चर्य वाटले.

"मी व्यायाम करण्यासाठी वाड्याच्या व्यायामशाळेमध्ये आलो होतो. तोच मला तिथे तुझी दासी दिसली. तिच्याकडून समजले की तू इथे आली आहेस ते! विचार केला त्यानिमित्ताने बोलता येईल. म्हणून आलो," धृमलच्या शेजारी बसत प्रवर्तन म्हणाला.

"बरे केलेस," एवढेच बोलून धृमल गप्प झाली. इतक्यात प्रवर्तनच्या शेल्यामधल्या कनकाने पाण्यामध्ये उडी मारली.

"अरे जास्त लांब जाऊ नको. तुला शोधणे कठीण होते," प्रवर्तन कनकाला उद्देशून म्हणाला. कनक पोहत मूर्तीच्या दिशेने गेला आणि मूर्तीवर चढून तिच्या मुकुटावर राजासारखा बसला. त्याच्या या कृतीचे दोघांना हसू आले.

"इथून वरचे दालन साफ दिसत आहे. ठीक कनकाच्या मागेच आहे बघ," वरच्या दालनाच्या दिशेने बोट दाखवत प्रवर्तन म्हणाला.

"अरे हो, आपण बाहेरून आत प्रवेश करू शकतो," धृमलचा चेहरा उजळला.

"म्हणजे?"

“म्हणजे, दालनाच्या प्रवेशद्वारावर भव्य कुलूप आहे. परंतु त्याच्या बाहेरच्या दिशेला भिंतीखाली कुठलाही पहारा नाही. ती खिडकी पहा. तिथपर्यंत पोहोचू शकलो तर आतमध्ये जाता येईल,” धृमलची आशा प्रज्वलित झाली.

“हो परंतु आतमधली खोली आपल्याला माहित नाही,” प्रवर्तन म्हणाला.

“ठीक आहे. त्यावर चर्चा करावी लागेल. परंतु हो लवकरच काहीतरी ठरवावे लागेल,” धृमल म्हणाली. यावर प्रवर्तन काहीच बोलला नाही.

“गप्प का झालास?” इति धृमल.

“खरं सांगू? मला इथे फार बरे वाटते आहे. कोणाला शोधलेच नाही तर आपण इथेच कायमचे राहू. काय वाईट आहे?” प्रवर्तनच्या बोलण्याचे धृमलला फार आश्चर्य वाटले.

“अरे काळामध्ये फेरफार करून आपण इथे आलेलो आहोत,” धृमल उत्तरली.

“आपल्याला इथे आणण्यात आलेले आहे. आपण स्वतःहून इथे आलेलो नाही,” प्रवर्तनने तिची चूक लक्षात आणून दिली.

“अरे हो, पण आपले हे भाग्य आहे की मागील जन्मामधील सुख आपल्याला पुनश्च उपभोगायला मिळत आहे. त्याहून महत्वाचे आपल्याला आपल्याच सुखासाठी काहीतरी करायला मिळत आहे,” धृमलने तोडीस तोड उत्तर दिले. यावर प्रवर्तन शांत राहिला. तो गप्प बसलेला पाहून धृमल पुनः बोलली.

“आणि विशेष उद्दिष्टाने आपण इथे आलेलो आहोत. ते पूर्ण करणे आपले कर्तव्य आहे. तसा शब्द रक्षाला आपण दिलेला आहे.”

“अगं कसला शब्द? तिने स्वतःच सर्व ठरवले आहे. त्यानंतर ती गायबच आहे आणि तुला असे नाही वाटत की तुला इथे राहणे जास्त चांगले. तिकडे परत गेल्यावर तुझे तेच रटाळ जीवन सुरु होणार. तुझी सावत्र आई तुला छळणार. तिथल्या अंधाऱ्या भविष्यापेक्षा इथला सोनेरी

भूतकाळ उपभोगणे कधीही चांगलेच," प्रवर्तन मनापासून म्हणाला. त्याच्या मनातले बाहेर पडत होते हे चांगले होते.

"तुझ्या आईचे काय? तिने कोणाकडे बघावे? तू गेल्यावर ती अगदीच एकाकी पडली असणार," धूमलने त्याला हलवीत विचारले.

"अगं इथे पण माताजी आहेतच. त्यांनाही माझी गरज आहे," प्रवर्तनने आपली सोय बघितली.

"अरे पण इथे त्यांना आधार द्यायला प्रवर्तन आहे. त्याला शोधल्यावर तो तुझी जागा घेणारच आहे," धूमल उत्तरली. तसा प्रवर्तन गडबडला. अखेर त्याच्या तोंडून सत्य बाहेर पडले.

"आईपेक्षा मला माझे आजारपण आठवते. परत तेच सर्व करावे लागेल. डॉक्टर, औषधे, सलाईन, वेगवेगळया टेस्ट, त्यातून शरीराला होणाऱ्या असंख्य वेदना, त्यात भरीस भर म्हणून आधार द्यायला आलेल्या लोकांच्या सहानुभूतीपर नजरा. आठवणसुद्धा नकोशी वाटते," अंगावर शिसारी आणत प्रवर्तन म्हणाला. आता तो नंदितच्या भूमिकेमध्ये शिरला होता.

"प्रवर्तन, मी एवढंच म्हणेन की प्राक्तन कोणालाही चुकलेलं नाही. जेवढं कर्म भोगायचं शिल्लक आहे ते भोगावं लागतंच. त्याला काही पर्याय नाही. कोणताही जन्म घे. कर्म करणे आपल्या हातात असते परंतु त्यानंतर आपली भूमिका संपते," एक दीर्घ श्वास घेऊन धूमल म्हणाली.

खरेतर ती स्वतःच्या मनालाही समजावत होती. कारण इथून पुनः भविष्यात जायचे तिच्यादेखील जीवावर आलेले होते. इथली गोड सावली सोडून तिथल्या धगधगत्या उन्हात जायला तिची तनू धजावत नव्हती. परंतु परिस्थितीपुढे ती हतबल होती. 'तिथल्या मोहमयी दुनियेत गुंतू नका' रक्षाचे वाक्य तिला आठवले. तिने किती योग्य सल्ला दिला होता. प्रवर्तन निघून गेला. आपल्या बोलण्याचा त्याच्यावर फारसा परिणाम झाला नसल्याचे धूमलला जाणवले.

ती राजवाड्यात आली. वज्रसेन आणि प्रद्युम्न तिची वाट पाहत बसले होते.

"खूप महत्वाची बातमी द्यायची आहे धूमल," वज्रसेन म्हणाला. दासीला बोलावून पुढचा काही वेळ आतमध्ये कोणालाही न पाठवण्याच्या तिने सूचना दिल्या.

"तुझे म्हणणे एकदम बरोबर आहे धूमल. केवळ स्वप्नामुळे महाराज एवढे अस्वस्थ होणार नाहीत. खूप मोठी गोष्ट घडून गेली आहे ज्याबद्दल आपण अनभिज्ञ आहोत," प्रद्युम्न म्हणाला. त्याच्या कपाळावर घर्मबिंदू चमकत होते.

"तू कशाबद्दल बोलतो आहेस?" न कळून धूमलने विचारले.

"मी सांगतो. प्रथम महाराणी धरा या वांझपणामुळे सदैव दुःखी असत एवढेच आपल्याला रक्षाने सांगितले. अतिशय महत्वाची गोष्ट तिने आपणापासून लपवली. ती म्हणजे महाराणींनी पुत्रप्राप्तीसाठी अघोरी मार्गाचा रस्ता अवलंबला होता. त्यासाठी बळी घेण्यासही त्यांनी मागे पुढे पाहिले नाही. त्यातच त्यांचा अंत झाला," वज्रसेन एका दमात बोलून गेला.

"तुम्हाला हे कोणी सांगितले," धूमलसाठी ही बातमी खूप मोठी होती.

"महाराजांची अतिशय जुनी आणि इमानदार सेविका सेवा," प्रवर्तनच्या बोलण्यावर धूमलच्या भुवया उंचावल्या गेल्या. "परंतु एवढी महत्वाची आणि गोपनीय बातमी दाईंनी तुम्हाला कशी सांगितली? प्राण गेले तरी महाराजांशी त्या बेईमानी करणार नाही."

"काळजीपोटी! मी त्यांना तुझ्या आजारपणाचे खरे कारण सांगितले. वज्रसेनची तशी उक्ती होती. त्यादिवशी महाराज वामकुक्षीसाठी दालनामध्ये गेले होते. नुकत्याच संपन्न झालेल्या सभेची आवारावर करण्यात मग्न असलेल्या दाईंचे लक्ष मी वेधून घेतले. तुझ्याविषयी विचारपूस केली असता त्या अतिशय दुःखी दिसल्या. तुझ्या आजारपणामुळे त्या चिंताक्रांत होत्या. तेव्हा मी त्यांना सांगितले की अर्धवट मिळालेली माहिती कधीही तापदायक असते. प्रथमराणीविषयी मी बोलत असल्याचे समजल्यावर त्या थोड्या अस्वस्थ झाल्या. महाराजांनी या विषयी मौन धारण केले आहे आणि त्याचाच राजकन्येला जास्त त्रास होतो आहे. आपल्यापासून काहीतरी लपवले जात आहे या भावनेने तिच्या मनात घर केले आहे असे सांगितल्यावर त्यांनी तोंड उघडले आणि मला माहिती पुरवली. वरचे दालन प्रथम महाराणी यांचे असून त्यांच्या पश्चात् ते बंद केले आहे तरी तिथे जाऊ नये असा सल्लादेखील दिला," प्रद्युम्न म्हणाला.

“परंतु वरच्या दालनाबद्दल तू त्यांना काही विचारले होतेस का?” धृमलने प्रद्युम्नला प्रतिप्रश्न केला.

“नाही, पण....” प्रद्युम्न विचारात पडला.

“वरच्या दालनाविषयी आपल्याशिवाय आणखी कोणाला माहित होते?” वज्रसेन म्हणाला.

“माताजींना, केवळ त्यांनीच मला जाताना पाहून हटकले होते,” धृमल म्हणाली.

“अगं मग बरोबर त्यांनीच सेवा दाईंना तुझ्या पाळतीवर ठेवले असणार,” वज्रसेनने खुलासा केला.

“माताजी खरोखरच महान आहेत,” धृमलच्या डोळ्यांत पाणी आले.

“धृमल आता पुढची आखणी करावी लागेल,” वज्रसेनने तिला आधारासाठी थोपटले.

“पण प्रथमराणी तर आता अस्तित्वात नाही,” धृमलने विचारले.

“हो पण अघोरी क्रिया करणाऱ्यांचे काही सांगता येत नाही. त्यात महाराजांच्या द्वितीय पत्नी आणि विशेषतः त्यांना झालेल्या अपत्यावर त्यांची विशेष नाराजी असणार,” वज्रसेनने स्पष्ट केले.

“पण मग प्रश्न असा आहे की आजवर मला कशी हानी पोहोचली नाही?” धृमलने विचारले.

“प्रश्न बरोबर आहे धृमल. आता तुझा राज्याभिषेक होणार. त्यानंतर तुला सर्वाधिकार मिळतील. आजवर तू अबोध होतीस,” प्रद्युम्न म्हणाला.

“मनाला पटत नाही. आता मी सुजाण आहे. अजाणतेपणी माझ्यावर हल्ला करणे सोपे होते. असे असताना आता त्या माझ्यावर हल्ला का करणार आहेत?”

“मला वाटते महाराज यावर काहीतरी सांगू शकतील,” वज्रसेन म्हणाला.

“मी त्यांच्याशी बोलण्याचा खूप प्रयत्न केला आहे. परंतु त्यांनी त्यासंबंधी एक अवाक्षरदेखील काढले नाही,” धृमल म्हणाली.

“मग तू महाराणींशी बोल. प्रथम महाराणींविषयी समजणे खूप महत्वाचे आहे,” प्रद्युम्न म्हणाला.

“मी आत्ताच माताजींना विचारते. आधीच उशीर झाला आहे. असेच दहा दिवस उलटून गेले. लवकर काहीतरी मार्ग दिसायला हवा आहे,” धृमलच्या मुठी आवळल्या गेल्या. ती तडक महाराणींकडे निघाली. तिच्या चेहऱ्यावर निश्चय दिसत होता.

नुकतेच स्नान संपन्न झालेल्या महाराणी प्रसाधनगृहात होत्या. दासी त्यांना आभूषणे परिधान करण्यात आणि त्यांचा विपुल केशभार सोडवण्यात मश्गुल होत्या. धृमलला एकांत हवा होता. त्यामुळे ती त्याच पावली परत फिरण्यासाठी वळली आणि तिला महाराणींची हाक ऐकू आली,

“धृमल, बाळ यावे.” धृमल राणी धराच्या सन्मुख बसली.

“काय झाले? आता आपली तब्येत कशी आहे?” राणी धराने विचारले.

“आता बरे वाटते आहे. मला आपणाशी थोडे महत्वाचे बोलायचे आहे. आपली आज्ञा असेल तर मी थोड्या वेळाने येते,” धृमल म्हणाली. तिच्या चेहऱ्यावरचे भाव ओळखून राणीने दासींना बाहेर जावयास सांगितले.

“बोला राजकन्या काय झाले आहे? काही समस्या आहे का?”

“माताजी, मला प्रथम महाराणींविषयी माहिती हवी आहे,” धृमलच्या या प्रश्नाने राणीचा चेहरा पांढरा पडला. हा प्रश्न तिच्यासाठी एवढा अनपेक्षित होता की त्या धक्क्यातून सावरायला तिला थोडा वेळ गेला.

“आपणास काय कळले आहे?” राणीने विचारले.

रात्री पाहिलेला प्रसंग बाजूला सारून धृमलने सेवा दाईकडून कळलेली माहिती सांगितली. पण ती सांगताना दाईचा उल्लेख तिने केला नाही. "माताजी मला कळले पाहिजे. पिताजी काही सांगणार नाहीत. माझ्या जीवाची घालमेल होत आहे. कृपया आपण सहाय्य करावे," धृमल अजीजीने म्हणाली. राणी उठून तिच्याजवळ गेली आणि तिने तिला जवळ घेतले.

"बाळ, ही गोष्ट आपणाला वेळ आल्यावर आम्ही स्वतःच सांगणार होतो. परंतु तशी कधी वेळच आली नाही. महाराजांचे मत होते की आपणास हे कधी कळू नये परंतु आता काही दिवसांत आपला राज्याभिषेक होईल. या राज्याचा संपूर्ण कारभार आपणावर सुपूर्त करून आम्ही वनात निघून जाऊ तरी त्यापूर्वी सर्व पूर्वेतिहास आपणास सांगणे हे आम्हाला आमचे कर्तव्य वाटते," एका एका शब्दावर जोर देत महाराणी म्हणाली.

"आपण जर मला सोडून जाणार असाल तर असे सिंहासन मला नको," धृमलला मात्या- पित्यापासून दूर जायची कल्पनाही सहन होईना.

"धृमल, आपण आता सुजाण आहात. केवळ महाराणी नाही तर या राज्याची आपण माता व्हाल याची आम्हाला खात्री आहे. प्रजेवर मुलाप्रमाणे प्रेम करणे आणि तिचा सांभाळ करणे आपले प्रथम कर्तव्य आहे. आम्ही सदैव आपणासोबत आहोत. काळजी नसावी. मन घट्ट करून ऐका,

> महाराजांच्या प्रथमपत्नी महाराणी यांना अनेक वर्षे होऊन देखील अपत्यप्राप्ती होत नव्हती. त्यांनी आणि महाराजांनी त्यासाठी अनेक उपाय केले. जप, तप, व्रत-वैकल्य जे जे शक्य होईल ते ते सर्व केले. परमेश्वराच्या कृपेने अनेक वर्षांनी महाराणींना कन्यारत्न झाले. परंतु राणी त्यावर संतुष्ट नव्हत्या. आपणास अपत्य प्राप्ती झाली याबाबत आनंद बाळगण्याऐवजी पुत्रप्राप्ती न झाल्याने त्या दुःखी झाल्या होत्या. कष्ट फुकट गेल्याने त्यांचा क्रोध अनावर झाला आणि त्यातच त्यांनी आपल्या कन्येचा प्राण घेतला. त्यानंतर सर्व चांगुलपणावरची जणू त्यांची श्रद्धाच उडाली आणि पुत्रप्राप्तीसाठी त्या वाममार्गाला लागल्या. त्याचवेळी त्यांना गर्भार स्त्रीचा बळी देण्याचा सल्ला मिळाला आणि त्यांनी एका दासीला जीवे मारण्याचा प्रयत्न केला. आजवर कानावर आलेल्या गोष्टींकडे महाराजांनी दुर्लक्ष केले होते. परंतु आपल्या

कन्येच्या मृत्युनंतर महाराजांचा राणींवरचा संशय बळावला. त्यामुळे त्यांची ही योजना महाराजांना अगोदरच कळली. परिणामी महाराणींना आपल्या योजनेमध्ये अर्धेच यश मिळाले. म्हणजे ती गर्भार स्त्री मरण पावली परंतु तिचे मूल वाचले. महाराजांनी राणींना अंधार कोठडीत बंद केले आणि अखेर त्यातच त्या मरण पावल्या,"

एवढे बोलून राणी धराने पाण्याचे भांडे तोंडाला लावले. त्यांचे ओठ शुष्क पडले होते.

"मला माफ करा माताजी मी आपणास कष्ट दिले. परंतु अजूनही काही प्रश्न आहेत. वरच्या दालनात असे काय आहे की आपण मला जाऊ देत नाही?" तिचा प्रश्न ऐकून राणीचा चेहरा काळवंडला.

"महाराजांनी महाराणींना त्याच दालनात बंद केले होते. त्यांच्या मृत्युनंतर तिथे अनेक अनुचित प्रकार घडले. काहींना त्यांचे आवाज ऐकू आले. काहींना त्या तिथे दिसल्या. त्यामुळे ते दालन राजापुरोहितांना विचारून महाराजांनी बंद केले. तिथे कोणालाही जायची आज्ञा नाही."

"माताजी आपणास कोणते स्वप्न पडले होते ज्यामुळे महाराज अतिशय अस्वस्थ झाले. ते माझ्या बाबत होते का?" धृमलने कोणताही आडपडदा न ठेवता थेट प्रश्न विचारला. यावर काही क्षण राणी धरा शांत राहिल्या. काही वेळाने त्या पुनः बोलू लागल्या.

"राणी माझ्या स्वप्नात आल्या होत्या. अतिशय विद्रूप दिसत होत्या. त्यांनी मला आपणास जीवे मारण्याची धमकी दिली. मी खूप घाबरले. मला सहन झाले नाही आणि मी सर्व कल्पना महाराजांना दिली," राणी धराच्या चेहऱ्यावर आताही स्वप्नाची भयानकता दिसत होती. ती भयभीत झाली होती.

"माताजी घाबरण्याचे काहीच कारण नाही. आपणास माहित आहेच आम्ही आपले रक्षण करू शकतो आणि आजवर आमच्या जीवाचे काही बरे वाईट करणे त्यांना सोपे होते." धृमलला पुढचे बोलूही न देता राणीने घट्ट मिठी मारली आणि ती रडू लागली.

"असे अभद्र बोलू नका. मला आपली काळजी वाटते. आजवरचे वेगळे आणि आता वेगळे," राणी धरा अकस्मात बोलून गेली.

“आता असे काय वेगळे आहे माताजी?”

“याउपर आम्ही आपणास काही सांगू शकत नाही धृमल. केवळ एवढेच सांगतो की राज्याभिषेकापर्यंत आपण जपावे,” एवढे बोलून राणी धराने धृमलकडे पाठ केली. मिळालेली माहितीसुद्धा पुष्कळ होती. आपल्यामुळे आपल्या आईला नाहक त्रास सहन करावा लागत आहे या भावनेने धृमल दुःखी, कष्टी झाली.

“आपल्याला दुःख दिल्याबद्दल क्षमस्व,” एवढे कसेबसे बोलून गळ्याशी दाटून आलेला हुंदका धृमलने दाबला. ती तडक तिथून निघाली. दालनामध्ये सर्वजण तिची वाट पाहत होते. धृमलचा चेहरा थोडा थकल्यासारखा दिसत होता. तिने राणी महालामधला सर्व वृत्तांत मंडळाला कथन केला.

“या सगळयावरून हेच सिद्ध होते की प्रथमराणी धरा यांनीच मुलांना पळवले आहे आणि सध्या तरी सर्वांना शोधण्याचा मार्ग वरच्या दालनामध्ये दिसतो आहे,” प्रद्युम्न म्हणाला.

“अजूनही काही प्रश्न अनुपस्थित राहतात. राज्याभिषेकापर्यंत धृमलने विशेष सावध का राहावे? माझे मागचे दोन्ही प्रश्न अनुत्तरित आहेत,” वज्रसेन विचारात पडला होता.

“प्रधानमंत्रींना विचार ना काहीतरी! ते तुला सांगतील,” धृमल म्हणाली.

“हो मी तेच करणार आहे. प्रद्युम्न तुलाही तुझ्या पिताजींना विचारावं लागेल. कोणाकडूनही विशेष माहिती मिळू शकते,” वज्रसेन म्हणाला.

“मला राहून राहून त्या मुलीचे वाटते आहे. माझ्यासारखाच तिलाही आईचा सहवास लाभला नसेल,” शताक्षी बोलून गेली. तिच्या या वाक्यावर सर्वच गप्प झाले. अनाथपणे वाढलेल्या शताक्षीच्या मनात पोरकेपणाची भावना कायम होती.

“शतू मी तुला शब्द देते. आपल्याच मुलीला मारणाऱ्या आणि आपल्या हव्यासासाठी अनेकांचे आयुष्य उध्वस्त करणाऱ्या या राणीला मी नक्कीच धडा शिकवेन. आता माझे उद्दीष्ट केवळ आपले स्वरूप परत आणणे नाही तर या सगळयाचा मुळापासून नाश करून माझ्या राज्याचे रक्षण करणे आहे,” धृमल कठोरपणे म्हणाली.

असे बोलताना तिच्या चेहऱ्यावर क्रोधाची लाली पसरली होती. तिच्या डोळयांच्या कडा पाणावल्या होत्या. तिचे नाजूक ओठ थरथरत होते. आजारपणामुळे आणि या सर्व चिंतेने तिची तनू थोडीशी कृश झाली होती. तिच्या नव्या रुपाकडे वज्रसेन पाहत राहिला. त्याला मनापासून तिला मदत करावीशी वाटत होती. गेल्या काही दिवसात धृमल त्याला नव्याने उलगडली होती. आजवरचा तिचा हट्टी आणि बालिश स्वभाव लुप्त झाला होता. धृमल कायमच त्याच्यासाठी सर्वात विशेष ठरली होती. आजवर त्याला त्यांच्यामधली मैत्री जाणवलेली होती. परंतु काही दिवसांपासून त्याच्या नजरेसमोर केवळ तिची छबीच साकारत होती. रात्रीही कितीतरी वेळ तो तिचाच विचार करत असे. आज त्याच्या मनाने हे मान्य केले होते की त्याला धृमल आवडत होती. मैत्रीच्याही पलीकडे आवडत होती. परंतु हे प्रेम असेल याबद्दल तो साशंक होता. त्याला आता आठवले की देवकच्या मागे इतक्या मुली लागलेल्या असूनही त्याला कधीही कोणाहीविषयी जवळीक वाटली नाही. आई बाबांना आवडलेली आस्था ही कितीही साधी, शांत आणि समंजस असून त्याला तिच्याबद्दल प्रेम वाटले नाही. त्यावेळी त्याला याबद्दल कायम आश्चर्य वाटायचे. आता या जन्मामध्ये त्याला त्या प्रश्नाचे उत्तर सापडले होते.

परंतु धृमल आता या राज्याची राणी होणार होती. कितीही झाले तरी तो प्रधान पुत्र होता, राज्याचा सेवक होता. महाराणीची अभिलाषा सेवकाने बाळगणे गैर होते. परंतु जर इथून सुटका झाली तर अनन्याला तो नक्कीच मागणी घालू शकत होता. त्याच्या या निर्णयाचे कधीही घरी स्वागतच होणार होते. देवकला कदाचित अनन्या स्वीकारेल पण वज्रसेनला धृमल स्वीकारेल का? अनन्यासाठी इथून बाहेर पडणे त्याला महत्वाचे वाटले. कारण या जन्मात नाही पण निदान पुढच्या जन्मात तरी धृमल त्याची होणार होती. या सर्व विचारांनी त्याच्या मनात गर्दी केली.

"आम्ही सगळे तुझ्या सोबत आहोत धृमल," त्याच विचारात तो बोलून गेला. त्याच्या आवाजातील अपरिचित ओलाव्याने शताक्षी चमकली. परंतु आपल्याच नादात असलेल्या धृमलला याची कल्पनाही नव्हती. भावनेच्या भरात वज्रसेनने धरलेल्या हातातील स्पर्शाची ओळख तिला झालीच नाही.

धूमलशी बोलून घरी आलेला प्रवर्तन त्रासलेला होता. आपल्याच स्वार्थी विचारांकडे दुर्लक्ष करण्याचा तो केविलवाणा प्रयत्न करत होता.

पण अखेर त्याच्या मोहाने कर्तव्यावर विजय मिळवला आणि इथून पुढे मंडळामध्ये सहभागी व्हायचे नाही असे त्याने ठरविले. त्यामुळे बोलवायला आलेल्या प्रद्युम्न आणि वज्रसेनला काहीतरी बहाणा सांगून त्याने येत नसल्याचे कळविले आणि बाहेरच्या बाहेर त्यांची बोळवण केली. परिणामी आजच्या मंडळाच्या संभाषणात तो सहभागी झालाच नाही.

पुढचे काही दिवस कोणाला भेटावे लागू नये म्हणून आजोळी जाण्याचा त्याने निर्णय घेतला. प्रवर्तनचे आजोळ जवळच असल्याने पायी जाण्याचे त्याने ठरवले.

संध्याकाळची वेळ होती. प्रवर्तन आता मंडळाच्या नेहमीच्या खेळायच्या जागी आला. त्याला पुनश्च सर्वांची आठवण आली. आपले हे पळपुटे धोरण त्याला रुचले नाही. तिथल्याच वडाच्या झाडाखाली तो काही वेळ बसला. स्वतःवर ताबा मिळवणे त्याला कठीण जात होते. ती सर्व काय करत असतील? त्यांना काही उपाय सापडला असेल का? माझी मदत आवश्यक असेल का? असे एक ना अनेक विचार त्याचे शोषण करीत होते. अशातच एक स्त्री पाण्यासाठी नदीवर घागर घेऊन येताना त्याला दिसली. डोक्यावरच्या पदराने तिने संपूर्ण चेहरा झाकला होता. खरंतर धात्रीवर्य राज्यात घुंगट पद्धत नसल्याने तिच्या या कृतीचे त्याला थोडे आश्चर्य वाटले. पण पुनः विचारांनी त्याचे चित्त काबीज केले आणि तो त्या स्त्री बद्दल विसरून गेला.

काही वेळाने त्याला तिथे कोणीही दिसले नाही. आपण आपल्या नादात एवढे कसे दंग झालो की एक स्त्री पाणी भरून निघून गेली तरी आपल्याला कळले नाही याचे त्याला खूप आश्चर्य वाटले. त्याच विचारात निघून जाताना त्याला जी गोष्ट दिसली तिने त्याला बधीर केले. नदीकिनारी पायांचे ठसे होते. ते ठसे चांगलेच मोठे वाटत होते. जणू काही कोणीतरी राक्षस गेला असावा. एकच क्षण प्रवर्तन घाबरला पण नंतर त्याच्यातला सैनिक जागा झाला. हे काहीतरी अपरिचित आणि उपद्रवी तर नाही ना याची खात्री करणे आवश्यक होते. राज्यावर आणि विशेषतः मंडळावर जर कोणते संकट येणार असेल तर त्याची शहानिशा करणे आणि प्रसंगी

त्याचा सामना करणे त्याला या क्षणी अत्यावश्यक वाटले. पाऊल खुणांचा मागोवा घेत निघाले असता त्याच्या लक्षात आले की त्या नदीकडे संपत होत्या. म्हणजे नदीमधून पलीकडे काहीतरी गेले होते. नदीपलीकडे जंगल असल्याने तेथे जाऊन पाहणे आवश्यक होते. पोहण्यामध्ये पारंगत असलेल्या प्रवर्तनने पाण्यात उडी मारली आणि पाहता पाहता तो नदी पलीकडे गेला. आपला भिजलेला शेला काठावर ठेऊन तशाच ओल्या धोतराने तो जंगलामध्ये निघाला.

सूर्यास्त होण्यास काहीच अवकाश होता पण जंगल चांगलेच अंधारलेले होते. आपण किती वेळ चालतोय याचे त्याला भानही नव्हते. आता तो बराच आतमध्ये आलेला होता. काहीच दिसत नसल्याने आता परत मागे फिरण्याचा विचार प्रवर्तनच्या मनात आला परंतु परतीचा रस्ता आता अंधारात गुडूप झाला होता. त्यामुळे सकाळपर्यंत वाट पाहणे क्रमप्राप्त होते. मूळतः निडर असलेल्या प्रवर्तनला अंधाराची भीती वाटत नव्हती मात्र रात्रभर कुठे थांबायचे हा प्रश्न त्याला सतावू लागला होता. इकडे तिकडे पाहत परिसराचा त्याने अंदाज घेतला. बाहेर बोचरी थंडी होती. त्यातच पोहत आल्याने त्याचे धोतरही ओले झाले होते परिणामी त्याला चांगलेच थंड वाटू लागले होते. जवळ कुठे दगड दिसतात का ते पाहण्यासाठी तो वाकला आणि त्याचवेळी कोणीतरी मागून त्याच्यावर हल्ला केला. डोक्यावर बसलेला फटका एवढा तीव्र होता की त्याची शुद्धी हरपली. पडताना हल्लेखोराला पाहण्याचा त्याने प्रयत्न केला परंतु समोरची व्यक्ती बरीच धूसर झाली होती.

जवळच्याच ओल्या हिरवळीवर प्रवर्तन निश्चेष्ट होऊन कोसळला.

दुसऱ्या दिवशी सर्वजण त्यांच्या नेहमीच्या ठिकाणी पुनः एकत्र जमली. वज्रसेन आला नव्हता. त्यामुळे तोपर्यंत नदीजवळ बसून गप्पा मारायचे त्यांनी ठरवले.

“प्रवर्तनला बोलावले का? काल पण तो आला नव्हता.” शताक्षी म्हणाली.

“आम्ही काल सकाळी त्याच्याकडे गेलो होतो परंतु तो आलाच नाही. काहीतरी कामात असेल,” प्रद्युम्न म्हणाला.

"मग आज काय झाले?" धूमलने विचारले.

"अगं आज मी गेलोच नाही. वज्रकडे गेलो तर तो म्हणाला मला वेळ होईल म्हणून त्याला सांगितले की प्रवर्तनला येताना घेऊन ये आणि मी इथे आलो. तुला तर माहितच आहे मला प्रवर्तनचे घर तसे लांब पडते. त्याच्याकडे विशेष फेरी मारायला मला इथे उशीर झाला असता." प्रद्युम्न एक एक दगड पाण्यात टाकत म्हणाला.

"बरे झाले गेला नाहीस. तसेही जाऊन तुझी फेरी फुकटच गेली असती," शून्यात बघत धूमल म्हणाली.

"असे का बोलते आहेस?" शताक्षीने प्रद्युम्नच्या मनातला प्रश्न विचारला. यावर धूमलने तिच्या आणि प्रवर्तनमधल्या झालेल्या संभाषणासंदर्भात त्यांना सांगितले. दोघेही अवाक् झाली. कोणी काही बोलणार एवढ्यात वज्रसेन आला. बहुधा तो धावत आला असावा कारण चांगलाच धापा टाकत होता. तो काहीतरी बोलू पहात होता पण त्याला लागलेली धाप इतकी होती की ओठांतून केवळ फू फू असा फुत्कारच बाहेर पडत होता.

"अरे आधी जरा इथे बस. तोपर्यंत मी नदीवरून पाणी आणून तुला देते. केवढा दमला आहेस?" शताक्षी आर्जवाने म्हणाली.

"मग सगळयांसाठीच पाणी घेऊन ये," वज्रसेन म्हणाला.

"असे का म्हणतो आहेस?" धूमलने साशंक विचारले.

"आता मी बातमीच अशी सांगणार आहे," वज्रसेन म्हणाला. त्याचा फुललेला श्वास शांत झाल्यावर त्याने बोलायला सुरुवात केली.

"धूमल आता मी जे सांगणार आहे त्याने आपल्या बऱ्याच प्रश्नांची उत्तरे मिळणार आहेत. महाराणींनी आपल्याला अर्धी माहिती दिली. तरीही चित्राचे बरेच तुकडे अजून अपूर्ण आहेत. मी ते जोडण्याचा प्रयत्न केला. मी त्या साधूला शोधून काढले जो प्रथम महाराणींना चुकीचे सल्ले देत होता. त्याच्याकडून मला खूप महत्वाची बातमी मिळाली आहे." वज्रसेनची लय तोडत शताक्षीने विचारले.

"पण तुला तो सापडला कुठे?"

“सांगतो, तर प्रथम महाराणींचे माहेर आपल्या राज्यापासून ४ कोस दूर आहे. माताजींनी मला ही माहिती पुरवली. मग मी माझ्या दुताला तिकडे पाठवले. त्या दुताकडून मला बरीच माहिती मिळाली. महाराणी अतिशय धार्मिक होत्या. त्यांचे महाराजांवर खूप प्रेम होते. एवढे की त्या लग्नानंतर कधीही माहेरी गेल्या नाही. परंतु त्यांच्या माहेरच्या राज्यातून एक साधू महाराणींना भेटायला धात्रीवर्यमध्ये येत होता. महाराणींचा त्याच्यावर खूप विश्वास होता. महाराणींच्या मृत्युनंतर मात्र तो कोणालाही दिसला नाही. मग मी राजवाड्यामधून त्या साधूचे वर्णन घेतले आणि काही खास सैनिकांना त्याच्या शोधार्थ पाचारण केले. मला यश मिळाले. आता तो साधू आपल्या कैदेत आहे,” वज्रसेन बोलायचा थांबला.

“त्याने काय माहिती दिली ती आधी सांग,” धूमल म्हणाली.

“त्याने हे कबूल केले की पुत्रप्राप्तीसाठी महाराणी अतिशय व्याकूळ झालेल्या होत्या. त्यांना त्याने गर्भार स्त्रीचा बळी घेण्याचा सल्ला दिला. परंतु....” एवढे बोलून वज्रसेन बोलायचा थांबला. पुढचे बोलावे की न बोलावे याचा तो विचार करत होता.

“परंतु काय? वज्र आता तू थांबू नको. कोणताही विकल्प मनात न आणता सांग की काय झाले,” प्रद्युम्न घाईने म्हणाला.

“परंतु साधूने हे सांगितले होते की जर हे करताना कुठे चूक झाली तर त्याचे फळ मिळणार नाहीच उलट गर्भार स्त्रीला मारल्याने ती एक हत्या होईल ज्याचे परिणाम भयानक असतील,” वज्रसेन म्हणाला.

“पण प्रथम राणी केवळ गर्भार स्त्रीला मारू शकली. तिचा गर्भ तर जिवंत राहिला,” धूमल म्हणाली.

“हो, या घटनेनंतर एकदाच साधू महाराणींना भेटू शकला. त्यावेळी त्याने त्यांना त्या गर्भाला मारायला सांगितले परंतु राणी त्यात अपयशी ठरल्या कारण तत्पूर्वी महाराजांना सर्व समजले होते आणि त्यांनी त्यांची योजना उधळून लावली तसेच त्या अर्भकाला संरक्षण दिले होते. त्यानंतर मी प्रथम महाराणींच्या मृत्यूविषयी थोडी माहिती मिळते का ते पाहिलं परंतु पिताजींकडून मला जी माहिती मिळाली ती फारच धक्कादायक होती. महाराजांनी महाराणींना त्यांच्या दालनामध्ये कैद केले होते. त्यांना बाहेर येण्यास मनाई होती. परंतु एक दिवस महाराणी

त्यांच्या दालनातून गायब झाल्या. सर्वत्र शोधूनही त्या सापडल्या नाही. त्यांच्या अकस्मात जाण्याने महाराजांच्या आयुष्यात एक कधीही न भरून येणारी पोकळी निर्माण झाली," वज्रसेन म्हणाला.

"महाराणी कुठे गेल्या असतील? बंद दालनामधून त्या कुठे गायब झाल्या असतील? आणि आजवर कधीही न घाबरलेले माता पिता आता का घाबरत आहेत?" धूमल म्हणाली.

"या सगळ्याचे उत्तर महाराज देऊ शकतील. आपल्याला त्यांची भेट घेणे आवश्यक आहे," वज्रसेन म्हणाला. सर्वजण तशीच राजवाड्याला निघाली. नुकतीच राजसभा आटोपली होती. महाराज आज शिकारीला बाहेर पडणार होते त्याआधी त्यांची भेट घेणे अत्यावश्यक होते. धूमल त्यांच्याजवळ गेली आणि त्यांना म्हणाली,

"पिताजी मला अतिशय महत्वाचे बोलायचे आहे."

"बोला धूमल? काय झाले आपण एवढ्या घाबरलेल्या का आहात?" राजाने काळजीने विचारले.

"पिताजी, मला अनेक गोष्टी कळलेल्या आहेत. मला आपणास विचारायचे आहे की प्रथम महाराणी धरा यांच्या भीतीने जर आपण मला राज्याभिषेकापर्यंत काळजी घ्यावयास सांगत असाल तर माझे धनुष्य तयार आहे आणि माझा स्वतःवर संपूर्ण विश्वास आहे. कोणताही धोका होणार नाही. परंतु एक भावी महाराणी म्हणून मला सर्व माहित असणे खूप महत्वाचे आहे. माझी आपणास विनंती आहे की आपण काही लपवू नये," प्रत्येक शब्दावर राजा धात्रीची चर्या बदलत होती. तो खूप घाबरलेला होता. अखेर त्याने बोलण्यास सुरुवात केली.

"कधीतरी आपल्याला हे सर्व कळेल हे आम्हांस माहित होते. हो धूमल, हे सत्य आहे. त्या स्वप्नाने आम्ही घाबरलो आहोत. आमच्या प्रिय राजकन्येचा राज्याभिषेक होणे त्यांना कदापि सहन होणार नाही आणि तसे त्यांनी स्वप्न दृष्टांताने सिद्ध केले आहे," राजा धात्री अतीव दुःखाने म्हणाला.

“म्हणजे? मला समजले नाही.”

“आपला राज्याभिषेक होऊ देणार नाही असे त्यांनी महाराणी यांना स्वप्नात येऊन सांगितले,” राजा धात्री म्हणाला.

“माताजींनी मला हे का सांगितले नाही आणि आपण माझ्यापासून हे का लपवले पिताजी?” धृमलला वाईट वाटले.

“आम्हाला आपल्या बाल मनावर या साऱ्याचा परिणाम होऊ द्यायचा नव्हता,” राजा धात्री म्हणाला.

“प्रथम महाराणी कुठे गेल्या असतील आपणास काही माहित आहे का?” धृमलने विचारले.

“नाही धृमल मी त्यांचा सर्वत्र शोध घेतला परंतु त्या सापडल्याच नाही,” राजा धात्री शून्यात पाहत म्हणाला.

“माफी असावी महाराज, परंतु कदाचित त्या मरण पावल्या असतील. मध्यंतरी मला रात्री एक आकृती वरच्या दालनामध्ये जाताना दिसली,” एवढे बोलून धृमलने त्या भयानक रात्रीची गोष्ट राजाला कथन केली. तिचे बोलणे ऐकून राजा धात्री चिंतित झाला.

“म्हणजे अजूनही ती इथेच आहे,” एवढे बोलून तो येरझाऱ्या मारू लागला.

“ती म्हणजे कोण?”

“जिचा राणीने बळी घेतला. तिचा अतृप्त आत्मा या वाड्यामध्ये फिरतो आहे. केवळ अमावास्येच्या रात्री तो काहींना दिसतो परंतु अलीकडे अनेक वर्षे तो कोणाला दिसला नाही,” महाराज म्हणाले.

“पण राजपुरोहितांना विचारून त्या आत्म्याला मोक्ष का देत नाही?”

“तसे करता येणार नाही. ज्यावेळी तो आपल्या अपत्याला भेटेल त्याचवेळी तो तृप्त होईल आणि त्याची सुटका होईल,” महाराज म्हणाले.

"मग तसे का करत नाही पिताजी?" धृमलने विचारले.

"मी त्या अपत्याचा जीव संकटात नाही टाकू शकत. त्याला मी आपले मूल मानले आहे," राजा धात्री म्हणाला.

"कोण आहे ते? मला सांगाल का?" धृमलने साशंक विचारले.

खूप वेळ शांत राहून राजा म्हणाला, "ती शताक्षी आहे,"

त्याच्या या उत्तराने कोणी आपला जीव काढून नेतो आहे असे धृमलला वाटले. आपल्या प्रिय शतुला या आगीत तिने कधीही ढकलले नसते. त्यादिवशी जेव्हा ती त्या आत्म्याला भेटली तेव्हा तिला अतिशय नकारात्मक वाटत होते. राजाचे बरोबर होते. कोणास ठाऊक शताक्षीला बघून त्या आत्म्याची सुटका नाही झाली तर? त्याने तिला सोबत नेले तर? राजकन्या स्वतःला कधीही माफ करू शकणार नव्हती. नशिबाने शताक्षी तिथे उपस्थित नव्हती. काही कामाने ती नुकतीच बाहेर गेली होती. म्हणजे याचा अर्थ असा होता की कदाचित प्रथम महाराणी जिवंत असू शकत होती आणि या सगळ्याबाबत अंधुकसे समजल्याने सर्व मंडळ तिच्या शोधार्थ वरच्या दालनामध्ये गेले असू शकत होते. काहीही असले तरी आता वरच्या दालनामध्ये जाणे अनिवार्य होते. धृमल तिथून निघाली ती मनाची तयारी करूनच. आता कोणत्याही परिस्थितीत वरच्या दालनात जाणे गरजेचे होते. त्यांना दिलेली मुदत संपायला आता काहीच दिवस शिल्लक होते. प्रवर्तन अगोदरच बाहेर पडला होता आणि शताक्षीला वरच्या दालनात नेणे धोक्याचे होते. जे काही करायचे ते त्या तिघांनाच करावे लागणार होते.

"आजच आपल्याला वरच्या दालनात जायला हवे," एवढे बोलून धृमल, वज्रसेन आणि प्रद्युम्न बरोबर आपल्या दालनामध्ये आली. "शताक्षीला आपल्या योजनेमध्ये सहभागी नको करूया. तिला कोणतीही हानी झाली तर मी स्वतःला कधीही माफ करू शकणार नाही," धृमलचे डोळे पाणावले. एवढ्यात शताक्षी तिथे आली.

"तुम्ही सगळे इथे आहात होय! मी आपली सगळीकडे तुम्हाला शोधतेय," कोचावर बसत शताक्षी म्हणाली. तिच्या अचानक येण्याने सर्वजण शांत झाले होते आणि तिच्या ते लक्षात आले.

"काय झाले, मी आल्यावर तुम्ही एवढे गप्प का बसलात? दाईंनी मला अचानक बोलावले त्यामुळे मला जावे लागले," शताक्षी साशंक होऊन म्हणाली.

"अगं असे काही नाही, पुढे काय करायचं काही सुचत नाही. त्यात प्रवर्तन त्याच्या आजोळी गेला आहे," वज्रसेन म्हणाला.

"म्हणजे?" सर्वांनी कोरसमध्ये विचारले.

"अरे तुम्हाला सांगायला विसरलो. आज मी त्याच्या घरी गेलो होतो तेव्हा मला कळले की काही दिवसांसाठी तो आजोळी गेला आहे. मला हे जरा विचित्र वाटते आहे. आपण इथे कशासाठी आलो आहोत याचा त्याला विसर पडलेला दिसतो," वज्रसेन त्राग्याने म्हणाला.

"हो त्याला विसरच पडला आहे. रक्षाने पूर्वसंकेत दिला होता तसेच झाले. इथल्या जीवनाच्या मोहाला तो बळी पडला आहे. आता तो आपल्यापासून तनानेच नाही तर मनानेही दूर गेला आहे," धूमल म्हणाली. सर्वांनाच फार वाईट वाटले.

"तर मग आज रात्रीच वरच्या दालनामध्ये आपल्याला प्रवेश करावा लागेल. कारण महत्वाचे धागेदोरे तिथे सापडण्याची शक्यता आहे. शताक्षी तू मात्र इथेच धूमलच्या दालनात थांब. सर्वांनी जाऊन उपयोग नाही. नाहीतर इकडे संशय येऊ शकतो. तुला धूमलच्या पलंगावर धूमल म्हणून झोपायचे आहे," वज्रसेनने स्पष्ट केले. त्याच्या या वाक्याने शताक्षी चांगलीच चमकली.

"मला राजकन्येच्या पलंगावर झोपणे शक्य नाही," शताक्षी काचकूच करत म्हणाली.

"तुला माहिती आहे की हे सर्व करण्याचे आपले ध्येय काय आहे ते," प्रद्युम्न म्हणाला.

"हो पण मी दासी आहे. दुसरे काहीही काम द्या मी करेन पण राजकन्या बनणे नाही जमणार," शताक्षी निक्षून म्हणाली.

“कडू औषध आपल्याला अनेकदा घ्यावे लागते कारण आपल्याला बरे वाटले पाहिजे. मग हे सुद्धा तू कडू औषध समज आणि तू माझी भगिनी आहेस दासी नाही. त्यामुळे माझे रूप घेणे वा तत्सम कोणतीही गोष्ट करण्याचा तुला अधिकार आहे,” शताक्षीच्या जवळ जात धृमलने तिचा हात हातात घेतला. त्या स्पर्शाने जादू केली. शताक्षी तयार झाली.

“आपल्याला वरच्या दालनामध्ये जाण्याचा एकमेव मार्ग आहे आणि तो म्हणजे भिंतीवरून जाणे. कारण बाहेरून दालनाला मोठे कुलूप लावले आहे,” धृमल म्हणाली.

“कुलूप काढण्याच्या कलेमध्ये मी पारंगत आहे. मागे एक कलाकार आला होता त्याच्याकडून मी ती कला शिकून घेतली आहे. फक्त समस्या अशी आहे की अनेक वर्षांपूर्वी ते कुलूप घातले असावे. म्हणजे दरवाजे घट्ट असतील आणि बिजागरे आवाज करतील तेव्हा आपल्याला सावधगिरीने आत जावे लागेल,” वज्रसेन म्हणाला. त्याच्या या कलेवर सर्वजण खूश झाले.

“आज तुम्ही राजवाड्यातच थांबा. बाहेरून एवढ्या रात्री येणार म्हणजे उशीर होईल त्यापेक्षा इथेच बरे,” धृमल म्हणाली.

“मला काही साहित्य आणावे लागेल. आतमध्ये काही अमानवी असल्यास त्याच्याशी सामना करता येईल. मी आता जातो आणि सर्व घेऊन संध्याकाळी येतो,” प्रद्युम्न म्हणाला.

“मला सुद्धा जावे लागेल तोपर्यंत धृमल तू काही शस्त्र घे. तिकडे काहीही घडू शकते,” वज्रसेन काळजीने म्हणाला.

“आपल्याबरोबर प्रवर्तन हवा होता. त्याला आपल्या मित्रांची कसलीही काळजी नाही,” धृमल दुःखाने म्हणाली.

“सोड ते. काही गोष्टींना इलाज नसतो,” प्रद्युम्न म्हणाला.

सर्वजण आपापल्या घरी निघून गेली.

ठीक संध्याकाळी दोघेही राजवाड्यावर दाखल झाले. येताना वज्रसेनने आपल्यासोबत एक छोटा बटवा आणला होता. त्यात काही सामान भरलेले होते. प्रद्युम्न सुद्धा गंगाजल आणि काही भस्म घेऊन आला होता. दोघांची व्यवस्था धृमलच्या दालनाशेजारी करण्यात आली. रात्री भोजन करून चौघेही बराच वेळ मुख्य दालनांत रेंगाळली. मंडळ असे अनेकदा राजवाड्यावर मुक्कामी असे. त्यामुळे कोणालाही नवल वाटले नाही. रात्री निजानीज झाल्यावर त्यांनी खूप उशिरा पर्यंत वाट बघितली. मध्यरात्री वज्रसेन उठला. त्याने प्रद्युम्नला झोपूनच राहायला सांगितले आणि तो स्वतः बाहेर आला. सर्वत्र शांतता होती. कसलाही आवाज येत नव्हता. तरीही सर्व दालनांमधून फिरून त्याने एकदा खात्री करून घेतली आणि तो पुनः आपल्या दालनात आला.

"चल, सर्वजण झोपले आहेत. आता निघू या," दबक्या आवाजात वज्रसेन म्हणाला. आजूबाजूला एवढी शांतता होती की जरासा आवाजही धोकादायक ठरला असता. दोघंही आपापले सामान घेऊन धृमलच्या दालनात आले. दोघीजणी त्यांची वाटच पाहत होत्या. धृमलने वेषांतर केलेले होते. तिने छोटी कट्यार कमरेला लावली होती आणि अंगात साधा झगा चढवला होता. चेहऱ्यावरचा निश्चय तिच्या कृतीमध्ये दिसत होता. शताक्षीने धृमलसारखी वेशभूषा आणि केशभूषा केली होती. प्रथमदर्शनी ती धृमलच वाटत होती.

ठरल्याप्रमाणे तिने धृमलची जागा घेतली आणि बाकीचे तिघे निघाले. राजवाड्यात ठिकठिकाणी मिणमिणते दिवे प्रकाश उत्सर्जित करत होते. त्याचा आधार घेत आणि आजूबाजूचा कानोसा घेत ते पुढे जाऊ लागले. सर्वांत पुढे वज्रसेन होता, त्याच्या मागे धृमल आणि शेवटी प्रद्युम्न अशी ओळीने ती पुढे जात होती.

आता वरच्या दालनाकडे जाणारा रस्ता सुरू झाला होता. धृमलने खिशातून कट्यार काढली आणि घट्ट हातात धरली. वज्रसेनने संपूर्ण लक्ष समोरच्या वाटेकडे केंद्रित केले. प्रद्युम्न मागून कोणी येत नाही ना याचा कानोसा घेत होता. समोर तो भव्य दरवाजा आपल्यामध्ये गुपित लपवून वाकुल्या दाखवत उभा होता. तिथे कोणताही दिवा नसल्याने अंधार दाटून आला होता. आता सोबत आणलेली चिमणी पेटवणे आवश्यक होते. तसंही नजरेच्या टप्प्यामधून सर्व बाहेर आलेले होते आणि या अवेळी अशा झपाटलेल्या जागी कोणी मनुष्य असण्याची शक्यताही नव्हती.

वज्रसेनने आधी बटव्यातून आणलेली छोटी चिमणी पेटवली. चिमणी पेटवताना त्याला बरीचशी कसरत करावी लागली. चिमणीचा अंधुक प्रकाशही त्यांना त्यावेळी खूप आधार देणारा वाटला. कुलूपाची पाहणी केली असता लक्षात आले की ते चांगलेच मोठे होते. चावी घालायचे छिद्र वरून बंद केलेले होते. काही केल्या त्यावर बसवलेली ढालप उघडेना. सर्वांना प्रवर्तनची आठवण झाली. पण काहीतरी करणे भाग होते.

वज्रसेनने बटवा चाळला. त्याला त्यात एक दगड सापडला. त्याला आठवले नदीकिनारी सापडलेला गुळगुळीत दगड त्याने बटव्यात जपून ठेवला होता. त्या दगडाने ठाक-ठूक केल्यावर अखेर ती ढालप वर सरकली आणि छिद्र उघडे पडले. पण या सगळयात थोडा आवाज झाला त्यामुळे कोणी येत नसल्याची त्यांना खात्री करावी लागली. थोडावेळ थांबून कानोसा घेतला असता त्यांना कळले की कोणीही फिरकले नव्हते. म्हणजे आवाज खाली गेला नसावा याची त्यांना खात्री झाली. आता त्याने आपल्या बटव्यातून एक बारीक धातूची काडी काढली आणि ती त्या छिद्रातून आत घातली. थोड्या परिश्रमाने फळ मिळाले आणि कुलुपाचा खटका उघडला गेला.

सर्वांच्या तोंडून आनंदाची बारीकशी किंकाळी बाहेर पडली.

आता हळुवार कुलूप बाजूला करून त्याने तिथेच जमिनीवर ठेवले आणि सर्वजण दरवाजा ढकलू लागली. बिजागरे चांगलीच घट्ट झाली होती. दरवाजा काही केल्या उघडत नव्हता. देवीचे स्मरण करून त्यांनी मिळून एक जोराची लाथ मारली आणि त्या धक्क्याने करकरत एकदाचा दरवाजा उघडला. पण उघडताना गंजलेल्या बिजागरांनी कुरकुरण्याचे काम चोख बजावले होते. त्यामुळे आत जाऊन पटकन त्यांनी दरवाजा आपल्या मागे बंद केला. चुकून कोणी आलेच तरी अंधारात बंद दरवाजा बघून मागे फिरणार होते. आतमध्ये बरीच धूळ होती. त्यांचा श्वास चांगलाच गुदमरला.

“शीss खूपच धूळ आहे इथे,” धृमल दबक्या आवाजात म्हणाली.

“श् श्sssss” वज्रसेनने गप्प राहायची खूण केली. आत मध्ये कोणी असेल अशी शक्यता धृमलला वाटत नव्हती तरीही ती गप्प बसली. चिमणीचा प्रकाश शक्य तितका मोठा करत वज्रसेन चौफेर पाहू लागला. बरेचसे उंची सामान कापडाने आच्छादित केले होते. एक एक करत सर्व कापडे ते बाजूला करू लागले. ज्यामध्ये वस्त्रांचे कपाट (ज्यात केवळ श्वेत वस्त्रे होती), एक पलंग, काही शोभेच्या मूर्ती होत्या (ज्या सर्व लहान मुलांच्या होत्या), खाली पसरलेला

गालीचा सुद्धा धुळीच्या थरात बुडालेला होता. एवढा की त्याचा रंग ओळखणे कठीण होते. एकंदरीत वातावरण उदासीन वाटत होते. दालनामधील देखावा पाहता महाराणी अतिशय साधी राहणी पसंत करणाऱ्या वाटत होत्या. कोपऱ्यात एक देव्हारा होता ज्यात बाळकृष्णाची छोटी सोन्याची मूर्ती होती. धुळीने त्याचा सुवर्ण रंग काळा झाला होता. त्याच्याकडे बघून धृमलला फार वाईट वाटले. दुःखाचे कढ दाटून आले आणि तिने ती मूर्ती उचलून तळहातावर ठेवली. आपल्या झग्याच्या टोकाने तिने ती पुसून काढली आणि अहो आश्चर्यम् ती सुवर्णमूर्ती तेजोमय झाली. तिच्यातून सुवर्ण किरणे बाहेर पडून अवघे दालन दिपून गेले. तिथे एकच एक खिडकी असूनही कुठूनसा सोसाट्याचा वारा वाहू लागला आणि भिंतीवर ठेवलेल्या तसबिरीवरचे कापड त्या वाऱ्यात उडून गेले. समोर उभी ठाकलेली तसबिर पाहून सर्वांच्या पायाखालची जमीन सरकली. आश्चर्य, धक्का, भीती सर्वच भावना एकत्र झाल्या. कारण फोटोमधील स्त्री त्यांना यापूर्वी भेटलेली होती. ती दुसरी तिसरी कोणी नसून 'रक्षा' होती.

धक्क्यातून सावरायला मुलांना बराच वेळ गेला. त्यांची वाचाच बसली होती. एकमेकांकडे आणि फोटोकडे ते अबोलपणे पाहत राहिले. रक्षाच्या उंची पोशाखावरून आणि मुकुटावरून त्यांना समजून चुकले होते की तीच प्रथम महाराणी होती.

"हे नक्की काय चालले आहे काही कळत नाही," धृमल त्राग्याने म्हणाली आणि त्याचवेळी वाहणारे वारे अकस्मात थांबले. सभोवतालचे दृश्य बदलू लागले, धुळीने माखलेले सारे स्वच्छ लखलखीत झाले होते. समोर पलंगावर एक स्त्री झोपलेली होती. त्या महाराणी असल्याचे सर्वांनी ओळखले. इतक्यात तिथे सेवा दाई आली.

"महाराणी अतिशय आनंदाची बातमी आहे. आपण आई होणार आहात! एवढ्या वर्षांनी का असेना पण शेवटी परमेश्वराने आपली हाक ऐकली," असे म्हणत दाई महाराणीच्या पायाशी बसली. महाराणीचा चेहरा तेजाने उजळला. ती अत्यानंदाने नाचू लागली. दाईच्या हातांना धरून तिने एक गोल गिरकी घेतली.

"महाराणी जरा हळू, सांभाळून आपल्याला आता फार जपले पाहिजे," दाई काळजीने म्हणाली.

"अगं आम्हाला हा आनंद उपभोगू दे. कित्ती वर्षांनी हवी असलेली बातमी आम्हाला मिळाली आहे. आईपणासाठी आम्ही आसुसलेले होतो. तुला तर माहित आहेच," महाराणीच्या

चेहऱ्यावर निखळ आनंद दिसत होता. तिथे उपस्थित मुलांचे अस्तित्व त्यांच्या दृष्टीने नव्हतेच. त्यांना ती मुले दिसतही नव्हती. त्यानंतर परत चित्र बदलले. आता तिथे दोघी जणी होत्या. एक महाराणी आणि दुसरी स्त्री अनोळखी होती. पण तिच्या चेहऱ्याची ठेवण शताक्षीसारखीच असल्याने ती तिची आई असल्याचे मुलांनी ओळखले. दोघींचेही पोट चांगलेच दिसत होते. म्हणजे दोघींचा प्रसूतीकाळ जवळ आलेला होता.

"महाराणी आपणाला कोण हवे आहे? मुलगा की मुलगी?"

"कोणीही चालेल. बाळाच्या वाटेकडे आता आम्ही डोळे लावून बसलोय. खरेच शुमी, आई होण्यासारखे दुसरे सुख या जगात नाही. हे प्रभो, आपण एवढे दयाळू आहात. आपण मला हे सुख उपभोगू दिले. आता बाळाचा चेहरा पाहिला की आम्ही मरायला मोकळ्या," पोटावरून हात फिरवत महाराणी म्हणाली.

"असे अभद्र बोलू नये," दासी शुमी हिने समजुत घातली.

"नाही गं. हल्ली कसलीशी भीती वाटते," खिडकीतून बाहेर बघत महाराणी म्हणाली.

"प्रसवकाल जवळ आला की असे व्हायचेच. मी आहेच आपल्याबरोबर," दासी म्हणाली.

"नाही नाही. प्रसूतीची भीती नाही वाटत आम्हाला. बाळासाठी काहीही सहन करायला आम्ही तयार आहोत. पण हे मूल आम्हाला पाहायलाच मिळणार नाही याची भीती वाटते," महाराणी म्हणाली. तिच्या चेहऱ्यावर भय पसरलेले होते. त्यानंतर वातावरण पुनः बदलले आणि परिस्थिती पूर्ववत झाली. बसलेले धक्के एवढे तीव्र होते की त्यावर कोणी काही बोलणार इतक्यात त्यांना पुढचा जोरदार धक्का मिळायचा होता. दरवाजा करकर करत उघडला आणि दुसरी महाराणी आतमध्ये आली.

"तुला मी सांगितलेले ना इकडे येऊ नको म्हणून?" तिच्या नजरेमध्ये अंगार होता. तिच्या भाषेतील आणि चालण्यामधील राजसपणा लोप पावला होता. तिचे हे रूप धृमल आणि इतर मंडळ पहिल्यांदाच पाहत होते.

"माताजी..." थरथरत धृमल बोलून गेली.

“चूप..... एक शब्द बोलू नकोस. बरी सापडलीस. तसंही ही संधी कित्ती दिवस मी शोधत होते. सगळयाचा शोध लावायचा आहे ना तुला? थांब, तुला अशा ठिकाणी पाठवते की तिकडे सगळयाच प्रश्नांची तुला उत्तरे मिळतील!” एवढे बोलून तिने आपले रूप बदलले. आता तिच्या जागी एक अतिशय विद्रूप अशी चेटकीण निर्माण झाली. जिच्याकडून अतिशय दुर्गंधी येत होती. जिच्या केसाच्या जटांमधून किडे पडत होते. डोळे रक्ताने लालबुंद झाले होते. अंगावरचे कापड कधीही न धुतलेले असे अतिशय मळके आणि घाणेरडे होते. दातांचा पिवळेपणा हा हळदीपेक्षाही गडद होता. तोंडातून बाहेर आलेल्या सुळयांमधून लाळ गळत होती. हाताची नखे अतिशय मोठी आणि तीक्ष्ण होती. अंगावर हाताएवढे केस होते. पायांची नखे तीक्ष्ण आणि मोठी होती. ती धृमलच्या दिशेने धावून आली आणि धृमलने चपळाईने तिच्या पोटात कट्यार खुपसली. परंतु त्याने ती केवळ धडपडली आणि दुसऱ्याच क्षणी अधिक भेसूरपणे हसू लागली. प्रद्युम्नने तिच्यावर हातातील गंगाजल आणि भस्म फेकले त्यामुळे काही क्षण ती सैरभैर झाली परंतु दुसऱ्याच क्षणी पुनः पूर्वपदाला आली. आता मृत्यू समीप आल्याचे सर्वांना जाणवले होते. धृमलने चपळाईने देव्हाऱ्यातल्या बाळकृष्णाची मूर्ती घट्ट छातीकडे धरली आणि डोळे मिटले. ज्यासाठी आपण इथे आलो आहोत ती गोष्ट न करताच आपल्याला मृत्यू येणार या विचाराने तिला फार वाईट वाटले. त्याचवेळी चेटकिणीने धृमलवर हल्ला केला परंतु वज्रसेन अकस्मात त्या दोघींच्या मध्ये आला आणि त्याने तो वार स्वतःवर घेतला परिणामी त्याचे रुपांतर पोपटामध्ये झाले. चेटकीण गडगडाट करत हसली आणि त्याचवेळी एक गोष्ट घडली. दरवाजा उघडला गेला आणि त्यातून कसलीतरी माळ चेटकिणीच्या अंगावर फेकली गेली. त्या माळेच्या स्पर्शाने ती जळू लागली आणि जमिनीवर पडली. समोर प्रवर्तन आणि शताक्षी उभे होते.

त्या दोघांना पाहताच धृमल धावत गेली आणि त्यांच्या गळयात पडली. “तू शेवटी आलास! आणि तिला मारलेस, पण आपला वज्रसेन... त्याचा पोपट केला रे तिने,” ती रडू लागली.

“थांब धृमल. ती अजूनही मेलेली नाही. तिला मारणे एवढे सोपे नाही,” प्रवर्तन म्हणाला.

“म्हणजे?” धृमल आणि प्रद्युम्न एकदम बोलले. पोपटरूपी वज्रसेन आता धृमलच्या खांद्यावर येऊन बसला होता.

“याचे उत्तर आपल्याला एकच स्त्री देऊ शकते आणि त्या म्हणजे कृती देवी,” प्रवर्तनच्या उत्तराने सर्वांचा आ वासला गेला.

“माताजी? काय बोलतो आहेस तू?” प्रद्युम्न आश्चर्याने म्हणाला.

“खोटं वाटत असेल तर चल,” प्रवर्तन म्हणाला.

“आणि हिचे काय करायचे?” धूमलने विचारले.

“हिला इथेच कोंडून ठेऊ. या माळेचा परिणाम काही काळ तरी राहील असे वाटते. कदाचित ही इथून बाहेर पडेल असे काही वाटत नाही,” प्रवर्तन म्हणाला.

“बरे झाले तू ती माळ घेऊन आलास,” पोपटरूपी वज्रसेन म्हणाला. त्याला बोलता येते हे बघून सर्वांना आनंद झाला.

“मला माहित नाही अचानक ही माळ माझ्या हातात कुठून आली?” प्रद्युम्नच्या उत्तराने सारे चकित झाले. धूमलने मनोमन बाळकृष्णाला नमस्कार केला.

एवढ्यात तिथे महाराज धात्री हजर झाले. आवाजाने वरच्या दालनात काहीतरी घडते आहे अशी त्यांना खबर मिळाली होती. तिथला प्रकार डोळ्याने बघून ते खूपच आश्चर्यचकित झाले. घडलेली घटना धूमलने त्यांना थोडक्यात कथन केली. प्रथम त्यांचा विश्वासच बसला नाही. पण मग त्यांच्या लक्षात येऊ लागले.

आता पहाटेचे ३.३० झाले होते. काही वेळात राज्य जागे होणार होते. चेटकीणीचा नाश होईपर्यंत कोणाला काही कळले तर प्रजेत नाहक भय पसरणार होते. त्यामुळे त्वरित सैनिकांना आदेश देऊन त्यांनी राजपुरोहित आणि कृती देवीला बोलावून घेतले. राजाच्या अंतःपुरात बैठक झाली. त्या बैठकीला मंडळ, प्रधान, राजपुरोहित, कृती देवी आणि स्वतः राजा धात्री एवढे हजर होते.

“बोला हे सर्व काय आहे? गुरुवर्य आपणास हे माहित होते? आपल्याला पौरोहित्यासाठी नेमले असून आपण असे केले? आमचा आपल्यावर फार विश्वास होता,” राजा दुःखाने म्हणाला.

“महाराज माफी मागण्याचा मला अधिकार नाही. पण मी कधीही गैरकृत्य केले नाही. आजवर माझी एक चूक झाली ती म्हणजे चुकीच्या व्यक्तीवर मी प्रेम केले. कृती ही चेटकीण आहे,” राजपुरोहितांनी केलेल्या गौप्यस्फोटावर सर्वच हादरले.

“नाही, हे शक्य नाही. माताजी आपण..........” प्रद्युम्न दुःखाने, निराशेने, धक्क्याने, क्रोधाने पेटून उठला. त्याची नजर पार निर्जीव झाली आणि तो मूर्च्छित झाला. त्याच्या या परिस्थितीला बघून कृती हृदय पिळवटून रडू लागली.

“महाराज माझ्या मुलाला जीवित करा. मी प्रद्युम्नशिवाय जगू शकत नाही. त्याला जीवित करा.” चटकन थंड पाणी आणून शिंपडल्याने प्रद्युम्न भानावर आला. पण कृती देवीकडे त्याने पाठ फिरवली.

“मनू असे करू नकोस. बाळा माझ्याशी काहीतरी बोल,” कृती रडत म्हणाली.

“कृती आधी घडलेले महाराजांना कथन कर. मलाही तू अंधारात ठेवले आहेस. मला वाटले होते तुझ्यातील चेटकीण मी चांगल्या आचरणाने संपवली असेल,” राजपुरोहित दुःखाने म्हणाले.

“सांगते, सारे काही सांगते. माझ्याही डोक्यावर आता हा भार सहन होत नाही. मी जंगलात राहत होते. जंगलाच्या दुसऱ्या टोकाला राहणाऱ्या गुरूंना भेटायला प्रद्युम्नचे वडील आले होते. धात्रीवर्यमध्ये पोहोचेपर्यंत रात्र झाली. त्यामुळे त्यांना जंगलामध्ये वास्तव्य करणे भाग पडले. वाटेत जंगली श्वापदांनी त्यांच्यावर हल्ला केला तेव्हा आपल्या मंत्र सामर्थ्याने त्यांनी त्यांचे हिंस्त्रत्व नष्ट केले. त्यामुळे ती जनावरे शांत होऊन निघून गेली.

तिथल्याच एका झाडावर मी बसलेले होते. ते दृश्य पाहून मी मनोमन त्यांना पतीस्थानी वरले. तिथेच मी त्यांना शरण आले. मला झालेला पश्चात्ताप बघून यांनी माझा स्वीकार केला. यांच्यामुळे एका चेटकिणीला सर्वसामान्य आयुष्य जगता आले. लग्नानंतर मी माझ्या पुर्वायुष्याला पूर्णतः पूर्णविराम दिला. परंतु काही दिवसांनी अचानक भया माझा शोध

घेत आली. मी मनुष्याशी लग्न केले आहे आणि चेटूक करणे पूर्णतः सोडले आहे हे तिला आवडले नाही. माझे मतपरिवर्तन करण्याचा तिने खूप प्रयत्न केला परंतु जेव्हा तिलाही हे सर्व सोडण्याविषयी मी सांगितले तेव्हा ती पुनः जंगलात जाण्यासाठी निघाली. त्यादरम्यान महाराणी धरा गर्भवती होत्या आणि महाराजांनी त्यानिमित्ताने महापूजा ठेवली होती. मला वाटले की भयाने महापूजा पाहिली, तिथला महाप्रसाद ग्रहण केला तर तिच्यामध्ये फरक पडेल म्हणून मी तिला एक दिवस थांबण्याचा आग्रह केला.

तीच माझी घोडचूक ठरली. तिथल्या कशाचाही तिच्यावर परिणाम झाला नाहीच उलट महाराजांचा, त्यांच्या संपत्तीचा, राजवाड्यातल्या आरामदायी आयुष्याचा तिला मोह पडला. त्यामुळे तिथेच आणखी काही दिवस मुक्काम करण्याचा तिने निर्णय घेतला. पण एक अडचण होती. मला भेटण्यासाठी तिने आपले मूळ रूप बदलले होते. पण तिच्यामध्ये एवढी शक्ती नसल्याने बदललेल्या रुपात ती जास्त काळ राहू शकत नव्हती. त्यामुळे यांच्याशी आणि माझ्याशी खोटेपणा करून तिने मंत्र-तंत्र शिकून घेतले आणि त्याआधारे काही दिवस ती राज्यात राहिली. तिच्या कसल्याच काळ्या विचारांची कल्पनाही नसल्याने मी तिला मदत करत राहिले.

या काळात तिने महाराजांचे महाराणी आणि त्यांच्या होणाऱ्या अपत्यावरचे निरतिशय प्रेम पाहिले. ते प्रेम नष्ट करणे शक्य नसल्याने एक भयंकर उपाय तिने शोधून काढला. मी प्रद्युम्नची शपथ घेऊन सांगते की या सर्वांची कल्पना पुढे अनेक वर्षे मला नव्हती आणि जेव्हा आली तेव्हा वेळ निघून गेलेली होती. मला शिक्षा होईल आणि विशेषतः यांच्या रोषाला सामोरे जावे लागेल या भीतीने मी गप्प राहिले," एवढे बोलून कृती पुनः रडू लागली.

"परंतु तिने असे काय केले?" महाराजांनी आवेशाने विचारले. त्यांच्या मुठी आवळल्या होत्या. एवढ्या की त्यातून रक्त सांडतेय की काय अशी भीती धृमलला वाटली.

"तिने महाराणींचा गर्भ चोरला," कृतीचे हे वाक्य सर्वांच्या पायाखालची जमीन हादरवून गेले.

"पण त्यांनी तर स्वतः आपल्या बाळाला संपवले होते," प्रधानमंत्रींनी प्रथमच तोंड उघडले. प्रत्येकजण धक्क्यामधून जात होता.

“नाही नाही. महाराणी धरा तर देवीस्वरूप होत्या. आजवर त्यांनी कधी साधी मुंगीही मारली नसेल. त्या आपल्याच हाडामासाच्या बाळाला काय मारणार?” कृती देवी म्हणाली.

“पण मग त्या पळून का गेल्या? त्यांनी खरे सांगायचा का प्रयत्न केला नाही? आणि शुमीचे काय झाले?” महाराजांनी प्रश्नांची सरबत्ती केली.

“सांगते. सगळे सत्य सांगते. कोणीतरी वाईट शक्ती हे सर्व करते आहे हे सत्य दासी शुमीला कळले होते. ती याविषयी महाराजांना सांगेल अशी शंका येताच भया तिला मारण्यासाठी तेथे पोहोचली परंतु तत्पूर्वी ती प्रसूत झाली होती आणि तिने शताक्षीला जन्म दिला. अर्भकाचे दैवी शक्ती रक्षण करत असतात. त्यामुळे शताक्षीला मारणे शक्य नसल्याने तिने शुमीचा जीव घेतला आणि सर्वच ठपका महाराणींवर येईल असा आभास निर्माण केला,” तिच्या या बोलण्याने शताक्षीला खूप मोठा धक्का बसला होता. तिच्याजवळ जात धृमलने तिचे सांत्वन करण्याचा व्यर्थ प्रयत्न केला. परंतू ती रडू लागली.

“बिचाऱ्या महाराणी याबद्दल अनभिज्ञ राहिल्या. वरच्या दालनात त्यांना बंद केल्यावर एक दिवस सूक्ष्म रूपाने तिथे जाऊन भयाने त्यांचे रुपांतर प्राण्यामध्ये केले आणि जंगलामध्ये जाऊन त्यांना सोडले. नंतर शिकारीसाठी आपण जंगलात गेला असता तिथे रूप बदलून राहणाऱ्या भयाला आपण ओळखले नाही आणि तिलाच द्वितीय महाराणी म्हणून वरले,” कृती देवीला हलके वाटत होते.

“पण त्या बाळाचे तिने काय केले?” राजपुरोहितांनी थरथरत विचारले.

“त्याचे उत्तर आम्ही देतो. आम्हीसुद्धा आपल्या सर्वांसोबत एक असत्य बोललो आहोत. आम्ही जंगलात गेलो तेव्हा ती चेटकीण अगोदरच एका तान्ह्या मुलीबरोबर राहत होती. नुकत्याच जन्मलेल्या त्या अर्भकाला आम्ही ओळखले नाही परंतू त्याच्याविषयी अपार स्नेह आणि जिव्हाळा आमच्या मनात उचंबळून आला. खरे तर तिच्यासाठी आम्ही त्या चेटकिणीशी विवाह केला. आमची ही कमजोरी तिने ओळखली असणार. कोणातरी पुरुषाने तिला फसवले आणि सोडून दिले म्हणून ती जंगलात एकटी राहते या तिच्या भूलथापांना आम्ही बळी पडलो. अगोदरच पुत्री असलेल्या स्त्रीचा प्रजा महाराणी म्हणून स्वीकार करेल का या भीतीने काही महिने आम्ही

तेथेच राहिलो आणि मग ती आमचीच कन्या असल्याचे जाहीर केले. आता धृमलला रक्षाची मिठी आणि त्यामध्ये भरलेला अपार प्रेम आणि जिव्हाळा आठवला.

"मला माताजींना भेटायचे आहे," धृमलला गहिवरून आले.

"हो बाळ, आम्हीही त्यांचे अपराधी आहोत. त्या चेटकिणीने एवढी वर्षे आपल्याला काही इजा पोहोचवली नाही हे आमचे भाग्य," महाराज सुद्धा गहिवरले होते.

"त्याचे एक कारण आहे महाराज. अनेक हजार वर्षे आयुष्य असणाऱ्या या चेटकिणीला काही वर्षे सुख उपभोगल्यानंतर धात्रीवर्य राज्यावर राज्य करण्याचा मोह झाला. म्हणूनच एवढ्या वर्षात एकाही शत्रूला इथे फिरकू न देण्याचा तिने बंदोबस्त केला होता. ती राजकन्येला काही इजा पोहोचवेल या भीतीने मी तिला समजावले की लग्नानंतर राजकन्या या राज्यातून निघून जाईल. मात्र त्याआधी तिने घाईने काही केले तर मात्र शूर पराक्रमी राजा धात्रीच्या रोषाला ती कारणीभूत धरेल आणि ते तिचा अंत करतील. माझे म्हणणे तिला पटले. परंतु आपण राजकन्येचा राज्याभिषेक करण्याचे एकाएकी जाहीर केले आणि ती बिथरली. त्यात प्रथमराणी तिच्या स्वप्नात आल्या होत्या त्यांनी तिला सांगितले की तुझ्या पापाचे घडे भरले आहेत. राजकन्याच तुझा नाश करेल त्यामुळे येन केन प्रकारेण राजकन्येचा जीव घ्यायचे तिने ठरवले," कृती देवी म्हणाली.

"आणि तिने आपल्याला स्वप्न खोटे सांगितले पिताजी," धृमल म्हणाली.

"आपण तिच्या प्रत्येक कृतीबद्दल एवढ्या खात्रीने कशा बोलू शकता?" प्रधानमंत्रींनी विचारले.

"कारण भया माझीच भगिनी आहे. ती कधीतरी सुधारेल म्हणून मी तिला संधीवर संधी देत राहिले," तिच्या या उत्तरावर सर्व सुन्न झाले.

"आपल्याला लवकरात लवकर काहीतरी करावे लागेल," प्रवर्तन म्हणाला.

"तिला मारण्याचा एकच उपाय आहे. घोर अरण्यात तिच्या शक्तीचा केंद्रबिंदू एका झाडाच्या ढोलीमध्ये आहे. तो नष्ट केल्यावर ती शक्तिहीन होईल आणि मरून जाईल," कृती देवी म्हणाली.

“आणि तिने ज्यांचे रुपांतरण केले असेल त्यांचे काय?” पोपटरूपी वज्रसेन म्हणाला. त्याच्या बोलण्याने सर्व चमकले.

“हा काय प्रकार आहे?” महाराजांनी विचारले. यावर धूमलने सर्व कथन केले.

“घाबरू नका, तिच्या मृत्यूनंतर तिने केलेली जादू नष्ट होईल आणि सर्वजण आपापल्या मूळरुपात येतील,” राजपुरोहितांनी आश्वस्त केले.

“आपण आत्ताच जंगलाकडे प्रस्थान करू या,” महाराजांनी आपली तलवार उपसली. धूमलने आपल्या धनुष्याचे भाते बाणांनी भरले. काही मोजक्या शूरवीर सैनिकांना पाचारण करण्यात आले. राजपुरोहितांनी आपल्या मंत्रसामर्थ्याने वरचे दालन बंद केले आणि काही सैनिकांना तिथे पहाऱ्यासाठी ठेवले.

“वीरांनो आतून तुम्हाला वेगवेगळे आवाज येतील त्याला बळी पडू नका आणि हे दालन उघडू नका,” सर्वांना कडक शब्दात सूचना देण्यात आल्या. स्वतः सेनापती जातीने उपस्थित राहिले.

“धात्रीवर्यवर आलेले हे संकट आम्ही परतवून लावू. प्रसंगी प्राणार्पण करावे लागले तरी बेहत्तर. चिंता नसावी,” सेनापती छातीठोकपणे म्हणाले.

अशाप्रकारे महाराज, राजपुरोहित, मंडळ आणि काही सैनिक यांनी जंगलाकडे कूच केले. प्रधानमंत्रींना राज्यातील सुव्यवस्था भंग होणार नाही याकडे लक्ष देण्यास सांगण्यात आले. कारण एव्हाना हळूहळू ही बातमी राज्यात पसरली होती. त्यामुळे त्यांच्यामध्ये घबराट निर्माण होण्याची शक्यता होती. तोपर्यंत मध्यान्हीचा सूर्य डोक्यावर आला होता. जंगलाच्या मध्यावर येईपर्यंत सर्व भुकेने आणि तहानेने व्याकूळ झाले होते. त्यामुळे भोजनासाठी थांबण्याचा महाराजांनी निर्णय घेतला. तिथेच दाटीवाटीने वाढलेल्या वृक्षांच्या गर्द छायेखाली सर्व बसले. सोबत आणलेली शिदोरी उघडली असता त्यामधील अन्न पाहून सर्व विस्मयचकित झाले. कारण ते सर्व अन्न नासून गेले होते.

“असे कसे झाले गुरुवर्य? कृपया मार्गदर्शन करावे,” हात जोडत महाराज म्हणाले.

“ही केवळ माया आहे. आपल्याला वृक्षापर्यंत पोहोचवण्यात ती अनेक विघ्ने आणणार. तेव्हा या आभासाला फसू नका आणि भोजन चांगलेच आहे असे समजून ग्रहण करा. रुचकर लागेल,” त्याप्रमाणे केल्यावर खरेच सर्व पूर्वीसारखे झाले आणि सर्वांची क्षुधा शमली. भोजनानंतर पुढचे मार्गक्रमण सुरु झाले. काही वेळानंतर अचानक अंधार दाटून आला. जोरदार वादळी वारे वाहू लागले. तरीही न डगमगता महाराज धात्री पुढे चालू लागले. तसे थोड्या वेळाने सारे काही शांत झाले. पुढे सारख्याच दिसणाऱ्या चार वाटा समोर आल्या तसे सर्वच भांबावून गेले.

“देवी यातल्या कोणत्या वाटेने जायचे आहे?”

“ही भूलभुलैय्या आहे. केवळ चेटकिणी खरी वाट सांगू शकतात,” एवढे बोलून कृतीने एका सैनिकाच्या म्यानेमधील तलवार खचकन ओढली आणि आपल्या बोटाला लावली. त्याबरोबर बोटातून जोरदार रक्तस्त्राव होऊ लागला. एक एक करत चारही वाटांवर तिने रक्त सांडले. त्यातील एका वाटेवर रक्ताचे थेंब पडत होते परंतु कुठलाही डाग दिसत नव्हता. ते थेंब वरच्या वर गायब होत होते जणू काही रस्त्याला अदृश्य थर असावा. त्या वाटेकडे बोट दाखवत कृती म्हणाली,

“थांबा, इथे मनुष्याला येण्यास मनाई आहे तरीही मी तुम्हाला घेऊन जात आहे. तर कोणीही बोलू नका नाहीतर सर्वांचाच जीव धोक्यात येईल,” यावर सर्वांनी संमती दिली.

सर्वजण भराभर चालू लागले. काही अंतर चालून गेल्यानंतर जंगली श्वापदांचे आवाज ऐकू येऊ लागले. न बोलताच शस्त्रे उपसली गेली आणि खरोखरच अतिशय हिंस्त्र अशा जनावरांनी सर्वांवर हल्ला केला. त्यात कोल्हे होते, लचका तोडणारे लांडगे होते. त्यांनी सैनिकांना घायाळ केले. एक-दोन तर धारातीर्थी पडले. जीवाच्या कराराने किंकाळया फोडल्या गेल्या आणि त्यामुळे हल्लेखोर जनावरांची संख्या वाढली. धृमलच्या भात्यातल्या बाणांची संख्या कमी कमी होत गेली. तिचा एकही बाण फुकट जात नव्हता. प्रवर्तनची तलवार तळपत होती. अंगाला झोंबणाऱ्या जनावरांवर तो अक्षरशः तुटून पडत होता. पोपटरुपी वज्रसेन जवळच एका झाडाच्या फांदीवर जाऊन बसला. खाली चालू असलेला तांडव तो मूकपणे पाहत होता. काहीतरी करायला हवे होते नाहीतर असेच चालू राहिले तर सर्व इथेच संपणार होते हे त्याला जाणवले. त्याने हळूवार उडत जाऊन कृती देवीला पुढे चलण्यास इशारा दिला. ती दोघंच पुढे निघाली.

राजपुरोहितांनी रिंगण घातले आणि त्यात सर्वजण थांबली. त्या रिंगणाच्या आत कोणत्याच वाईट शक्तींना प्रवेश नव्हता.

बरेच अंतर चालून गेल्यावर ते जंगलाच्या मध्यावर आले. तिथे भयाण शांतता होती. कोणत्याही पशु-पक्ष्यांचा आवाज येत नव्हता. कृती देवीने आपले रूप बदलले आणि तिथे अक्राळ-विक्राळ चेटकीण तयार झाली. वज्रसेन भेदरून गेला. चेटकिणीने पायानेच पोखरून जमिनीत खोल खड्डा तयार केला. त्यानंतर त्या खड्ड्यात दोन्ही पायांनी दाण-दाण उड्या मारल्या. त्याबरोबर खड्ड्याला छेदत जमिनीला चीर पडू लागली आणि दुभंगलेल्या जमिनीमधून एक भलामोठा वृक्ष बाहेर आला.

“उहहहहहSSSSSSSSSS” कित्ती वर्षांनी मस्त थंड आणि मोकळी हवा मिळाली. अगदी बरे वाटले,” सर्वांगाला आळोखे-पिळोखे देत आणि फांद्यांचे कंगवे बनवून पाने केसांसारखी विंचरत वृक्ष म्हणाला.

“कोण आहे?” कोणी मला जागवले?” बराच वेळानंतर बाहेर आल्याचा मनमुराद आनंद उपभोगल्यावर वृक्षाने विचारले.

“मी......महाराज मला आपली मदत हवी आहे,” थोडेसे खाकरत कृती चेटकीण म्हणाली. तिच्या आवाजात वज्रसेनला भय जाणवले.

“कोण??? भवा काय?? एवढे काय झाले की मला जागवावे लागले? आणि हे काय??? तुझ्याकडून सकारात्मक उर्जा येते आहे,” तिच्या जवळ जात तिचा वास घेत वृक्ष महाराज म्हणाले.

“म्हणजे कृती देवींचे खरे नाव भवा होते तर! भवा आणि भया अशी ही जोडगोळी. भवभयहारी कोण असेल?” वज्रसेन विचारात पडला.

“मी मनुष्य रूप धारण केले आहे. सत्वगुणांनी माझ्यातल्या षड्रीपुंना कमालीचे कमी केले आहे.

“यावर मी हसू की रडू? माझ्या चेटकीण विश्वातली एक कमी झाली. मात्र ती सन्मार्गाला लागली. पण तुलाही माहित आहे उगाचच कोणाला त्रास द्यायचा नाही हा धडा मी

सर्वांना देतो. असो. एवढी काय उलथापालथ झाली की तुला मला बोलवावे लागले?" पानांची सळसळ करत वृक्षमहाराज म्हणाले. यावर भया संदर्भातील घटना भवाने थोडक्यात सांगितली.

"एवढी कारस्थाने करायला भयामध्ये अक्कल आली कुठून?"

"तुम्हाला तर माहीतच आहे महाराज तिला हवे असलेले येन केन प्रकाराने ती मिळवतेच," भवा नम्रतेने म्हणाली. यावर महाराज गडगडाट करत हसले.

"म...मला भयाची कुपी हवी आहे," घाबरत थरथरत भवा म्हणाली. वज्रसेनला आतापर्यंत तरी वृक्ष शांत आणि विनोदी वाटत होता. किंबहुना थोडासा मूर्खही वाटत होता. भवाच्या घाबरण्याचे कारण त्याला नंतर समजले. एक दाणSSSSSS आवाज झाला आणि वृक्षराज ओरडले.

"असंभव. अशी कोणाचीही कुपी मिळणे शक्य नाही. कुपीतील अत्तर उडून गेले म्हणजे त्या चेटकीतील शक्ती उडून जातात. त्यापेक्षा मी तिला शिक्षा करतो," कान फाटत जाणाऱ्या आवाजात वृक्षराज ओरडले.

"भया शिक्षेच्या पलीकडे गेली आहे," भवाने समजूत काढण्याचा असफल प्रयत्न केला.

"ती तुझी भगिनी आहे विसरू नकोस," तिच्याजवळ जात तोंडाने तिच्यावर हवा सोडत वृक्षराज पुनः कोकलला.

"मी बोलू का? नमस्कार, मी वज्रसेन. भवाच्या अत्यंत मर्जीतला होतो. पण एक चूक झाली आणि तिने मला मनुष्याचा पोपट बनवले. चूक पण फारच क्षुल्लक होती," मध्येच बोलण्यासाठी वृक्षराजाच्या नाकरूपी फुगवट्यावर बसत वज्रसेन म्हणाला. त्याला आपादमस्तक न्याहाळत वृक्षराजांनी भुवया उंचावल्या.

"महाराज धात्रीवर्य काबीज केल्यावर ती आपल्या नगरीकडे वळणार आहे. इथे राज्य करण्यासाठी आपली जागा बळकावण्याचा ती प्रयत्न करील."

"ते असंभव आहे," वृक्षराज खात्रीने म्हणाले खरे पण त्यांच्या आवाजात थोडीशी भीती होती. हुशार वज्रसेनने ती लगेच हेरली.

"भयाने काळावरही विजय मिळवला आहे. स्वतःचा चेला बनवण्यासाठी मला भविष्यामधून तिने बोलावले आहे," एवढे बोलून वज्रसेनने भविष्यातले काही वैज्ञानिक चमत्कार ऐकवले. त्याने मारलेला बाण वर्मी लागला.

"नाही नाही नाही," एवढे असंबद्ध बोलत वृक्षराजाने आपल्या बुंध्यात एक पोकळी निर्माण केली. उघडलेल्या ढोलीमधून एक छोटीशी कुपी बाहेर आली.

"लक्षात ठेव, भयाचा सध्याचा सर्वांत मोठा शत्रूच ही कुपी उघडू शकतो. मात्र आता ही कुपी एवढी ताकदवान झाली आहे की ती उघडताच विस्फोटक शक्ती बाहेर येतील. त्याच्या ताकदीने उघडणाऱ्याचा जीव सुद्धा जाऊ शकतो," एवढे बोलून गडगडाट करत वृक्षराज धरतीच्या पोटात गुडूप झाले. मूळ रुपात येत कृतीने वज्रसेनला घेऊन उड्डाण केले आणि शीघ्रतेने ती रिंगणाजवळ आली. आता तेथे कोणतेही श्वापद नव्हते. राजपुरोहितांच्या शक्तीने सर्वांचा संहार केला होता.

कृतीने कुपी धूमलजवळ दिली आणि घडलेले सर्व थोडक्यात सांगितले. "धूमल, बाळ आपल्या जीवितास धोका आहे," तिला हृदयाशी कवटाळत महाराज म्हणाले.

"माताजींना भेटायची ही एकमेव संधी आहे ती मी दवडणार नाही," असे बोलून धूमलने कुपीचे बूच उघडले. आतून रों-रों आवाज करत चक्रीवादळ बाहेर आले आणि धूमलला घेऊन वातावरणात लुप्त झाले. आता तिला काहीही दिसत नव्हते. तिच्या भोवताली वेगाने वाहणारे वारे तिला आपल्याबरोबर पळवत होते. धूमलचं डोकं गरगरायला लागलं. यातून बाहेर पडण्याचा कोणताही मार्ग तिला दिसत नव्हता आणि हळूहळू चक्रीवादळाचा फेरा अधिकाधिक घट्ट होऊ लागला. श्वास कोंडू लागला. ती गुदमरली जाऊ लागली आणि त्याच तिरमिरीत असताना तिला हाक ऐकू आली,

"बाळ धूमल, मी आहे तुझ्यासोबत. घाबरू नकोस," तो आश्वासक आवाज तिने ऐकला आणि तिच्या मिटलेल्या डोळ्यांसमोर रक्षाचा, प्रथम राणी धराचा म्हणजेच तिच्या

आईचा चेहरा झळकला. त्यानंतर कोणीतरी तिला जोरदार ओढून त्या वादळातून बाहेर काढले होते. धृमलची शुध्द हरपली.

जेव्हा ती जागी झाली तेव्हा ती महाराणींच्या अंतःपुरात होती आणि तिच्या उशाशी प्रथमराणी धरा बसली होती. तिला पाहताच धृमलचा उर भरून आला आणि तिने आपल्या आईला गच्च मिठी मारली. दोघीहीजणी नंतर कितीतरी वेळ रडत राहिल्या. बराच वेळानंतर आनंदाश्रूंचा पूर ओसरला आणि धृमलने विचारले,

“माताजी जेव्हा आपण प्रथम भेटला रक्षाच्या रुपात तेव्हाच सर्व का नाही सांगितले? तेव्हा सांगितलेल्या बऱ्याच गोष्टी प्रत्यक्षात वेगळ्या होत्या.”

“बाळ आपल्या स्मृतीमध्ये नवीन गोष्टी आम्ही घालू शकत नव्हतो. मी भेटण्यापूर्वी जे आपल्या स्मृतीमध्ये होते त्यात फेरफार करणे आमच्या हातात नव्हते.”

“म्हणजे? आपल्या प्रथममहाराणी पदाबाबत धृमलला माहित होते?” वज्रसेनने विचारले. तोही आपल्या मूळरुपात आलेला होता.

“हो मी तुम्हाला सांगितलेली गोष्ट तुमच्या स्मृतीमध्ये अगोदरच होत्या. भूतकाळातील तुमच्या भूमिकांमध्ये ज्या क्षणापासून तुम्ही प्रवेश केला त्या क्षणापूर्वी पर्यंतच्या आठवणी तशाच ठेवणे बंधनकारक होते. त्यामुळे त्यामध्ये काहीही बदल मी करू शकत नव्हते कारण ते निसर्ग नियमाविरुध्द झाले असते. चेटकिणीने आमचे जेव्हा रुपांतर केले तेव्हा आम्ही अगतिक झालो होतो. त्यानंतर काहीच पर्याय नसल्याने आम्ही जंगलात, सरोवरात भटकत राहिलो.

अनेक वर्षे तशीच काढली. त्या दरम्यान सतत देवाचा धावा करत राहिलो. त्या चेटकिणीपासून सर्वांचे रक्षण कर अशी प्रार्थना करत राहिलो. सततच्या नामस्मरणाने आमच्या अंगात दिव्य शक्ती आपोआप जागृत व्हायला लागल्या. आम्हाला अचानक दृष्टांत होऊ लागले. त्यात आम्हाला काही गोष्टी दिसू लागल्या आणि त्यामुळेच आम्हाला चेटकिणीने केलेले सर्व समजले. जेव्हा आपल्या सर्वांनाच तिने रुपांतरित केले आणि धात्रीवर्यचे अपरिमित नुकसान केले तेव्हा आम्ही सर्व शक्तीनिशी आपणा सर्वांना भविष्यातून इथे घेऊन आलो. मात्र आपल्याला

आधीच सर्व कथन करणे आम्हाला चुकीचे वाटले. त्याक्षणी आतून आम्हाला जे वाटले तेच आम्ही केले. त्याचे कारण नाही कळले. पण अंतःप्रेरणा फुकट नाही गेली. सर्व व्यवस्थित झाले," धृमलला हळुवार थोपटत महाराणी म्हणाली.

"पण मग आपण सोबत तरी राहायचे ना?" धृमलने विचारले.

"मी आपल्याच सोबत होते. प्रवर्तनकडे असलेल्या कनकाच्या रुपात," महाराणीने गुपित फोडले. यावर प्रवर्तनने मान डोलावली.

"हो धृमल. मी मामाकडे जाताना मला एक राक्षसी जंगलाकडे जाताना दिसली. केवळ धात्रीवर्यचा विचार करून मी तिचा पाठलाग केला. ती भया चेटकीण होती हे मला नंतर कळले. आपला पाठलाग होतो आहे हे तिला समजले असावे कारण तिने मला पकडले आणि उलटे झाडाला लटकवून ठेवले. भयाण जंगलात हात पाय बांधलेल्या अवस्थेत आम्ही हतबल होतो.

तेव्हा आमच्या शेल्यात बांधलेला कनक बाहेर आला आणि बघता बघता त्याने रक्षाचे रूप घेतले. त्यांनी क्षणार्धात माझी सुटका केली आणि मला तिथून बाहेर आणले. मग पुनः कनकाच्या रुपात गेल्या. मी खूपच आश्चर्यचकित झालो होतो. तेव्हा त्यांनी मला भया चेटकिणीबद्दल सांगितले आणि ताबडतोब तुमच्या मदतीसाठी राजवाड्यात जायला सांगितले त्याचबरोबर कृती देवींची मदत घ्या असेही सूचित केले. परंतु भया चेटकीण हीच द्वितीय महाराणी आहे हे सर्व मला नंतर समजले. मला वाटते मी मंडळापासून दूर जाईन हे माहित असल्यानेच महाराणी आपण माझ्या सोबत होता," प्रवर्तन हात जोडत म्हणाला. यावर महाराणी धराने केवळ मान डोलावली.

"आणि त्या साधूचे काय जो मला तुमच्या माहेरच्या राज्यात सापडला होता?" वज्रसेन म्हणाला.

"माझ्या धार्मिकवृत्तीचा भयाने फायदा घेतला. मायावी साधूच्या रूपाने ती मला फसवत राहिली. मला तो केवळ चांगले सल्ले देत असे परंतु बाहेरच्या दुनियेच्या दृष्टीने तो मला चुकीचे सल्ले देत असल्याचे मागाहून सिद्ध झाले."

"माताजी पुढे काय? आमची खरी रूपे कोठे आहेत?"

“ती अदृश्य रुपात आहेत. भयाच्या मृत्यूनंतर त्यांचे पुनश्च मनुष्य रुपात रूपांतरण झाले पण तुम्ही इथे उपस्थित असल्याने काळानेच त्यांना अदृश्य केले. आता ते इथे उपस्थित आहेत. डोळे बंद करा म्हणजे तुम्हाला दिसतील,” महाराणी म्हणाल्या. सर्वांनी डोळे बंद केले तेव्हा प्रत्येकाला आपल्या मागे आपले मूळ रूप असल्याचे जाणवले. या भावनेने सर्वच चकित झाले. डोळे उघडल्यावर सर्वांनाच सारखीच भावना झाल्याचे समजल्यावर त्यांनी यासंबंधी महाराणीकडे विचारणा केली.

“बरोबर आहे. आपला भविष्यात जायचा मार्ग मोकळा आहे. परंतु तत्पूर्वी एका जीवाची सुटका आपल्याला करायला हवी आहे,” शताक्षीकडे बघत महाराणी म्हणाल्या. यावर शताक्षीने मान डोलावली.

“शतु बाळा हा तुझ्या एकटीचा मार्ग आहे. तिथे तुझ्याबरोबर कोणीही येणार नाही,” महाराणी म्हणाल्या. यावर शताक्षीने मान डोलावली.

“माताजी शताक्षीला एकटीने पाठवणे कितपत योग्य आहे?” धृमल काळजीने म्हणाली.

“मी जाईन. माझे ते कर्तव्य आहे,” शताक्षीने तिची समजूत काढली.

शताक्षी तशीच वरच्या दालनाच्या दिशेने निघाली. दालनात प्रवेश केल्यावर तिला वेगळी चाहूल लागली. समोरच्या दृश्याकडे ती विस्फारित नजरेने पाहत होती. कारण आरशामध्ये तिच्या छबीच्या मागोमाग एक स्त्री उभी होती. जी प्रत्यक्षात तिच्या पाठी दिसत नव्हती. भीतीने शताक्षीची तारांबळ उडाली. त्या स्त्रीने तिच्या खांद्यावर हात ठेवला. प्रत्यक्षात कोणाचाही हात नसूनही शताक्षीला स्पर्श जाणवत होता.

“तुला बघून खूप बरं वाटलं. किती वर्षे मी तुझी वाट पाहते आहे. ये, माझ्या मिठीत ये,” ती स्त्री म्हणाली. बहुधा तिच्या स्तनामधून दुग्धस्राव होत होता कारण तिचा पोलका भिजलेला होता. शताक्षीने पाठमोरी होऊन तिला मिठी मारली. आता प्रत्यक्षात त्या स्त्रीने तिला दर्शन दिले. मातेच्या दर्शनाने शताक्षीची पोरकेपणाची भावना गळून पडली. सनाथ असल्याचे

क्षणिक सुख तिला मिळाले. तिच्याही भावना अनावर झाल्या आणि तिला आशीर्वाद देऊन तिची माता अंतर्धान पावली. आपल्या पोटच्या गोळयाला भेटून ती मुक्त झाली होती.

शताक्षी पुनः सर्व बसले होते तिथे आली. तिने साश्रू नयनांनी घडलेली घटना कथन केली. महाराणींच्या चेहऱ्यावर स्मित झळकले होते. “निसंकोचपणे जा सर्व चांगलेच होईल.” त्या पुढे म्हणाल्या आणि त्यांनी सर्वांना जवळ घेतले. वज्रसेन कडे पाहत त्यांनी डोळे मिचकावले तसा तो समजला. आता तो निर्धास्त झाला होता. वज्रसेनला धूमल मिळणार होती. धूमलने अतिशय शीघ्रतेने आपला मुकुट काढला आणि आपल्या पाठी असलेल्या धूमलच्या डोक्यावर ठेवला आणि त्याबरोबर पुनः सर्वत्र प्रकाशच प्रकाश दिसू लागला. तिला आपले सर्वांग हलके झाल्यासारखे वाटले. सुगंधी अत्तराचा सुवास सर्वत्र दरवळत होता आणि काही वेळानंतर अनन्या त्याच खड्ड्यात एकटी होती. एखादे मोठे स्वप्न पाहिल्यासारखे तिला प्रथम वाटले पण तिच्या हातात महाराणीने दिलेले मोरपीस तसेच राहिले होते. आणि त्याचवेळी खड्डयाबाहेरून आवाज आला.

“अनन्या मी तुला न्यायला आले आहे,” दामिनीबाई म्हणत होत्या. नाझियाने त्यांना बोलावून आणले होते. त्या दोघींनी तिला खड्डयाबाहेर काढले.

“अनु मला माफ करशील? आजवर मी तुझ्याशी फार चुकीची वागले,” दामिनीबाई रडत होत्या.

“जे होते ते चांगल्यासाठी होते आई,” अनन्याने त्यांना मिठी मारली. तिचा चेहरा आनंदाने उजळला. अखेर तिच्या चांगुलपणाला फळ मिळाले होते. आता हे जीवन सुखकर होणार होते.

दोन दिवसांनी दहावीचा रिझल्ट लागला. अनन्या आणि साधना दोघींनाही चांगले मार्क्स मिळाले होते. रिना काठावर पास झाली होती. रिझल्ट नंतर रिना अनन्याला येऊन भेटली.

“अनन्या मी पुढच्या शिक्षणासाठी पुण्याला जात आहे. तूही माझ्याबरोबर चल. माझी मावशी खूप श्रीमंत आहे तिच्याकडे आपण राहू.”

“मला जमणार नाही गं. मी इथेच नोकरी बघेन,” अनन्या दामिनीबाई दिसत नाही असे बघून म्हणाली.

“नाही, तू जाणार आहेस. मला तुला खूप शिकलेले बघायचे आहे,” दामिनीबाई अचानक कोपऱ्यातून येत मायेने म्हणाल्या.

साधनानेही पुण्यालाच शिकण्यासाठी होस्टेलवर राहण्याचा निर्णय घेतला. अनन्या, रिना ह्या रिनाच्या मावशीकडे पोहोचल्या. दरवाजामध्ये स्मितहास्य करत देवक उभा होता. अनन्याला बघताच त्याच्या आनंदाला पारावार उरला नाही. देवाने त्यांना पुनः एकत्र आणले होते. रिनाच्याच मावशीचा तो मुलगा होता.

देवकला बघून अनन्याला खूप आश्चर्य वाटले. तिने त्याला काका-काकूंबद्दल विचारले. त्यावर तो म्हणाला,

“अगं मी जेव्हा परत आलो तेव्हा दरवाजाबाहेर होतो. आत कसलीतरी खुडबूड जाणवल्याने मी क्षणार्धात दरवाजा उघडला तर दोन चोर काकांवर पिस्तूल रोखून उभे होते. एकाने काकूला सुऱ्याने भोसकलं होतं. माझ्यामध्ये दहा हत्तींचं बळ आलं. मी त्यांच्यावर तुटून पडलो आणि त्यांना लोळवलं. काकूला इस्पितळात नेलं. खरंच धात्रीवर्यमध्ये मी शिकलेलं सर्व मला आठवलं आणि उपयोगी सुद्धा पडलं. माझ्या भूतकाळामुळे माझ्या काका-काकूंचा जीव मी वाचवू शकलो.” त्याचे बोल ऐकून अनन्याला खूप हायसं वाटलं. त्याचबरोबर देवक पुनः भेटला म्हणून खूप आनंदही झाला.

“अनु तू खूश आहेस ना?” असंच एकदा देवकने तिला विचारलं.

“धात्रीवर्यची खूप आठवण येत आहे,” अनन्या म्हणाली.

“अनु तू खूप अभ्यास कर. खूप यश मिळव. तुझं फ्युचर छान आहे. मी तुला खूप सुखात ठेवीन,” शेवटचं वाक्य देवक तोंडातल्या तोंडात पुटपुटला.

# दहा वर्षानंतर

अनन्या आणि देवकचे लग्न ठरले होते. लग्नाच्या दिवशी सारा, संकेत आणि नंदितही हजर झाले. एवढ्या वर्षांनी सर्वांना एकत्र बघून फार आनंद झाला.

“तुम्ही सर्व कसे?” अनन्याने आश्चर्याने विचारले.

“अगं तुमच्या लग्नाची बातमी आम्ही पेपर आणि न्यूज चॅनेलवर वाचली,” सारा हसत म्हणाली. नावावरून तुम्हाला ओळखले. देवक आज खूप मोठा माणूस झाला आहे. ऐकून बरे वाटले. धात्रीवर्यवरून परत आल्यानंतर परदेशी गेले त्यामुळे इथला काहीही संबंध नव्हता. तुमच्या सर्वांची खूप आठवण येत होती.

“हो, माझीही कॅन्सरमधून मुक्तता झाली. माझ्या आईला मी नवीन आयुष्य दिले. आता माझेही लग्न होऊन मला एक मुलगी आहे. आम्ही सर्व सुखात आहोत,” नंदित म्हणाला.

“मी इलेक्ट्रीकल इंजिनिअर झालो आणि स्वतःचा धंदा सुरु केला. आत्ताच एक छोटी कंपनी उभी केली आहे. उद्या तिचं उद्घाटन आहे, तुम्ही यायचं आहे,” संकेत म्हणाला.

“अनन्याने एम.एस. पूर्ण केले. तोपर्यंत लग्नासाठी आम्ही थांबलो होतो,” देवक म्हणाला.

“साताजन्माच्या गाठी हे खरेच आहे बहुधा,” सारा हसत म्हणाली.

“म्हणजे?” अनन्याने न कळून विचारले.

“अगं वज्रसेनचे प्रेम तू ओळखले नाहीस,” सारा पुनः हसली.

“देवकलाही स्वतःच पुढाकार घ्यावा लागला. पण त्याचे प्रेम महाराणींनी ओळखले होते,” देवकने सत्य कबूल केले. आता अनन्याला वज्रसेनची काळजी, त्याने तिच्यासाठी धोक्यात टाकलेला जीव आठवला. आपल्याला याही जन्मी हाच पती मिळाला म्हणून स्वतःला तिने भाग्यवान समजले. त्यांच्या परत जाण्याने अनेक जन्म वाचले होते. धात्रीवर्य राज्यात पुनः सुख नांदले होते. देवकच्या खांद्यावर समाधानाने डोके ठेवत अनन्या म्हणाली,

“खरेच आपण भाग्यवान आहोत! सर्व चांगलेच झाले.”



मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात . ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात. म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वतःही लिहायला हवं.